साप्ताहिक

# माणूस

किंमत दोन रुपये
बारा फेब्रुवारी
१९८३

## पुरुष - दळवींशी बातचीत - प्रेक्षक चच

स्त्री विरुद्ध
पुरुष?
सत्ता विरुद्ध
ध्येयवाद?
की स्त्रीमुक्ती?

कोतूळ
नेवासे
शिर्डी
संगमनेर
श्रीरामपूर
पुणे---
पोलीसी
अत्याचार
कसे
थांबणार?
केव्हा
थांबणार?



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : पस्तीस ३८

१२ फेब्रुवारी १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

# अंकलखोप, मुंबई, दिल्ली

अंकलखोपला यशवंतराव चव्हाण आणि वसंतरावदादा पाटील एकत्र आले तेव्हाच महाराष्ट्रात राजकीय स्थित्यंतर होणार हे स्पष्ट झाले होते. हे दोघे अलग होते तोवर अंतुल्यांसारख्या तिसऱ्याचा फायदा झाला. या संधीचा फायदा मात्र अंतुले घेऊ शकले नाहीत. त्याच्यानंतर आलेले बाबासाहेब भोसले यांनाही ही संधी राबवता आली नाही. दैवाने या दोघांना दिले; पण कर्माने नेले अंतुले आणि भोसले–दोघांनाही जिभेने दगा दिला. एक बेफाम, दुसरा बाष्कळ ! दोघेही वर्ष-दीड वर्षातच उडाले आणि निरुपाय म्हणून शेवटी इंदिरा गांधीना वसंतरावदादाचा स्वीकार करावा लागला. कर्नाटक–आंध्र निवडणुकांचा निकाल अनुकूल लागला असता तर महाराष्ट्रात निवडणुका जाहीर करून सध्याची राजकीय कोंडी फोडण्याचा डाव इंदिरा गांधींनी टाकला असता,असे म्हणतात. पण निकाल भलताच प्रतिकूल लागला. त्यामुळे महाराष्ट्रात बंडखोरांपुढे माघार घेणे बाईंना भाग पडले.आता नव्या निवडणुका होईपर्यंत तरी महाराष्ट्रात डोकेदुखी नको म्हणून वसतरावदादाच्या हाती येथील सत्तासूत्रे सोपविली गेली आहेत. वसंतरावदादा जुने आणि जाणते आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यात नसली तरी पश्चिम महाराष्ट्रात त्यांची पाळेमुळे खोल आहेत. त्यांचा लोकसंग्रह मोठा आहे. काँग्रेसचे विस्कटलेले घर महाराष्ट्रापुरते सावरण्याची त्यांची क्षमता निश्चित आहे. प्रकृती आणि वयोमान एवढीच त्यांची 'वजा बाजू. धडाडीने नवे काही निर्णय घेणे व कसोशीने ते अंमलात आणणे कदाचित् यामुळे त्यांना अवघड जाईल; पण गिरणी कामगारांचा संप आणि दुष्काळ हे दोन प्रश्न तरी त्यांनी धडाडीने त्वरित हाताळणे आवश्यक आहे. सत्तेवर नसताना त्यांनी शेतीमालाच्या रास्त भावाची शेतकरीसंघटनेची मागणी योग्य असल्याचे म्हटले होते. फसलेल्या दूध-आदोलनाला त्याचा पाठिंबा असल्याचेही प्रसिद्ध झाले होते. हा विषय काही अंशी केंद्राचा असला तरी महाराष्ट्रापुरते काही निर्णय वसंतरावदादा घेऊ शकतात असे जर काही निर्णय घेतले गेले तर ज्या शेतकऱ्यांमधून दादांचे नेतृत्व पुढे आले तो सर्व शेतकरीसमाज दादांना नक्कीच दाद देईल, दादाचे नेतृत्व अधिकच पक्के होईल. कर्नाटकातल्या निवडणुकांबाबतचे एक निरीक्षण असे आहे– ज्या भागात तेथे रुद्राप्पांच्या शेतकरी संघटनेची आंदोलने झाली त्या भागातच इंदिरा काँग्रेसला जोराचा दणका बसला. दलित किंवा मुस्लिम यानी अद्याप इंदिरा पक्षाची साथ सोडल्याचे दिसून तरी आलेले नाही. या गटांना भाजप, जनता किंवा कम्युनिस्ट यांपैकी कोणीच अद्याप पुरेशा प्रमाणात आकर्षित करू शकलेले नाही; पण कर्नाटकातला शेतकरीवर्ग गुंडुरावांवर चिडलेला होता. हा वर्ग फिरला आणि गुंडुराव उडाले ! इंदिरा गांधींचे कर्नाटकातील छत्र कोसळले.

अशी स्थिती महाराष्ट्रात होणे अशक्य नाही. प्रमुख म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपल्या वृत्तपत्रांनी आणि डावखोऱ्या पक्षांनी–विचारवंतानी शेतकरी चळवळीविषयी एक विकृत चित्र जनमानसात निर्माण करून ठेवलेले आहे. शरद जोशी यांचे विचार पटले न पटले तरी शेतकरी चळवळ वाढणारच आहे. दादांसारखा शेतीचे ज्ञान व अनुभव असणारा मुख्यमंत्री ही चळवळ आटोक्यात मात्र ठेवू शकतो, तिला इष्ट ते वळणही देऊ शकतो. हे शेतकरी चळवळीचे वारे कुठून, कसे, कोणीकडे फिरते, यावरच महाराष्ट्रातले पुढचे सत्तान्तर अवलंबून आहे. हे वारे जो नीट शिडात भरून घेईल तो महाराष्ट्राचा पुढचा सत्ताधारी असेल! विशेषत: दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष पुरवायला हवे. म्हणूनच शेतकरी चळवळीने उसाइतकेच कांद्याला महत्त्व दिले. कांदा, ऊस, दूध–हे वारे असेच पसरत गेले तर मुंबईच काय, दिल्लीही टिकाव धरू शकणार नाही. वसंतदादांसारख्या शेतकरी–नेत्याने अर्थातच हे ओळखले असणार; पण ओळखणे वेगळे आणि त्याप्रमाणे राज्ययंत्रणा आणि काँग्रेसची संघटना यांची पुनर्बांधणी करणे वेगळे. निवडक पंचवीस-तीस दुष्काळी तालुके निवडून तेथे एखादा धडक कार्यक्रम राबवता का येऊ नये? शहरांना ग्रासणारा झोपडपट्ट्यांचा प्रश्न सोडवण्याचा हा एकच राजमार्ग आहे. बाकी सगळे वरवरचे व थातुरमातुर उपाय आहेत. जिथून शहरात माणसे येतात तिथेच त्यांना पुरेसा रोजगार व इतर सोयीसवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. दादांच्या सरकारने महाराष्ट्रातले पंचवीस तरी दुष्काळग्रस्त तालुके दुष्काळमुक्त करण्याचा विडा उचलावा. एक नवेच चैतन्य यामुळे निर्माण होईल. यासाठी केंद्राकडे धाव घेण्याची गरजही पडणार नाही. दादांनी पुण्याजवळचे–सासवडचे विलासराव साळुंके याचे काम पाहिले आहे. दादा सांगलीचेच असल्याने मिरजेजवळच्या म्हैसाळचे मधुकरराव देवल यांचे कार्यही दादांना माहीत आहे. अशा तऱ्हेचे मूलभूत परिवर्तनाचे कार्य अनेक ठिकाणी चालू आहे. हा सगळा अनुभव एकत्र करून दादांनी उठाव केला तर त्यांच्या सत्तेला अवेळी ग्रहण लागण्याचे काहीच कारण नाही. ऊसवाल्याचे हित दादांनी जरूर पाहावे; पण उसापलीकडच्या कोरडवाहू, दुष्काळी शेतीकडेही दादांनी लक्ष पुरवावे–तातडीने –कारण उद्याच्या सत्ताकारणात आणि समाजकारणात हा विभाग महत्त्वाचा ठरणार आहे. उगाच का शरद पवार मराठवाड्याचा दौरा करीत आहेत?

## उत्तरार्ध?

महाराष्ट्रातले सत्तान्तर हा झाला अंकलखोप-दिलजमाईचा पूर्वार्ध. उत्तरार्ध दिल्लीत घडण्याची शक्यता आहे. वसंतरावदादांचे पुनरागमन झाले. मग यशवंतरावांचे का नको? आहे त्यापेक्षा इंदिराजींची ताकद आता वाढण्याची शक्यता कमीच. बुरूज ढासळत आहेत. राजीवचे विमान अजून काही अपेक्षित उड्डाण घेत नाही. तेव्हा यशवंतरावांसारख्या स्वगृही आपणहून आलेल्या व्यक्तींना फार काळ, सत्तेपासून फार दूरवर ठेवणे, इंदिराजींनाही परवडण्यासारखे नाही. कमलापती त्रिपाठीसारख्या अतिवृद्ध सहकाऱ्यांना काँग्रेसचे ढासळते बुरूज सावरण्यासाठी पुन्हा बोलावले जाते तर यशवंतरावादिकांचीही मदत कशावरून घेतली जाणार नाही? महाराष्ट्रात शरद पवार किती जोर करतात यावरही हे अवलंबून आहे. वसंतरावदादा आल्याने सर्वात जास्त अडचण पवारांची व त्यांच्या समाजवादी काँग्रेसची झाली आहे. पवार ग्रामीण भागात स्वबळ वाढवीत आहेत व मुंबईत त्यांनी फर्नांडिस–ठाकरे याच्याशी युती केली आहे. वसंतराव–यशवंतराव यांच्या हाती महाराष्ट्र काँग्रेसची सूत्रे गेल्यावर स्वबळ कमी होणार व फर्नांडिस–ठाकरे अपुरे पडणार! जो जो इंदिरा-विरोधक तो तो आपला असे मानन पवारांना भलतीच लांबलचक विरोधी आघाडी उभी करावी लागणार आहे. मग त्यातअंतुल्यांसारखे 'भ्रष्टाचार्य' येऊ म्हणत असतील तर त्यांनाही नको कसे म्हणणार? किंवा दादा–चव्हाणाशी तडजोड करून पवारांनाही इंदिरा काँग्रेसवासी व्हावे लागेल. शिवाय काँग्रेसची जन्मशताब्दी जवळ आली आहे. देशभर साहजिकच मोठमोठे उत्सव-समारंभ होणार. पवारांना अशा ऐतिहासिक क्षणी आपल्या मातृसंस्थेपासून दूर कसे राहवणार? पवारांची सध्याची त्रिशंकु अवस्था संपायची तर हे दोनपर्याय संभवतात. या पैकी कुठलाही पर्याय पवारांनी निवडला तरी दादायशवंतरावगोटाचे दिल्लीतील स्थान थोडेफार उंचावणारच. किती उंचावेल हे परिस्थितीवर व इंदिरा गांधी किती अडचणीत येतात यावर अवलंबून आहे. चालू दशक जसजसे मध्यावर येत आहे तसतशा अडचणीही वाढत चालल्या आहेत. मागच्या दशकाचा अनुभव यापेक्षा काही वेगळा नाही. विरोधकांचा जोरही हळूहळू वाढत चालला आहे. वसंतराव–यशवंतराव या अडचणीचा फायदा घेऊन आपली किंमत वसूल केल्याशिवाय कसे राहतील? महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद ही निम्मी वसुली झाली. अद्याप निम्मी बाकीच आहे! ती वसूल करून घेण्याची संधी महाराष्ट्राच्या या पुनरागत नेतृत्वाला कशी आणि केव्हा मिळते ते पाह्यचे.

–श्री. ग. मा.

# नेता निवड

## इंदिरा गांधी यांनी केलेली तडजोड

एक फेब्रुवारी. पहाटे सव्वा वाजता वसंतदादा पाटील यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याची घोषणा झाली आणि अंतुलेंना इंदिरा कॉंग्रेसमधील एकाधिकारशाहीचा साक्षात्कार झाला !

त्याच दिवशी दुपारी चार वाजता बॅ. अंतुले यांनी आपल्या निवासस्थानी बोलाविलेल्या पत्रकारपरिषदेत, दिल्ली–निरीक्षकांनी आपली घोर फसवणूक केल्याचा आरोप केला. 'राजकीयदृष्टचा मला दडपण्यासाठी पक्षांतर्गत लोकशाहीचे सर्व निकष व पक्षाचे सर्व नियम धाब्यावर बसवून निवडणूक लढविण्यापासून मला वंचित करण्यात आले. तरीही निवडणुकीत मलाच सर्वाधिक मते मिळाली. नि:पक्षपाती निरीक्षकाने मी निवडून आल्याचे जाहीर केले असते.' असा दावा अंतुले यांनी केला आहे.

निवडणुकीत निरीक्षकानी वाटेल तसा हस्तक्षेप करावा इतक्या इंदिरा गांधी दुबळ्या झाल्या आहेत काय ? त्यामुळेच अंतुलेंनी सोडलेल्या या जाहीर टीकास्त्राचा रोख इंदिरा गांधीवरच आहे हे स्पष्ट आहे. वसंतदादाची नेतेपदी निवड करतानाच इंदिराबाईंनी चतुराईने अंतुलेंचीही सद्दी. संपवली आहे. त्यामुळेच अंतुले आता आकाडताडव, थयथयाट करीत आहेत; पण तो आता वाझोटा ठरणार आहे !

### वादळी बैठक

नेतानिवडीच्या बैठकीसाठी इंदिरा गांधी यांनी पाठविलेल्या निरीक्षकांनी मोठ्या अक्कलहुशारीने ही निवडणूक हाताळली. या वादळी बैठकीला ते व्यवस्थित तोंड देऊ शकले हे मात्र खरं.

नव्या विधानभवनाच्या दहाव्या मजल्यावर नेतानिवडीसाठी बैठक भरली होती. बुटासिंग आणि शिवशंकर हे दोन केंद्रीय मंत्री निरीक्षक म्हणून बैठकीला होते. पावणेचारच्या सुमारास निरीक्षक जेव्हा आले तेव्हा सभागृहात २५८ आमदार (विधानसभा व परिषद) उपस्थित होते. विशेष म्हणजे इंदिरा कॉंग्रेसमधून बडतर्फ केलेले सुरेश जैन आणि अन्य सहा निलंबित बंडखोरही बैठकीस हजर होते, तर त्यांचे समर्थक शेकडोंच्या संख्येने सभागृहाबाहेर घोषणा देत उभे होते.

सभागृहाबाहेर भिंतीला लागून असलेल्या पोलादी कपाटावर उभे राहून वर असलेल्या काचेतून आतलं कामकाज स्वच्छ दिसत होतं. मोठ्या मुष्किलीनं तिथं प्रवेश मिळाला. बाहेरच्या घोषणांमुळे आतली चर्चा मात्र ऐकू येत नव्हती. काचेला कान लावला की अगदी अस्पष्ट ऐकू येई.

बैठकीचा सूर तापलेलाच होता. बैठक सुरू झाली तेव्हा भोसले समर्थकानी निलंबित आमदाराच्या उपस्थितीला हरकत घेतली आणि आवाज चढू लागले. शिवशंकर आणि बुटासिंग खमकेपणाने त्यांना उत्तर देऊन गप्प बसवीत होते. निरीक्षकानीही निलंबित आमदारांच्या उपस्थितीला जोरदार आक्षेप घेतला तेव्हा वातावरण एकदम तापलं. त्याच आरडाओरडीत माजी मुख्यमंत्री अंतुले बोलायला उभे राहिले; परंतु शिवशंकर यांनी त्याना लगेच बसायला सांगितले. 'तुमच्या आधीपासून मी या पक्षात आहे–पक्षाच्या जन्मापासून आणि मला बोलू देत नाही ?' असा संतप्त सवाल अंतुलेंनी केला. त्याला उत्तर देण्यास शिवशंकर डोळे वटारून उभे राहिले तेव्हा अंतुलेंनी झटकन त्यांच्या हातातील ध्वनिवर्धक खेचून घेतला आणि ते बोलू लागले.

### बुटासिंगांची चपराक

जवळजवळ दहा मिनिटे अंतुले बोलत होते. आपल्या पक्षनिष्ठेबाबत आणि इंदिरा गांधींच्या अडचणीच्या काळात आपण कसे त्यांच्याबरोबर होतो हे अंतुलेंनी सांगितलंच; पण पक्षश्रेष्ठींनाही त्यांनी सुनावलं. संतप्त होऊन अंतुले बोलत होते; पण तितक्याच शांतपणे बुटासिंग यांनी अंतुलेंना उत्तर दिले. पक्षातील मंत्री असो व गल्लीतील कार्यकर्ता दोघेही सारखेच. कोणीही पक्षविरोधी कारवाया करो त्याच्यावर समान न्यायाने कारवाई केली जाईल. त्या वेळी त्याची ज्येष्ठता पाहिली जाणार नाही, अशा आशयाचे उद्‌गार त्यानी काढले.

हे उद्‌गार म्हणजे तमाम अंतुले समर्थकांना चपराकच होती. नेतानिवडीच्या शर्यतीतून अंतुले तेथेच बाद झाले.

मावळते मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यानी आपला राजीनामा निरीक्षकांना दिल्यानंतर तीन पर्याय निरीक्षकांनी नेता–निवडीसाठी मांडले. नेत्याचे नाव पक्षश्रेष्ठींनी मुक्रर करावे हा बाबासाहेब भोसले यांचा प्रस्ताव निरीक्षकानी, पक्षश्रेष्ठींनी, विधिमंडळ–पक्षानेच ही निवड घ्यावी असे उत्तर देऊन फेटाळला !

निरीक्षकानी मांडलेला सहमतीने निवडीचा प्रस्ताव जेव्हा मंजूर झाला तेव्हा दादा आणि आदिक हेच खरे दोन उमेदवार शर्यतीत होते. प्रतिभा पाटील या स्वतः शर्यतीत उतरल्या होत्या तर भोसलेंनी शंकरराव चव्हाण याचं नाव सुचवलं; परंतु या नावाना फारसा पाठिंबा मिळणं शक्यच नव्हतं.

निरीक्षकानी अवलंबिलेल्या निवडणूकपद्धतीमागे श्रीमती गांधीचे अनेक हेतू होते. कोणत्याही नावाला त्याचा आशीर्वाद नव्हता हे खरंच; परंतु शर्यतीतील उमेदवारांची ताकद त्याना अजमावून पाहायची होती. विशेषत: दादाची ! अंतुलेंचं नाव बाईंनी, त्यांना नेतेपदाच्या निवडणुकीस उभे राहण्यास प्रतिबंध करून आधीच बाद केलं होतं. दादाच्या नावाला मान्यता ही बाईंनी केलेली तडजोड असल्याने दादाची प्रत्यक्ष ताकद किती हे त्याना अजमावयाचे होते. या निवडणूकपद्धतीत आमदाराने आपल्या पसंतीच्या उमेदवाराचे नाव चिठ्ठीवर लिहायचे होते आणि त्याखाली स्वत.ची सही करायची. बुटासिंग आणि शिवशंकर यांनी दोन खोल्यात स्वतंत्रपणे बसून या चिठ्ठ्या स्वीकारल्या. अंतुलेंना निवडणुकीस उभे राहण्यासच पक्षश्रेष्ठींनी नकार दिल्याने बरेच आमदार आदिकांकडे वळले. तरीही काहींनी अंतुलेंचे नाव सुचविले. बाईंना हेच हवं होतं. याही स्थितीत अंतुलें-

बरोबर किती आमदार राहतात हे या पद्धतीमुळे त्या आमदाराच्या नावांसह कळून येणार होते. हा संकेत ज्याना कळला त्यानी शहाणपणाने अंतुलेंचे नाव सुचविले. या पद्धतीमुळे कोणापाठी कोण–कोण आहेत याचा पुरावाच बाईंकडे राहणार आहे.

### अंतुलेंना फक्त ३५ मतं

अंतुलेंना या निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली हे स्पष्ट झाले असूनही त्यांनी आपल्यालाच सर्वाधिक मते मिळाल्याचा दावा केला आहे. १७५ मतांचा त्यांचा दावा आहे. हा दावा कितपत खराय ?

वस्तुस्थिती वेगळी आहे. दादाना निर्विवाद पहिल्या क्रमांकाची मते मिळाली आहेत. विश्वसनीय गोटातून मला जी माहिती मिळाली आहे, त्यानुसार दादाना २५८ पैकी १३६ मते मिळाली आहेत. दादांच्या पाठोपाठ आहेत रामराव आदिक. ७० मते त्यांना मिळाली तर अंतुलेना फक्त ३५ मते ! बाकी १७ मते प्रतिभा पाटील आणि शंकरराव चव्हाण याना विभागून मिळाली आहेत.

हे आकडे पाहिले तर अंतुलेंचा दावा साफ फोल ठरतो. दादाना स्पष्ट बहुमत मिळाल्यानेच या वेळी कोणताही अडसर त्याना मुख्यमंत्रीपद मिळविण्याच्या आड आला नाही आणि इंदिराबाईंनी त्याच्या नावाला अंतिम होकार दिला !

३१ तारखेला रात्री अकरा वाजता मतमोजणी संपली तेव्हा निरीक्षकानी दिल्लीला फोन लावला. बऱ्याच वेळाने दिल्लीशी संपर्क साधता आला. मतमोजणी संपवून निरीक्षक दिल्लीला फोन करताहेत असं जेव्हा दादांना त्यांच्या निवासस्थानी सांगण्यात आलं, तेव्हा दादा थोडे खट्टूच झाल्याचं सांगण्यात येतं. 'याचा अर्थ कोणासही स्पष्ट बहुमत मिळालेलं नाही', असा त्यांचा होरा होता. मध्यरात्री जेव्हा दादांना आणि अन्य उमेदवारांना निरीक्षकानी बोलावून घेतलं तेव्हा दादा जायलाच तयार नव्हते असं समजतं. आपल्याला स्पष्ट बहुमत नसावं असं त्यांना वाटत होतं. त्यांच्या सहकाऱ्यांनी समजूत घातली तेव्हा दादा विधानभवनाकडे निघाले. बुटासिंग आणि शिवशंकर यांनी जेव्हा त्याना स्पष्ट बहुमत मिळाल्याचं सांगितलं तेव्हा दादा खुलले !

निरीक्षकांनी दादा, आदिक आणि प्रतिभाताई यांच्याबरोबर अंतुलेंनाही बोलावणं पाठवलं होतं; परंतु ते आलेच नाहीत ! आपली निवड आता होत नाही हे पक्कं ठावूक असल्यानेच ते आले नाहीत. आपल्याला सर्वाधिक मते मिळाल्याचा दावा ते कोणत्या जोरावर करतात हे तेच जाणोत !

खरं तर १५ जानेवारीला प्रथम निरीक्षक महाराष्ट्रात पाठवले, त्याच वेळी बाईंनी अंतुलेंच्या पुनरागमनास आपला स्पष्ट विरोध दर्शविला होता. बुटासिंग आणि शिवशंकर यांनी अंबर या अतिथिगृहात आमदारांच्या भेटी घेतल्या तेव्हा त्यांची अंतुले–समर्थकांबरोबरची भाषा कडकच होती. जवाहरलाल दर्डा यांच्याबरोबर तर शिवशंकर यांचा चांगलाच खटका उडाला होता. 'ते वाईट नाव (अंतुले) आमच्यापुढे जराही उच्चारू नका' अशा शब्दात शिवशंकर यांनी आमदाराना सुनावल्याचं विश्वसनीय सूत्राकडून समजतं. खरं तर अंतुलेंना तोच लाल कंदील होता.

आपल्याविरुद्धच्या बंडखोरीबाबत बाबासाहेब भोसले म्हणाले होते, 'भाषा बंडाची, वृत्ती गुंडाची आणि कृती षंढाची !' 'भोसले हटाव मोहीम' यशस्वी ठरली असली तरी अंतुले-समर्थक अंतुलेंना निवडून देऊ शकले नाहीत, याबाबतीत तरी त्यांची कृती षंढाची ठरली !

१९८० सालीच दादांची निवड झाली असती तर आजची अवस्था आणि वेळ आली नसती; परंतु दिल्लीश्वराचा दादांवरील कोप दूर झाला नव्हता. बाईंना मराठा लॉबीचं खच्चीकरण करायचं होतं; अखेर त्याना तडजोड करावी लागली. ही तडजोड करीत असतानाच त्यांनी अंतुलेंची सद्दी संपवली आहे. अंतुलेविरुद्ध फौजदारी खटला भरण्यास परवानगी दिली गेली तेव्हाच अंतुलेंचे दिवस भरल्याचं स्पष्ट झालं. आता पुन्हा मुख्यमंत्री होण्याची मनीषा धरणाऱ्या अंतुलेना अटकाव करून त्यांनी 'अंतुलेवादा'वर पुन्हा पडदा टाकला आहे.

## मानहानी आणि पुनरागमन

दादा तिसऱ्यादा मुख्यमंत्री होताहेत महाराष्ट्राचे. ७७ साली लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्यानतर वसंतदादा प्रथम मुख्यमंत्री झाले. ७८ च्या विधानसभा निवडणुकीनंतरही ते मुख्यमंत्री झाले, तेव्हा ते स्वर्णसिंग काँग्रेसचे होते. आता तिसऱ्यादा, पुन्हा इंदिरा काँग्रेसचे मुख्यमंत्री म्हणून !

गेल्या १३ नोव्हेंबरलाच (१९८२) दादानी 'गरज पडली तर योग्य वेळी मी महाराष्ट्राचे नेतृत्व करीन !' अशी घोषणा केली होती सांगलीला, आपल्या ६५ व्या वाढदिवसाच्या मेळाव्यात. ती घोषणा दादानी अवघ्या दोन महिन्यात खरी केली आहे !

खरं अडीच वर्षापूर्वीच त्यांना मुख्यमंत्री व्हायचं होतं; परंतु इंदिरा गांधी तेव्हा त्यांच्यावर नाराज होत्या आणि महाराष्ट्रातील मराठा लॉबी त्याना मोडायची होती. त्यामुळं आटोकाट प्रयत्न करूनही त्याना मुख्यमंत्री होता आलं नाही. 'एक दिवस का होईना, मुख्यमंत्री करा !' असा त्यानी त्या वेळी हट्ट धरला होता. १९७८ च्या निवडणुकीनंतर दादा पुन्हा सत्तारूढ झाले खरे; परंतु शरद पवार यानी बंड केलं. अवघ्या चार महिन्यात त्यांचं ४० जणाचं भलं मोठं मंत्रिमंडळ कोसळलं. ती मानहानी त्यांना फार टोचून राहिली होती. त्या वेळी झालेली अवहेलना पुसून सन्मानाने निवृत्त व्हावं अशी त्याची इच्छा होती; परंतु इंदिरा गांधी यांनी त्यांना अव्हेरलं. ज्याच्यावरचा विश्वास बाईंचा उडतो त्याला, मानहानी करून नामोहरम करण्याचा प्रयत्न बाई करतात. खरं तर इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या, त्या वेळी महाराष्ट्रातील त्यांच्या विजयाचं सर्वाधिक श्रेय दादाचंच होतं. परंतु विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवाराची यादी करताना दादांच्या पसंतीची अनेक नावे गाळण्यात आली. अंतुलेंची तेव्हा सरशी होती. 'मराठा तितुका गाळावा' हे त्यांचं धोरण होतं. त्या वेळी २८८ उमेदवारात ९० ते १०० मराठे होते. दादाना हा प्रकार रुचणं शक्य नव्हतं. त्यानी निवडणूक-मोहिमेतून अंग काढून घेतलं; पण असं करणं त्याना चांगलंच भोवलं ! मुख्यमंत्रीपदाची माळ त्यामुळे अंतुलेंच्या गळ्यात पडली !

१९७८ नंतर दादाना अनेक मानहानीतून जावं लागलं. ७८ साली

शरद पवारांनी बंड करून त्यांचं सरकार पाडलं. ८० च्या निवडणुकीत उमेदवार निवडताना दादांच्या माणसांना गाळण्यात आलं. मुख्यमंत्रीपदाची माळ अंतुलेंच्या गळ्यात घालण्यात आली. त्यानंतर प्रदेश पक्षाध्यक्षपदाच्या निवडणुकीत दादांनी सुचविलेल्या नावाना डावलून अंतुलेंचे उमेदवार गुलाबराव पाटील याना निवडण्यात आलं.

दादाची अशी मानहानी १९७५ साली झाली होती. १९७२ साली महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात त्यांचा प्रथम समावेश झाला; पण अवघ्या अडीच वर्षांत त्यांना मंत्रिमंडळातून डच्च्यू देण्यात आला. सहकारक्षेत्रात अतुलनीय कर्तबगारी गाजवणाऱ्या दादानी मंत्रिपदावर असतानाही, चांगली कर्तबगारी केली होती; परंतु अपमानास्पदरीत्या त्याना जावं लागलं; पण दादांनी राजकीय संन्यासाची घोषणा त्या वेळी करून सर्वांनाच धक्का दिला!

दादांनी राजकीय संन्यास सोडला तो ७७ साली इंदिराकाँग्रेसचा पराभव होऊन जनतापक्ष सत्तेवर आला तेव्हा. घर जळत, असताना निवृत्तिअवस्थेत राहणे शक्य नाही म्हणून त्यांनी संन्यास सोडला आणि शंकरराव चव्हाणांना बाजूस सारून ते मुख्यमंत्री झाले!

शरद पवारांनी सरकार कोसळविल्यानंतर दादाना सतत मानहानी सहन करावी लागली. दादांविरुद्धचा इंदिरा गांधी यांचा राग जुना आहे, काँग्रेसफुटीच्या वेळी (१९६९) आणि आणीबाणीत दादा श्रीमती गांधीबाबत कडवटपणे बोलत. इंदिरा गांधी सत्तेवर पुन्हा आल्यानंतरचं दादाचं एक वक्तव्य त्यांना चांगलंच भोवलं होतं. दिल्लीच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये जमलेल्या खासदारांपुढे दादा म्हणाले होते, 'बाईंना महाराष्ट्रासाठी माझाच विचार करावा लागेल!' दुसऱ्याच दिवशी दादाना बाईंचं निमंत्रण आलं. 'दादा, तुम्ही दिल्लीत रहावं, संघटनेसाठी तुमची गरज आहे.' असं श्रीमती गांधी यानी त्याना सांगितलं. बाईंनी त्यांना लगेच एक बंगलाही दिल्लीत दिला. दिल्लीत बंगला मिळणारे दादा पहिलेच खासदार होते!

१९८० च्या विधानसभा निवडणुकीनंतर दादानी मुख्यमंत्रिपदाची निवडणूक लढवू नये म्हणून इंदिरा गांधीनी असेच प्रयत्न केले होते. त्या वेळी त्यांनी दादाना उपमुख्यमंत्रिपदाचीही ऑफर देऊन पाहिली होती; परंतु दादांनी स्वाभिमानपूर्वक त्यास नकार दिला होता. श्रीमती गांधी याना दादाची ताकद ठाऊक असल्यानेच एक नकार देताना त्या त्याना एकदम ठोकरू शकल्या नाहीत!

गेल्या अडीच वर्षांत दादा अगदी गप्प नव्हते. तीन जानेवारी ८१ रोजी मुंबईत झालेल्या महाराष्ट्रातील खासदाराच्या बैठकीच्या निमित्ताने त्यांनी अंतुलेंच्या नेतृत्वाविरुद्ध जोरदार आवाज उठवला; परंतु त्यानंतर नेतृत्वाची माळ तिसऱ्याच व्यक्तीच्या गळ्यात पडली. भोसलेंविरुद्ध मात्र त्यानी उघड दंड थोपटले नाहीत. बंडखोरीला मात्र त्यांचा आशीर्वाद होता. या काळात ते बंगलोरला जाऊन निसर्गोपचार घेत होते. (७७ पूर्वीच्या दादांच्या संन्यासाशी या स्थितीची तुलाना करता येईल.)

महाराष्ट्रातील शुगर किंवा मराठा लॉबीचे वर्चस्व कमी करण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न इंदिरा गांधी यानी या काळात केले. त्यामुळे मराठा लॉबी खिळखिळी जरूर झाली; परंतु शासनव्यवस्था कोसळली, भ्रष्ट झाली! आंध्र–कर्नाटकातील पराभवाने त्याना शहाणपण शिकवलं. त्यामुळंच त्यांनी शुगरलॉबीशी तडजोड करण्याचा निर्णय घेतला.

पण या मधल्या काळात दादा काही मोडले नाहीत. तग धरून ते बसले आणि योग्य संधीचा फायदा घेऊन त्यांनी श्रीमती गांधीना तडजोड करायला लावली!

स्वातंत्र्यचळवळीतील भूमिगत कार्य आणि सहकारी क्षेत्रातील अफाट कर्तृत्व दादांच्या पाठीमागे आहे. लोकामध्ये त्यांच्याबद्दल आदर आहे. गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्राचा खेळखंडोबा झाला, तो फक्त जरी दादांनी थांबविला तरी पुरे!

— कपिल पाटील

---

# 'देवा, हिंदुस्थानात कम्युनिझम येऊ दे!'

## फिरोज रानडे

'देवा, हिंदुस्थानात कम्युनिझम् येऊ दे बाबा!' म्हणून श्यामने मोठ्या अगतिकपणे देवाची प्रार्थना केली; पण त्याचे त्यालाच हसू आले.

त्या प्रार्थना करण्यामागे एक कारण होते, तसेच त्या हसू येण्यामागे पण एक कारण होते.

दुपारी एक-दीडच्या सुमाराला मुंबईची बससेवा थोडी मरगळलेली असते. श्यामच्या घराजवळचा थांबा तसा महत्त्वाचा म्हणून प्रसिद्ध होता. सकाळ-संध्याकाळ जरी तेथे गर्दी असली तरी एक–दीडच्या सुमारास तेथे गर्दी नसे. ८–१० मिनिटे तेथे उभे राहिले की बस येई व त्या बसमध्ये सगळे उभे असलेले उतारू कोंबले जात असत.

पण आजची गोष्ट जरा वेगळी दिसत होती. श्याम थांब्यावर पोहोचला तेव्हा तेथे ५०–६० माणसाचा थवा होता. दहा–पंधरा मिनिटांनी एक बस आली. श्यामने थांब्यातल्या बाया–बापड्यांस आधी चढण्यास जागा दिली व मग स्वत: चढला, तर कंडक्टर म्हणाला, 'साहेब, नीचे उतरो!'

'अरे, पण अख्खा फुड-बोर्ड खाली है ना!' श्यामला आपल्या ह्या तरफदारीनंतर कंडक्टर नक्कीच आत येईल ह्याची खात्री होती.

'ओ बात नही है, 13 standing allowed होते है मैने १९ लिये है। फुटबोर्डपर खडा रहना कानूनी–जुल्म है। नीचे उतरो!'

'अरे हररोज हम १०–१५ आदमी सिर्फ फुटबोर्डपर खडे होके जाते है।' श्याम तसा चिवट होता व हातची बस सोडणे शहाणपणाचे ठरत नाही हे त्याला माहीत होते.

'वो बात दुसरी, आजकी दुसरी!'

'कैसे?' श्यामला आता दुसरीची उत्सुकता लागली; पण कंडक्टरला श्यामची उत्सुकता पुरी करण्याची आवश्यकता वाटली नाही. तो गरजला, 'पहले नीचे उतरो! जबतक नही उतरते तबतक गाडी खडी रहेगी!'

मलपृष्ठ १ वर

पुणे पोलीस

# धिंड....मारहाण....दहशत !

अंबादास तुकाराम गुजर; वय १९. गुजरचं घोरपडीपेठेत पानाचं दुकान आहे. दुकानाच्या शेजारी वाइनशॉप आहे. या शॉपमध्ये स्वारगेट-पोलीस नेहमी यायचे आणि अंबादासच्या दुकानात पान खाऊन जायचे. बहुतेक लोकाची कमी–अधिक उधारी थकलेली असायची; पण याची कोणतीही लेखी नोंद नव्हती.

१७ जानेवारी. त्या दिवशी सोमवार होता. अबादासच्या दुकानाला सुट्टी होती. तो सकाळी १०॥ ला घरातून निघाला. सात नंबर कॉलनीतून शंकरशेटरोडवर चालत गेला. तिथे ७ नं. कॉलनीजवळच्या स्टॉपवर कॉन्स्टेबल शंकर मारुती आल्हाट उभे होते. (युनिफॉर्ममध्ये) आल्हाट अंबादासच्या दुकानात सिगरेट–पान घ्यायला यायचे. आल्हाटांची ३२ रु. उधारी थकली होती. गेल्या ३–४ महिन्यांत आल्हाट दुकानावर आलेच नव्हते. ३–४ महिन्यापूर्वी एकदा अंबादासनं थकलेली उधारी मागितल्यापासून त्यांनी दुकानावर येणं बंद केलं होतं.

बसस्टॉपवर अबादासनं आल्हाटांना उधारी मागितली. बसस्टॉपवर १–२ लोक होते. आल्हाटनं मी उधारी देणार नाही असं सांगितलं. त्यावर अंबादासनं त्याचा शर्ट पकडला. आल्हाटनं त्याला खाली पाडलं. दुसऱ्या एका माणसानं सोडवासोडव केली आणि अंबादास घरी निघाला. तो घरी जात असतांना समोरून दोन पोलीस येत होते. गुजरनं त्याना पाहिलं नाही. ते दोघंजण बसस्टॉपवर गेले. तिथे त्याना आल्हाट भेटला असावा. कारण गुजरच्या मागून दोन पोलीस आणि आल्हाट तिथे आले आणि त्यांनी गुजरला मारायला सुरुवात केली. नंतर सायकलवर बसवून चौकीत नेलं. नेताना मधे उतरवून आणखी मारलं. चौकीत फौजदार रोकडे आणि कॉन्स्टेबल सूर्यवंशी होते. आल्हाटनं रोकडेला सागितलं की, 'यानं माझे दात पाडले.' रोकडेनं शिविगाळ करून गुजरला कपडे काढायला सागितले. फक्त एक अंडरपॅंट राहिली. मग गुजरला चौकीच्या बाहेर आणलं आणि तिथे रोडवरच गिरणीच्या पट्टयानं सूर्यवंशीनं मारायला सुरुवात केली. मधून मधून रस्त्यावर आपटत. अर्धा तास मारहाण चालू होती. सूर्यवंशी आणि इतर *कॉन्स्टेबल्स यांनी लाथा मारल्या.* हा प्रकार रोकडेच्या सांगण्याप्रमाणेच घडला. तोपर्यंत दुपारचे बारा वाजत आले होते.

पोलीसचौकीच्या समोरच नाझ हेअर सलून आहे. न्हाव्याचं नाव बाबूभाई शेख (इनायतुल्ला शेख रहिमतउल्ला) आहे. दुकान शेखच्या मुलाच्या नावावर आहे. बाराच्या सुमाराला शेख दुकानात एकटाच होता. दुकानात दोन पोलीस आले आणि त्याला म्हणाले, 'कात्री घेऊन चल. मुलाचे केस कापायचेत !' दुकानात कोणी नव्हतं म्हणून त्यानं पोलिसांनाच कात्री घेऊन जायला सांगितलं. शेख दुकानातून बघत होता. त्यानी गुजरचे केस कापले; पण ते नीट जमलं नाही म्हणून परत शेखला बोलावून क्षिरोच मशीन मारून घेतलं. शेखला दोन रु. दिले. केस कापल्यावर सूर्यवंशीनं त्याच्या गळयात दगडी पाटी (मुलांची) अडकवली. पाटीवर 'मी चोर आहे. मी x x आहे' असं खडूनं लिहिलेलं होतं. गुजरचे हात दोरीनं बांधून दोरी कॉन्स्टेबलनं मागे धरली. धिंड गुजरच्या घरावरून–कबरस्तानवरून–सोनवणे झोपडपट्टीकडे नेली. लोक जमा होऊन बघत होते. सूर्यवंशीने धिंड काढत असताना त्याला सतत 'मी चोर आहे, x x आहे' असं म्हणत रहायला सागितलं होतं. तो म्हणायचा थांबला की, मागून पट्टयानं मारायचे. धिंडीबरोबर ७–८ पोलीस आणि PSI होते. १००–१५० माणसं बरोबर चालली होती. दरम्यान स्थानिक फोटोग्राफरनं या प्रकाराचा फोटो काढला !

चौकीत आल्यावर गुजरला कपडे घालायला दिले. तीन कॉन्स्टेबलसनी त्याला रिक्षात घातले. (रिक्षात पाय ठेवतो तिथे त्याला झोपवून त्याच्या अंगावर पाय टाकले) आणि फरासखान्यात नेलं. संध्याकाळी एका फौजदारानं क्वार्टर आणली आणि गुजरला प्यायला सागितली; पण तो प्यायला नाही. त्याच फौजदारानं त्याला ससूनला नेलं. तिथे ससूनच्या फौजदारानं त्याच्या तोंडाचा वास घेतला. मग एक मलमाची टयूब घेतली आणि गाडीनं फरासखान्यात नेलं.

१८ तारखेला सकाळी १०॥ वाजता गुजरला कोर्टात आणलं, रिमाड घेतला आणि फरासखान्यात नेलं. संध्याकाळी त्याला खडक पोलिसस्टेशनला नेलं आणि सागितलं, हे कोणाला सांगू नकोस ८–१० दिवस इकडे फिरकू नकोस, नाही तर परत रिमांड घेतील आणि ५–६ महिने सज़ा होईल. तिथे गुजरचे वडील होते. वडिलांनी जामीन दिला आणि त्याला सोडवून आणलं. मग मेडिकल करून सर्टिफिकेट दिलं आणि घरी आले.

दुसऱ्या दिवशी दैनिकात बातमी आली– 'चौकशी करता असे आढळले की, गुजर त्या दिवशी चिक्कार दारू प्यायला होता आणि त्यानं त्याआधी २–३ लोकाना मारहाणही केली होती !'

### थिअरी आणि प्रॅक्टिकल

गुजरची धिंड काढली त्याच दिवशी दुपारी ३–३॥ च्या सुमाराला घोरपडीपेठेतील काही तरुण मुलं आणि सामाजिक कार्यकर्ते पोलीसकमिशनर ऑफिसकडे एक लेखी निवेदन घेऊन गेले. कमिशनर ऑफिसकडे नेलेल्या निषेध मोर्चात सुमारे १००–१५० माणसं होती. मोर्चात जमलेला जमाव उत्स्फूर्त होता. त्यात हनुमान ननावरे ( महाराष्ट्र युवा लोकदल अध्यक्ष ) मुकेश बामणे ( युवा लोकदल), मोहन वाडेकर (लोकदल) जनार्दन तिखे (जनता पार्टी), नंदकुमार गीर (कॉंग्रेस आय) इत्यादी वेगवेगळया पक्षाचे कार्यकर्ते होते. कमिशनर ऑफिसआवारात अॅड. विकास देशपांडे आणि मोर्चातल्या इतराची भेट झाली. निवेदनात म्हटलं होतं की, 'आरोपीवरचा गुन्हा फक्त पोलीस दाखल करून घेऊ शकतात; पण अशा प्रकारची धिंड काढा, रस्त्यात पट्टयानं बडवणं

बेकायदेशीर आहे. त्याबद्दल तीन दिवसाच्या आत कारवाई व्हावी.'

मोर्चा पांगला. रात्री ८॥–९ च्या सुमाराला विकास देशपांडे घोरपडीपेठेत गेले तेव्हा रस्त्यावर गर्दी होती. ( ACPचौकशीसाठी ) दरम्यान अंबादासची लवकरात लवकर वैद्यकीय तपासणी करावी अशी मागणी केली तेव्हा पोलीस टाळाटाळ करताहेत असं लक्षात आलं. गुजरला ससूनमध्ये नेलं आहे असं सांगत आणि ससूनमध्ये चौकशी केली तेव्हा अशा नावाची कोणीही व्यक्ती दाखल झाली नाही असं सांगितलं जाई. यावरून गुजर पोलीस-लॉकअपमध्येच मेला अशी अफवा पसरली. लोक एक्साइट झाले. नक्की काय प्रकार आहे ते पहाण्यासाठी माजी नगरसेवक– कल्याणकर, सयाजी साळुंके आणि प्रवीण कदम पोलिसांबरोबर जाऊन गुजर मेला नाही ना ते बघून आले. या वेळेपर्यंत धिंड काढतानाचा फोटो आणि बातमी सकाळ कचेरीत विकास देशपांडे पोचवून परत आले. तेव्हा पोलिसानी जमावाला पांगविण्यासाठी मारहाण करायला सुरुवात केली, जास्त पोलिस मागवून घेतले. लाठीमार करण्यासारखी परिस्थिती नसताना लाठीमार सुरू केला. लोक सैरावैरा पळू लागले. जमाव सुमारे ५००–६०० चा होता. विकास देशपांडे पोलिसाच्या मागे जाऊन हे करणं चुकीचं आहे असं सांगून, चौकीच्या अलीकडे स्कूटर ठेवलेली घ्यायला गेले. तेव्हा १।२ तडाखे देऊन देशपांडे आणि बरोबर असलेले वाडेकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आणि खडक पोलीसस्टेशनवर नेलं. तिथे कारखानीस ( PI ) होते. तिथे देशपांडेला बेडया घातल्या आणि खिडकीपाशी उभे केलं. पोलीस-लॉकअपमध्ये बेडया घालायला लागत नाहीत असं देशपांडे म्हणाला. तेव्हा 'ते थिअरीत असतं, प्रॅक्टिकल वेगळं असतं.' असं कारखानिसांनी सुनावलं. मग मारहाण सुरू झाली. बेल्ट, लाथा, काठ्या, केस ओढणं, शिव्या देणं चालू होतं. हवालदारापासून PI पर्यंत कोणीही येऊन बदडून जायचं अशा पद्धतीनं मारहाण केली!

रात्री २॥ ला DCP सुब्रह्मण्यम आले. त्याआधी वाडेकरला मारतानाचे आवाज येत होते. मग विकास देशपांडेकडे येऊन त्यांनी ३।४ तोंडात लगावल्या, bastard वगैरे शिव्या दिल्या आणि निघून गेले. पहाटे ५॥ ला तेथून बंडगार्डन पोलीसस्टेशनवर नेऊन त्रास दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी कोर्टाचं कामकाज सुरू होण्यापूर्वीच देशपांडेला कोर्टात आणलं. ( पोलीस-कस्टडी देता यावी म्हणून ) या वेळी वकिलामार्फत या प्रकाराबद्दल तक्रार करण्यात आली आणि पोलीस-कस्टडी देऊ नये, जामिनावर सोडण्याचा हुकूम द्यावा आणि त्वरित वैद्यकीय तपासणी व्हावी ( सेक्शन ५४ ) अशा मागण्या केल्या. देशपांडेला ससूनला न नेता येरवड्याच्या डॉक्टरकडे वैद्यकीय तपासणीसाठी नेलं. त्यापूर्वी बेकायदेशीर जमाव गोळा केल्याबद्दल आणि चौकीवर दगडफेक केल्याबद्दल पोलिसानी देशपांडेवर गुन्हा दाखल केला.

## साक्षी-पुरावे

बार-असोसिएशनने नेमलेल्या चौकशी समितीतर्फे अनेक साक्षी-पुरावे १८ तारखेला गोळा केले. त्यात प्रत्यक्ष धिंड बघणाऱ्यांच्या जबान्या घेतल्या. त्यात अंबादासची आई, तिची सून याच्या साक्षी आहेत. अंबादासची आई धिंड पाहून बेशुद्ध पडली. तिची भीतीने दातखीळ बसली!

अन्नपूर्णा गायकवाडच्या नवऱ्याला पोलिसानी काठ्या मारल्या. ती सोडवायला गेली तर तिलाही काठ्या मारल्या.

धिंड पाहिलेला तिवारी जबानीत सांगतो– पोलीस गुजरला धिंड चालू असताना 'पोलीस माझे माय-बाप माझ्या आईचे यार' असं म्हणायला लावत होते. तो थांबला की मारत होते.

१७ तारखेला सकाळी गुजरला मारहाण करत असताना मारुती पवार बघत होता. बरीच गर्दी जमली होती. पोलिसांनी लाठी मारून पांगापांग केली. पवारच्या दोन थोबाडात मारून चौकीत नेलं. पोलिसांनी गुद्धे मारले. रोकडे म्हणाला– 'या ×××ला कशाला आणलं!' आणि परत मारलं. मग गुजरची धिंड काढली. पवारलाही दोन काठ्या मारल्या, घड्याळाची काच फोडली. शिवीगाळ केली. मग ACP घोटेकडे पवारनं याचा जाब दिला– सही केली. रात्री रोकडे ड्रेसमध्ये पवारच्या घरी आले. त्याची जेवणं चालली होती. शिव्या देऊन जबाब का दिला म्हणून रोकडेनं जबरदस्त मारहाण केली. ओठ फाटला. सूर्यवंशीनं फाइल मारली. केस उपटले. त्याला अजून ऐकू येत नाही. बायका मारहाण करताना मध्ये पडल्या, तर एकीच्या डोक्यात काठी मारली, खोच पडली आणि तिलाही ससूनला न नेता येरवड्यालाच नेलं.

मनोहर कांबळे सांगतो, 'माझ्या घरासमोरचं घर पाडलं आहे. त्याची दगडं घोटेंनी १५।२० पोलिसाना उचलून टाकायला सांगितलं! माझी रिक्षा पोलीसव्हॅनजवळ होती तर रिक्षाच्या काचा फोडल्या, सीट्स फाडल्या.'

रामचंद्र बनसोडे सांगतो, '२५ स्पेशलचे आणि एक युनिफॉर्ममधला पोलीस माझ्या घरापाशी आले. माझ्या दाराशी सायकली होत्या तर ते सायकली उचलून आपटायचे. पोलिसानी एका टोपलीत दगडं आणली होती, त्यात लाब काठीही होती. आमच्या चौकीत काही दगडं टाकली आणि उरलेली चौकीवर नेली!

१९ तारखेच्या दैनिकात बातमी आली 'चिडलेल्या जमावाची पोलीसचौकीवर दगडफेक'

दगडफेक करणाऱ्या गुन्ह्याबद्दल १८ तारखेला २६ जणाना पकडण्यात आलं. ८।८ च्या ग्रुपनं फरासखान्यात आणलं. त्यापैकी अनेक लोक एकाच घरातले होते. ( वडील–मुलगा, मुलगा–मेव्हणा ) फरासखान्याचं गेट ते आतलं बाथरूमपर्यंत या लोकांची विवस्त्र करून परेड काढली. मुलासमोर बापाला आणि बापासमोर मुलाला विवस्त्र करून फिरवलं. मंगळवारी अटक केलेल्या या सव्वीस जणांना कोर्टात नेलं.

दगडफेकीच्या गुन्ह्यात पोलिसांनी कोणालाही पकडलं. पी. एन. राजभोज यांच्या पत्नीच्या अंत्ययात्रेत चाललेल्या काही लोकाना पोलिसांनी ताळा निर्माण करण्यासाठी पकडलं मारहाण केली. आणि 'दगडफेकीच्या गुन्ह्यात अडकवलं.

## बार अॅसोसिएशन

गुजर धिंड–प्रकरण आणि अॅड. विकास देशपांडे मारहाण–प्रकार घडल्यानंतर पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष डी. बी. बार-

सोडे यांच्या अध्यक्षतेखाली असोसिएशनची तातडीची सभा घेण्यात आली. सभेला उपाध्यक्ष शालिनी राणे उपस्थित नव्हत्या. अॅड. विकास देशपांडेला बेकायदा मारहाण केल्याच्या निषेधार्थ वकिलांचा मोर्चा पोलीस कमिशनर कचेरीवर न्यावा—यावर सभेत बहुमतानं निर्णय घेतला गेला.

१९ तारखेला सुमारे चारशे वकिलांनी शिवाजीनगर कोर्टापासून दुपारी बाराला कमिशनर कचेरीवर मोर्चा नेला आणि शिष्टमंडळातील डी. बी. बारसोडे विजयराव मोहिते, एम. आर. परांजपे, वसंतराव नेर्लेकर, सुरेश बोराटे, यांनी या प्रकारची चौकशी व कारवाई करण्याची तसंच संबधित पोलिसअधिकाऱ्याना निलंबित करण्याची मागणी केली.

वकिलांनी मोर्चा काढल्यानतर २।३ दिवसांनी असोसिएशनच्या उपाध्यक्ष शालिनी राणे यानी बारअसो. तर्फे ठराव करून वकिलांना मोर्चात सहभागी करून घेणं चुकीचं आहे अशा आशयाचं एक पत्रक प्रसिद्ध केलं.

असोसिएशनच्या ठरावाची कदर केली नाही म्हणून उपाध्यक्षावर सगळेच सभासद चिडले होते. या पत्रकाच्या आणि उपाध्यक्षांच्या भूमिकेच्या निषेधार्थ एम. व्ही. अकोलकराच्या अध्यक्षतेखाली बहुमतानं शालिनी राणे यांचं सभासदत्व पाच वर्षांसाठी रद्द करण्याचा असो. नं निर्णय घेतला.

◘

गुजरची धिंड आणि विकास देशपांडे मारहाण—प्रकरण सध्या शांत आहे. गुजर आणि देशपांडे दोघंही जामिनावर सुटले आहेत. नतर प्रश्न निर्माण झाला तो बार-असोसिएशनच्या भूमिकेबद्दलचा ! विकास देशपांडे एक सामान्य नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून या केसमध्ये गुंतला होता, वकील म्हणून नाही. म्हणून त्याची पाठराखण वकिलांच्या संघटनेनं करणं चुकीचं आहे ही शालिनी राणे यांची भूमिका अनेक बार-सभासदांना मान्य नाही. कारण विकास देशपांडे सामान्य नागरिक असला तरी बार असो. चा सभासद होता हे विसरून चालणार नाही! जोपर्यंत नागरिकांच्या नागरीहक्क संरक्षणासाठी एखादी संघटना स्वयंस्फूर्तीनं आणि लढाऊ वृत्तीनं उभी रहात नाही तोपर्यंत व्यावसायिक संघटनाचे असे आधार घेतले जाताततच.

अशा व्यावसायिक संघटनांचा उपयोग तत्काळ न्याय्य हक्काची मागणी करण्यासाठी होत असेल तर हे समर्थनीयही आहे. एखादा गुन्हा घडल्यानंतर, ते प्रकरण शात झाल्यावर PUCL सारख्या ( Peoples Union for Civil Liberties ) एखाद्या संघटनेनं त्याचा निषेध करण्यासाठी ठराव मांडणं किंवा स्वतंत्र चौकशी समिती नेमणं याचा फारसा उपयोग होतो असं आता तरी वाटत नाही.

कोर्टात एका वकिलाशी बोलले, तेव्हा ते म्हणाले, ' पोलिसांच्या गुडगिरीच्या—दादागिरीच्या आणि दहशतीच्या इतक्या भयानक केसेस आहेत; पण पोलिसाच्या भीतीमुळं त्या पुढंही येऊ शकत नाहीत. घोरपडीपेठेतलं धिंडप्रकरण त्या भागात नवीन नाही. याआधीही दोन लोकाची अशीच केस कापून धिंड काढली होती; पण ते दोघेही सराईत गुन्हेगार म्हणून बदनाम असल्यामुळे त्याच्याकडे कोणाचं विशेष लक्ष गेलं नाही. गेल्या वर्षी ९।१० सशयित आरोपीना पोलिसानी ज्ञानप्रबोधिनी शाळेवरून विवस्त्र करून, नाक घासत जायला लावलं ! फक्त एका दैनिकात याबद्दल छोटीशी बातमी आली. बाकी सगळं शांत ! पोलीसलॉकअपमध्ये ठेवल्यावर दुसऱ्या दिवशी मॅजिस्ट्रेटसमोर जबानी घेतात. विचारतात, ' पोलिसांनी त्रास दिला का ? ' पुढच्या अत्याचाराला घाबरून, चेहरा सुजलेला दिसत असताना, अंगावर माराच्या खुणा उघड दिसत असताना जबानीत ' नाही ' सांगितलं जातं. पुढच्या कायदेशीर सोपस्काराला सुरळीत सुरुवात होते.

पोलिसी अत्याचाराचा उघड निषेध करून त्यांना कायदा शिकवण्यासाठी खरंच काय करता येईल ?

—मेधा राजहंस

---

## नगर जिल्हा

# पोलिसी अत्याचारांची माळका !....

अहमदनगर जिल्ह्यातला टोकाचा तालुका अकोले—

त्या आदिवासी अकोले तालुक्यातलं राजरस्त्यापासून किती तरी आत असलेलं कोतुळ गाव— तालुका आदिवासी असला तरी कोतुळ तसं भासत नाही. जाता—येता ट्रक्स, ट्रॅक्टर्स, मोटारसायकल्स किती तरी भेटतात.

मुबलक पाण्यानं पिकविलेल्या उसाच्या बख्खळ पैशानं याचे खिले भरलेले; पण असे लाब—रुंद पसरलेल्या जमिनीचे जमीनदार ' देशमुख ' थोडेच. अर्ध्या—दीड एकराच्या जमीनदारांना मजुरी करण्याशिवाय पर्याय नसतो.

दि. २३।९।१९८२ रोजी विधानसभा आणि विधानपरिषदेत विरोधी पक्षीय आमदारानी कोतुळ आणि परितरातील दलितांच्यावरील अन्यायाला आणि झालेल्या खुनांना वाचा फोडली. माजी मुख्यमंत्री बाबासाहेबांनी प्रकरणात जातीनं लक्ष घालण्याचं आश्वासन दिलं आणि कोतुळ प्रकाशात आलं.

हरिजनवस्ती असलेला फक्त तीस घरांपुरताच नाही तर सबंध कोतुळात ' जोड ' सापडणं मुश्कील असा भगवान साळवे—

पायात त्याला ११ इंची वहाण लागायची, बंडीला ३।। मीटर कापड लागायचं. धान्याचं गच्च पोतं हा एका हिसक्यात उचलायचा— असला भीमकाय भगवान साळवे होत्याचा नव्हता झाला! २६ मे हा त्याच्या आयुष्यातला शेवटचा दिवस !

सकृत्दर्शनी हा खून आहे हे भासत असताना, बघणारे सागत असताना 'अपघाती मृत्यू ' असा शेरा मारून पोलीसअधिकाऱ्यांनी त्याची वासलात लावली !

यापूर्वी याच परिसरातील कुंभेफळच्या काशीनाथ पवार, गोंदुशीची चंद्रभागा साळवे, कोतुळचाच रामनाथ लोखंडे, तांभोळचा

भरत शिंदे, ब्राह्मणवाड्याचे श्रीधर शिंदे आणि हरिभाऊ शिंदे यांच्या झालेल्या संशयास्पद मृत्यूसंबंधी चौकशीची मागणी करण्यात आलेली होती. या दलितांच्या संशयास्पद मृत्यूंच्या चौकशीची मागणी करणारी निवेदने दि. २१।६।८२ व दि. ६।९।८२ रोजी स्थानिक पोलीस-अधिकारी–प्रशासकीय अधिकाऱ्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांना देण्यात आली, तरीही गुन्हेगार अजून मोकळे आहेत! गुन्हेगार स्थानिक 'देशमुख' आहेत आणि पोलीस-यंत्रणा त्यांना सामील आहे! म्हणून मुख्य-मंत्र्यांनी आदेश दिले तरी खुनी सापडणार नाहीत अशी उघड परिस्थिती आहे!

पोलीसअधिकाऱ्यांनी पैसे खाऊन प्रकरण दाबल्याची बोलवा आहे!

¤

ज्ञानेश्वरांचं नेवासे सर्वांना माहीत असेल. हे नेवासे आता तिथल्या पोलीसअधिका-ऱ्याच्या नावानं ओळखलं जातंय. नगर जिल्ह्यातला हा दुसऱ्या टोकाचा तालुका. इथला पोलीसअधिकारी स्वतःला या 'संस्था-नचा अधिपती' समजत असावा!

संघाच्या कामाकरता हिंडणारे संघाचे प्रचारक श्री. गद्रे गाडीची वाट बघत रस्त्यावर थांबलेले. वेळ संध्याकाळची. त्या रस्त्यावरून या पोलीसअधिकाऱ्याची गाडी चाललेली. त्यांनी यांना बघितलं. कोण? कुठले? काय करता? का थांबलात?–

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

# एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पुणे ३०

कोणतीच चौकशी न करता गद्रेंना पोलिसांनी गाडीत टाकलं. पोलीसस्टेशनला आणून मारहाण केली आणि वर पोलीसकस्टडीत रवानगी!

का? असं का? मारहाण कशासाठी? हे यांना विचारायचं कुणी? या प्रकरणाचेही पडसाद विधानसभेत उमटले. पोलिसी दप्तरातील साहेबाच्या आदेशाने केलेल्या नोंदीच मंत्र्यांनी विधानसभेत वाचून दाखविल्या.

याच साहेबांच्या हाताखालच्या दोन कॉन्स्टेबलसनी गेल्या महिन्यात गावात असाच धुमाकूळ घातला. यांना लहर आली म्हणून एका हॉटेलचे दार त्यांनी अपरात्री ठोठावले. हॉटेलमध्ये अशा वेळी काही मिळणं शक्यच नव्हतं आणि काही मिळालं नाही. या कारणासाठी त्या दोन कॉन्स्टेबलसनी मालकावर सरळ गोळी झाडली! पोलि-सांच्या दरोडेखोरीचं यापेक्षा कोणतं उदा-हरण हवं?

¤

दि. १ एप्रिल १९७९ रोजी शिर्डीतील नागरिक आणि तिथले दारूविक्रेते यांच्यात भीषण दंगल झाली होती.

चोरून (?) चालविल्या जाणाऱ्या हात-भट्टया, विनापरवाना दारूची दुकाने, अमली पदार्थांचे अड्डे या देवस्थानी असू नयेत एवढीच त्यांची मागणी होती. म्हणून या संस्थानात चालणाऱ्या काळ्या धंद्याविरुद्ध नागरिकांनी मोहीम उघडली होती. निवेदने, शिष्टमंडळे इत्यादी मार्गांनी या मागण्या नागरिकांनी पोलीसअधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांच्या कानांवर घातल्या होत्या. तरीही कारवाई होत नाही हे लक्षात आल्यावर नागरिकांनी स्वतःच त्याची विल्हेवाट लावली– त्यातून उद्भवलेली १ एप्रिलची दंगल.

एवढा प्रकार घडून गेलेला होता तरी पुढचा अधिकारी काही शहाणा झाला नाही.

गेल्या आठवड्यात नगरजिल्ह्याचे कलेक्टर श्री. अनिलकुमार लखिना यांनी कार्यक-र्त्यांच्या तक्रारीवरून येथील 'नवजीवन' हॉटेलवर छापा टाकला. या छाप्यात ७ हजा-रांची बेकायदा दारू जप्त केली. हॉटेल-चालक जीवन नरसिंग जाधव आणि नरसा-बाई कराडे यांना अटक करण्यात आली. स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांकडून या धंद्याचं संरक्षण होतं म्हणून पोलिसांनी या उघड चालणाऱ्या धंद्याकडे दुर्लक्ष केलं– शिर्डी–पोलिसांच्या या कृत्याबद्दल लखिना यांना तीव्र नापसंती व्यक्त केली.

¤

श्रीरामपूर तालुक्यातील हरिगाव साखर-कारखान्याने ८१–८२ सालात कलेक्टरनी जाहीर केलेली वाढ दिली नाही. मागील व चालू वर्षाच्या खाड्याची भरपाई दिली नाही या व इतर मागण्यांसाठी झगडणाऱ्या ऊस-तोडणी कामगारानी २७ डिसें. ८२ रोजी कारखान्याच्या कार्यालयावर मोर्चा नेला. वाटाघाटीस नकार मिळाल्याने मजुरानी संप पुकारला. दि. ३० डिसेंबरला कारखान्याच्या गेटवर सभा झाली. त्यातील या कामगाराचे नेते सर्व श्रमिक संघाचे श्री. बावके यांनी आपल्या भाषणात पोलीसअधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांच्या पक्षपाती धोर-णाची चीरफाड केली. चिडलेले पोलीस-अधिकारी श्री. खिलारी यांनी श्री. बावके याना जबरदस्त मारहाण केली. बरोबरच्या मजुरांना पिटाळून लावले.

याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. या अन्या-याच्या निषेधार्थ आणि या पोलीसअधिका-ऱ्यावर कारवाई करावी या मागणीसाठी १२ जानेवारीला कामगारानी श्रीरामपुरात प्रचड मोर्चा काढला!

विभागीय पोलीसअधिकाऱ्यांनी चौक-शीचे आश्वासन दिले असले तरी सत्ताधारी राजकीय नेत्यांशी लागेबांधे असलेल्या या स्थानिक अधिकाऱ्याना जाब विचारणं त्याना थोडंच शक्य होणार आहे?

कारण प्रश्न त्यांच्याही अस्तित्वाचा आहे.

¤

दि. १३।२।८२. घटना संगमनेरची आहे. रिक्षावाल्यानं शिवी दिली म्हणून त्याला अडवून जाब विचारणाऱ्या कुंदन परदेशी आणि रिक्षावाल्यात बाचाबाची झाली. त्याचं निमित्त करून कुंदन परदेशीला अटक कर-ण्यात आली. बेदम मारहाण करून कस्टडीत बंद करण्यात आलं.

निमित्त बाचाबाचीचं असलं तरी कुंदन परदेशी पतितपावन संघटनेचा कार्यकर्ता आहे एवढं कारण त्यांना पुरेसं होतं.

शहराच्या भरवस्तीत चालणारा 'चक्री-

जुगार' बंद करावा म्हणून पतितपावन संघटनेनं दिलेल्या निवेदनाचा परिणाम म्हणून असेल, या वादावादीचं निमित्त करून संघटनेचा आणखी एक कार्यकर्ता भगवान गिते याला रात्री ११ वाजता पोलिसांनी ताब्यात घेतला. बेदम पिटला आणि कस्टडीत ठेवला. दुसऱ्या दिवशी कोर्टापुढं उभं केल्यावर आपल्याला झालेली मारहाण दोघांनी दाखवली. साहेबांनी मेडिकलची ऑर्डर केली. कोर्टानं सोडून दिलेलं असताना पोलिसांनी मेडिकलला न पाठवता त्यांना अडवून ठेवलं आणि 'असं का?' म्हणून जाब विचारायला गेलेल्या 'भाजप'चे शहराध्यक्ष श्री. राधावल्लभ कासट यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणला म्हणून आरोपपत्र दाखल केलं.

याही प्रकरणाचे पडसाद विधानपरिषदेत उमटले. कोपरगावचे उत्तमराव सूर्यभान पाटील वहाडणे यांनी या घटनेकडे लक्ष वेधले. पोलीसरेकॉर्डवरचं छापील उत्तर देण्यापलीकडे मंत्र्याकडे विशेष माहिती नव्हती.

'चक्रीजुगार' बंद झाल्यानं पोलिसांचं महिन्याचं तीन-चार हजाराचं उत्पन्न बुडालं अशी उघड चर्चा चालू आहे.

दि. ४ जानेवारीला ८ वीच्या इतिहासाच्या पुस्तकातील धडा रद्द केल्याच्या शासनाच्या निषेधार्थ पतितपावन संघटनेने 'शाळा बंद'चा कॉल दिलेला.

हे 'बंद'चे आंदोलन मोडून काढण्यासाठी जिल्ह्यातील आठ-दहा फौजदार, इन्स्पेक्टर्स, विभागीय पोलीसअधिकारी आणि दस्तुरखुद्द डी. एस्. पी. श्री. जाधव. जोडीला एस्. आर. पीं चा शस्त्रसज्ज ताफा. शहराला त्या दिवशी लष्करी छावणीचं स्वरूप आलेलं. सगळ्या शाळांवर जागते पहारे. पहाटे पाच वाजल्यापासून गस्त चालू!

आंदोलन मोडणं हा पोलिसांनी प्रतिष्ठेचा प्रश्न केला होता.

संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शाळांवर फक्त आवाहन करणारी पोस्टर्स लावलेली होती. संघटनेला झोडपायला पोलीस निमित्त शोधतायेत हे लक्षात आल्यावर त्या दिवशी कुणीही कार्यकर्ते शाळेवर फिरकले नाहीत. तरीही शाळा ओस पडल्या होत्या!

कार्यकर्त्यांवर पोलिसांनी भरलेल्या चॅप्टरकेसची तारीख त्या दिवशीच होती. त्या तारखेसाठी गेलेल्या बावीस कार्यकर्त्यांना पोलिसांनी कोठडीत बंद केलं. संघटनेचे अध्यक्ष राजा पाटील यांना अक्षरशः मारहाण करून रस्त्यावरून नेलं. केवळ दहशत बसविणं हाच त्याचा उद्देश होता!

आणि या संघटनेशी, 'बंद'शी कोणताही संबंध नसताना मेडिकल दुकानात औषध खरेदी करण्यासाठी गेलेल्या 'भाजप'च्या शहराध्यक्ष श्री. राधावल्लभ कासट यांना त्या दुकानातच अटक केली!


बहुधा जाब विचारण्याचं धारिष्ट्य दाखवलं, त्याची ही शिक्षा असावी! पोलिसांचा आकस स्पष्ट करायला एवढी घटना पुरेशी आहे.

पी. एस्. आय्. पवार यांच्या या अनाठायी कारवाईबद्दल नागरिकांच्यात तीव्र नाराजी आहे.

आणि एवढी कारवाई कशाबद्दल—? फक्त संघटनेनं भ्रष्टाचारविरोधी आंदोलन सुरू केलं, काळ्या धंद्याविरुद्ध मोहीम उघडली, शहरातली गुंडगिरी कमी व्हावी त्यासाठी आग्रह धरला म्हणून! आणि त्यामुळं पोलिसांचे हितसंबंध दुखावले म्हणूनही!

¤

नगर जिल्ह्यात घडलेली ही काही उदाहरणं— सामाजिक संघटनांतून, राजकीय पक्षांचे काम करणारे कार्यकर्ते अन्याय्य घटनेविरुद्ध आवाज उठवायला लागले की, पोलीस आणि कार्यकर्ते यांच्यात संघर्ष निर्माण होतो.



पतितपावनसंघटनाकृत
पोलीसनिषेध
संगमनेर

¤

अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या, अनिष्ट, भ्रष्ट गोष्टींविरुद्ध संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना पाठबळ द्यायचं—त्याऐवजी त्यांच्यावरच कारवाई करणारी ही यंत्रणा! समाजाचे संरक्षक (?)

यांना जनतेनं आपले मित्र कसं मानायचं? उघड्या डोळ्यांनी दिसणाऱ्या घटनांकडे स्पेसिफिक तक्रार नाही म्हणून दुर्लक्ष करायचं आणि हे सहन न होऊन एखादा पेटून उठला तर त्याचा आवाज बंद करायचा—म्हणजे पर्यायानं गुंडगिरीला संरक्षण द्यायचं. बड्यांचे हितसंबंध जपायचे. स्थानिक पुढाऱ्यांचं बटीक व्हायचं!

नगर जिल्ह्यातल्या वरील घटना याची साक्ष आहेत आणि हे सर्व समजत असूनही आपल्या अधिकाऱ्यांना संरक्षण देणारे जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी—मग दाद कोणाकडं मागायची?-उद्याच्या संघर्षाची बीजं आजच्या या घटनेत आहेत. दडपशाहीचा, दहशतीचा, अन्यायाचा उद्रेक झाल्याशिवाय थोडाच राहाणार! मग जनता जाब विचारायला नाही. कायदा हातात घेऊन शिक्षा द्यायला रस्त्यावर आल्यावर गुढगे टेकले तरी क्षमा मिळणार नाही!—

— विनय नगरकर

# राहुरी विद्यापीठ : कुलगुरू हटाव आंदोलन

नगर–नासिक मार्गावर नगरपासून तीस किलोमीटर अंतरावरचं साडेआठ हजार एकर भू-भाग असलेलं एक लांब–रुंद संस्थान–' महात्मा फुले कृषी विद्यापीठ. '

बहरलेली हिरवीगार झाडं, लगडलेल्या चिकू–डाळिंबांच्या बागा. लांब–रुंद नजरेच्याही टप्प्याबाहेर पसरलेली हिरवी शेतं. शास्त्रीय परिभाषेतले फलक. विद्यापीठाच्या सुंदर दगडी इमारती. अतिशय आखीव-रेखीव, देखणा, आकर्षक, सुंदर स्वच्छ परिसर. ' आधुनिक तीर्थक्षेत्र ' म्हणून पर्यटनखात्यानं आपल्या पुस्तिकेत समावेश करावा असा हा परिसर आजपर्यंत येता–जाता रस्त्यावरून न्याहाळलेला.

गेल्या आठ–दहा दिवसांत आलेल्या बातम्या वाचून प्रत्यक्षच बघावं या इराद्यानं मी विद्यापीठ-स्टॉपवर उतरलो.

गेटवर आठ–दहा पोलिसांचा ताफा. प्रवेशद्वारावरच ' कुलगुरू झिंदाबाद 'चा बॅनर. मी स्टॉपवर जरासा रेंगाळलो. चार–सहा विद्यार्थी बॅगा घेऊन उभे असलेले. सकाळीच ' सकाळ 'मधलं ' विद्यापीठ बंद'चं कुलगुरूंचं स्टेटमेंट वाचलं होतं. विद्यार्थी बहुधा परतायला लागले असावेत. विचारणार होतो तेवढ्यात आलेल्या एस. टी. तून ते थांबलेले विद्यार्थी निघून गेले. आत जायला वळलो. ' कुलगुरू झिंदाबाद 'च्या नाऱ्यात काळे चकचकीत डाबरी रस्ते रंगलेले. मधून-अधून ' कुलगुरू हटाव 'ची मागणीही रंगवलेली होती. रंगवलेले रस्ते बघत जरासा थांबलो. मागून एक विद्यार्थी आला. ' कुलगुरूंचं पॅनल जोरात दिसतंय ' म्हणत त्याला हटकलं. त्यानं माझ्याकडे बघितलं–फक्त छद्मी हसला. त्याच्याबरोबर चालता चालता मी रस्त्यावरच्या घोषणा मोठ्यानं वाचत होतो. चालता चालता तो एकदम फट्कन म्हणाला, ' विद्यापीठाचे कर्मचारी आणि यंत्रणा कामाला लागल्यावर मग काय ' झिंदाबादची ' आतषबाजी व्हायची रहाणार आहे ?' मात्रा बरोबर लागू पडली. तो विद्यार्थी बोलता झाला–एस. टी साठी थांबलेले विद्यार्थी परतीसाठी नव्हते. नगरला पत्रकारपरिषद होती. त्यासाठी काही विद्यार्थी नगरला गेलेले. मला माहिती पुरविणारा हा एमेस्सीचा विद्यार्थी सरळ वसतिगृहात त्यांच्या नेत्यांच्या रूमवर घेऊन गेला.

पदव्युत्तर कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थीसंसदेचा चेअरमन शरश्चंद्र गडाख,कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थी संसदेचा चेअरमन चंद्रकांत तांबे आणि एमेस्सीचा विद्यार्थी रवींद्र धनक हे या विद्यापीठातील विद्यार्थी आंदोलनाचं नेतृत्व करताहेत.

गेली वर्ष–दोन वर्षं आपल्या निरनिराळ्या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी आग्रह धरला होता. त्यासाठी चर्चा, भेटी, निवेदनं इ. सनदशीर मार्गानं विद्यार्थी आपलं म्हणणं मांडत होते. वेळोवेळी कुलगुरू, कुलसचिव आणि संबंधित अधिकारी–आदींबरोबर चर्चाही झाली; पण ' अडणारी गाडी ' पुढं सरकेना. अनुभव असा आला की, कुलगुरू विद्यापीठातील सगळ्याच कारभाराबद्दल अनभिज्ञ (?) विद्यार्थ्यांनी त्यांना सांगितलेल्या सगळ्याच घटना–गोष्टीविषयी ' असं ?, हे मला माहीतच नव्हतं. हे मला कधी समजलंच नाही '–असली उत्तरं मिळायची.

अशा कुलगुरूंकडून विद्यार्थ्यांनी न्यायाची अपेक्षा कशी करावी ?

शेवटी दि. १२ जानेवारी ८३ पासून विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन सुरू केलं.

विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर निदर्शनं केली. निषेध व्यक्त करण्यासाठी काळ्या फिती लावल्या. तरीही चर्चेची, तडजोडीची शक्यता दिसेना आणि म्हणून २० जानेवारी ८३ पासून पदव्युत्तर कृषी आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारला !

आंदोलनाची तीव्रता आणखी वाढली.

दि. २१ जानेवारी ८३ ला या निदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समोर काही कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या एका गटाने ' कुलगुरू झिंदाबाद 'च्या घोषणा सुरू केल्या. निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विरोधी घोषणा दिल्या. वातावरण शांत करण्याऐवजी आणखी तापविण्याचाच हा प्रयत्न होता. कुलगुरूंच्या बाजूने ' विद्यार्थी आंदोलनात ' कर्मचाऱ्यांनी सहभागी होण्याचा हा प्रकार अभूतपूर्व होता. विद्यार्थ्यांना भडकविण्याचा प्रयत्न झाला; पण तरीही आपला शांततामय आंदोलनाचा मार्ग विद्यार्थ्यांनी सोडला नाही. अगदी विद्यापीठाच्या आवारात कारण नसताना पोलीसपहारे बसले तरीही !

विद्यापीठाच्या दोन्ही शाखा मिळून तीनशेपर्यंत विद्यार्थी आहेत त्यातले तीस–चाळीस विद्यार्थी सोडले तर बाकी सर्वच विद्यार्थी कुलगुरूंच्या विरोधात खडे ठाकलेत. कुलगुरूंच्या बाजूचे हे तीस–चाळीस विद्यार्थीही या आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या ऐंशी टक्के मागण्यांशी सहमत आहेत. फक्त ' वरिष्ठांची मेहरनजर ' यासाठी त्यांचा हा ' झिंदाबाद 'चा खटाटोप !

मानसिंग शिगटे, मनोहर सावंत, जे. आर. पवार, बाळ देसाई, मनीषा कदम, तानाजी चोरगे, शिवाजी शिंदे, शिवाजी माने आदी कर्मचारी आणि अधिकारी कुलगुरूंची खिंड लढवताहेत, तर गोविंद परजणे हे खास पुण्याच्या कृषी महाविद्यालयातून राहुरीला डेरेदाखल झाले आहेत. गोविंद परजणे हे या विद्यापीठातील विद्यार्थीसंसदेचे माजी चेअरमन. या मागण्यांच्या संदर्भात खरं तर त्यांच्याच काळात आंदोलन व्हायचं; पण वरिष्ठांनी त्यांना ' सामावून ' घेण्याची तयारी दाखवली आणि आश्वासनाप्रमाणे पुण्याच्या कृषी महाविद्यालयात त्यांची वर्णी लावली.

## भ्रष्टाचार....नियमबाह्य कारभार

बेमुदत संप पुकारल्यावर आपल्या संपाच्या समर्थनार्थ विद्यार्थ्यांनी एक ३७ कलमी निवेदन कुलपती राज्यपाल लतिफ यांना पाठवले आहे. त्यात विद्यापीठातील भ्रष्टाचार आणि अवाढव्य अतिरेकी खर्चाची आणि नियमबाह्य कारभाराची जंत्रीच सादर केली आहे.

विद्यापीठाच्या वाहनांचा गैरवापर, देय नसलेल्या विशेष वेतनाचा वापर, विद्यापीठाच्या कार्यकारी सभासदाची प्रवासभत्त्याची खोटी बिले, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात न घेता अधिकाऱ्यांच्या, कर्मचाऱ्याच्या मनमानी बदल्या, मर्जीतल्या पण आवश्यकता नसलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यासाठी केलेली फोनची सोय, विद्यापीठखर्चाने अधिकाऱ्यांचे अनावश्यक दौरे, स्पोर्टस् ऑफिसरला अनधिकृत रीतीने वापरासाठी दिलेली मोटारसायकल, टेन्डर मागवून विक्री न करता प्रत्यक्षपणे केलेली उत्पादित मालाची विक्री आणि 'प्रक्षेत्र संचालक' या नावाऐवजी वैयक्तिक शिवाजी शेंडे याच्या नावे मागविलेली रक्कम आणि त्याचा हिशोब, अर्थसंकल्पीय तरतुदीशिवाय केलेली बेकायदेशीर बांधकामे, विद्यापीठाच्या बसचा महिला मंडळाने केलेला सहलीसाठी वापर–ही त्यातली काही ठळक कलमं!

आणि या सगळ्यात गुंतलेल्या अधिकाऱ्यांना आणि या अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानं कारभार करणाऱ्या कुलगुरू दत्ताजीराव साळुंखे यांना विद्यार्थ्यांच्या 'होस्टेलमध्ये आवश्यक असलेल्या सुविधा, वैद्यकीय सेवेची सवलत, प्रायोगिक उपकरणांची सोय, लायब्ररीची अपुरी व्यवस्था, विद्यार्थी संसदेसाठी कार्यालय, शैक्षणिक सहलीसाठीच्या सहाय्यात वाढ, गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ अशा मागण्याकडे लक्ष पुरवायला वेळ नाहीये.' विद्यार्थ्यांच्या ज्या मागण्या आर्थिक स्वरूपाच्या आहेत त्यावर 'आर्थिक तरतूद नाही' किंवा त्यासाठी पैसा उपलब्ध नाही असे सांगण्यात येते. मग ज्याची अर्थसंकल्पात तरतूद नाही, अशा किती तरी कारणांसाठी पैशाची उधळपट्टी चालू आहे

उपकरणाच्या खोलीसाठी वातानुकूलित युनिटची आवश्यकता असतानासुद्धा त्या युनिटचा वापर कुलगुरूंची केबिन वातानुकूलित करण्यासाठी करण्यात आला.

विद्यापीठातील या आणि अशा किती तरी भ्रष्टाचारी प्रकरणांची चौकशी करण्यासाठी यापूर्वी १९७८ च्या ऑगस्टमध्ये एकदा विद्यार्थ्यांनी संप केला होता. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार कुलपतींनी निवृत्त सेशनजज्ज श्री. डी. जी. ताटके यांचा एकसदस्य आयोग नेमला. विद्यापीठातील कारभाराचा ३७१ पानात केलेला पंचनामा आयोगाने दि. २७ जानेवारी १९७९ रोजी कुलपतींना सादर केला. या आयोगाने दोषी ठरविलेली अधिकारी मंडळीच अजून इथले शास्ते आहेत! त्यांच्या सल्ल्याशिवाय कुलगुरूचे पान हालत नाही आणि विद्यापीठावर राज्य करणारा हा कुलगुरूंचा सल्लागार कंपू–त्यांना जाब विचारणं कुलगुरूंना शक्य नाही! तेव्हा हा कारभार सुधारायचा असेल तर नुसती या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करून भागणार नाही. कारण कुलगुरू कितीही 'इनोसंट (?)' असले तरीही त्यांचं मन चांगल्या सल्ल्यात रमत नाही! समर्थपणे विद्यापीठाचं प्रशासन चालवणं त्यांना जमणे नाही. तेव्हा विद्यापीठ वाचवायचं असेल तर कुलगुरु हटलेच पाहिजेत या मागणीनं जोर धरला.

आणि इतके दिवस रेंगाळत चाललेलं हे आंदोलन पेटायला तत्कालीन कारण घडलं. विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या कोड ऑफ कंडक्टचं! २३ फेब्रु. १९८२ रोजी विद्यापीठाच्या शिक्षणसमितीनं एक ठराव मंजूर केला. त्या ठरावातील १४ वं कलम असे–

'विद्यार्थ्यांनी विद्यापीठप्रशासनाच्या विरोधामध्ये कोणत्याही प्रकारची चळवळ किंवा आंदोलन करू नये. अन्यथा त्या संस्थेच्या प्रमुखास, त्याला योग्य वाटेल अशी कृती (विद्यार्थ्यांविरुद्ध शिक्षा या स्वरूपात) करू शकेल.'

कलम १५–

संस्थेचे प्रमुख खाली नमूद केल्याप्रमाणं कोणतीही शिक्षा किंवा दंड विद्यार्थ्यांवर लादू शकतो– (१) दंडआकारणी. (२) शुल्क किंवा अनामत रक्कम जप्त करणे. (३) गुणवत्ता-शिष्यवृत्त्या रद्द करणे. (४) सत्र रद्द करणे. (५) कोर्सेस रद्द करणे. (६) विद्यापीठामधून/शिक्षणसंस्थेमधून विद्यार्थ्यांना काढून टाकणे.

या अन्याय्य ठरावाविरुद्ध विद्यार्थी पेटून उठले!

विद्यापीठ विद्यार्थी संसदेच्या घटनेतील विद्यार्थी संसदेचे हक्क आणि जबाबदाऱ्यांविषयीच्या ठरावाची या कलमांनी पायमल्ली होते. विद्यापीठाची ही कृती भारतीय राज्यघटनेच्या १९ व्या कलमाविरुद्ध असून त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कांचीच पायमल्ली होते आहे तेव्हा सदरचा ठराव ताबडतोब रद्द करावा अशी एकमुखी मागणी करण्यात आली, आणि असा 'हुकूमशाही काळा कायदा' काढणाऱ्या कुलगुरूंना हटविण्याची मागणी पुढे आली!

कोणत्याही बाबतीत विद्यार्थ्यांना विश्वासात न घेता, त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष न देता, सामंजस्याने विचार न करता, 'आपलं तेच खरं' या वृत्तीमुळं आणि भोवती जमविलेल्या सल्लागारांच्या गोतावळ्यामुळं कुलगुरू निःपक्षपाती निर्णय घेऊ शकत नाहीत. ताटके कमिशनने दोषी ठरविल्यावरही त्या भ्रष्ट आणि गैरकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणारे, त्यांना जाब विचारण्याऐवजी अशा मर्जीतल्या सर्वांनाच आपल्या 'दरबारात' सुवर्णपदकाची खैरात करणारे कुलगुरू आपल्याला न्याय देऊ शकणार नाहीत अशी खात्री पटल्यानेच विद्यार्थी एवढी टोकाची भूमिका घेऊन उभे ठाकलेत!

आवश्यक त्या शैक्षणिक गुणवत्तेचा अभाव असलेले विद्यापीठाचे स्पोर्टस ऑफिसर श्री. तानाजीराव चोरगे याच्याविषयी विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांबरोबरच्या वर्तणुकीसंदर्भात, त्यांच्या अरेरावीच्या आणि दादागिरीच्या प्रवृत्तीकडे आणि एकूणच त्यांच्या कामाबद्दल विद्यार्थ्यांच्यात तीव्र असंतोष आहे. विद्यार्थ्यांनी त्यासाठी दि. २० जानेवारी ८३ ला रजिस्ट्रार यांची भेट घेतली. त्यांच्या कारभाराची उदाहरणे सादर केली. 'कोणत्याही चौकशीशिवाय मी चोरगेंना त्वरित स्पस्पेंड करतो' असे आश्वासन रजिस्ट्रारनी दिले; पण अट घातली आंदोलन थांबविण्याची! विद्यार्थ्यांनी नकार दिला. कारण ही सौदेबाजी त्यांना नामंजूर होती!

दरम्यान विद्यापीठाच्या डीननी दि. २४ जानेवारीपर्यंत नियमितपणे क्लासमध्ये हजर रहाण्याचे ताकीद–आवाहन केले. दस्तुरखुद्द

कुलगुरू दत्ताजीराव साळुंखे यांनी दि. २४ जानेवारीला मीटिंग बोलविण्याची तयारी दर्शविली. मीटिंगमध्ये विद्यार्थ्यांच्या कोणत्याही प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. गैरकारभाराच्या तक्रारीविषयी तो प्रशासकीय मामला आहे. विद्यार्थ्यांनी त्यात दखल घेण्याचे कारण नाही असे उत्तर देण्यात आले. गोलमाल चर्चेत मीटिंग संपली.

आंदोलन मागे घेण्याचे कुलगुरूंचे आवाहन विद्यार्थ्यांनी फेटाळून लावले !

## आंदोलन फैलावले

आपल्या आंदोलनाला सर्व थरांतून पाठिंबा मिळावा यासाठी विद्यार्थी कार्यकर्ते या भागातील विविध राजकीय नेत्यांना, कार्यकर्त्यांना, प्रशासकीय अधिकाऱ्यांना भेटले. खासदार बाळासाहेब विखे पाटील, जनता पक्षनेते आमदार बबनराव ढाकणे, मृणाल गोरे, कुमार सप्तर्षी, शेतकरी संघटनेचे नेते अरुण घोडे पाटील, आमदार बबनराव पाचपुते आदींनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर करून विद्यापीठाच्या कारभाराच्या चौकशीची मागणी केली आहे. पक्षोपपक्षांच्या नेत्यांनी आपले वजन आंदोलनकर्त्यांच्या पारड्यात टाकल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. प्रशासन हादरले आहे !

या सर्वांची प्रतिक्रिया मात्र उलट झाली. विद्यापीठ प्रशासनाने कृषी अभियांत्रिकी आणि पदव्युत्तर शिक्षणसंस्था दि. २९ जानेवारी ८३ पासून बेमुदत बंद करण्याचा फतवा काढला. त्याचबरोबर दि. २९ च्या संध्याकाळी पाच वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी होस्टेल खाली करावं असाही आदेश जारी करण्यात आला.

दिलेल्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी होस्टेल सोडले नाही तर नाइलाजाने पोलिसअधिकाऱ्यांची मदत घेऊन अम्मलबजावणी करावी लागेल असा सज्जड दमही भरण्यात आला !

विद्यार्थी शांतपणे होस्टेलच्या बाहेर आले. आपल्या खोल्या कुलुपबंद केल्या आणि मोर्चानं शहरात निघाले. कुलुपबंद खोल्यांना विद्यापीठ अधिकाऱ्यांनी सीलबंद केलं. विद्यार्थी नेत्यांनी कोर्टात 'स्टे ऑर्डर'साठी अर्ज दाखल केला. सुनावणीच्या वेळी कोर्टानं विद्यापीठ प्रशासनाकडे 'हरकती' विषयी विचारणा केली. 'विद्यार्थी गैर वागले गैरवर्तणूक घडलेली आहे'– विद्यापीठानं कारण दाखवलं.

'कसली गैरवर्तणूक ?'– विद्यापीठ इमारतीसमोर निदर्शनं केली, घोषणा दिल्या आपल्या मागण्यांसाठी मोर्चा काढला, निवेदन केलं.

– तो तर त्यांचा हक्क आहे !

कोर्टानं विद्यापीठ आदेशाविरुद्ध 'स्टे ऑर्डर' मंजूर केली दि. ७।२।८३ पर्यंत. सकाळी मोर्चानं शहरात गेलेले विद्यार्थी पुन्हा संध्याकाळी सन्मानानं आपापल्या रूममध्ये परतले.

बाजी विद्यार्थ्यांनी जिंकली होती !

¤

मी कुलगुरूंना भेटायला गेलो. त्यांचंही म्हणणं समजावून घेणं अगत्याचं होतं.

बंगल्याजवळ जाताच आठ–दहा पोलिसांनी एकदम कोंडाळं केलं. साहेबांना भेटायचंय म्हणून सिक्युरिटी गार्डला सांगितलं.

तो विचारून आला– साहेब भेटणार नाहीत म्हणाला.

का आलो होतो हे त्याला पुन्हा कळवायला सांगितलं. पुन्हा नकार! आमच्या पी. ए. ना भेटा म्हणाले. तेवढ्यात पी. ए. धापा टाकत सायकलवरून उतरले. मी त्यांना प्रयोजन सांगितलं, फक्त पाच मिनिटं हवी आहेत म्हणून सांगितलं. त्यांचा पुन्हा नकार.

जास्त आग्रह धरण्यात अर्थ नव्हता. कदाचित सांगण्यासारखं काही नसेल हेही भेट नाकारण्याचं कारण असू शकतं.

¤

विद्यापीठाला आपल्या जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांचा विद्यापीठ हा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळं परिसरातील काय चाललंय म्हणून बघायला येणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

मी गेलो तेव्हा पंधरा-वीस शेतकरी जिपनं आलेले.

आधी कुलगुरूंकडे गेले होते. मन:स्थिती ठीक नसल्यानं कुलगुरू भेटू शकणार नाहीत असं त्यांना सांगण्यात आलं होतं.

ते विद्यार्थ्यांना भेटले–ऐकलं–विचारलं, पटल्यावर त्यांच्यातला एक म्हणाला, 'तुमच्यानं नाही जमलं तर पाहू आम्ही. काढू आमच्या पाभरीच रुमणं, मग तर जमल का नाही ?'

यांच्या अशा पाठिंब्यामुळं बेमुदत लढायचा प्रसंग आला तरी विद्यार्थी आता मागे हटणार नाहीत !

आंदोलन सुरू होऊन पंधरा दिवस होतायेत. या पंधरा दिवसांत विद्यापीठाच्या आवारात एकही अनुचित प्रकार आंदोलकांकडून घडलेला नाही !

या आंदोलनाची माहिती राज्यात इतरत्र व्हावी यासाठी एस. टी. बसेसवर 'कुलगुरू हटाव'ची पोस्टर्स लागली आहेत. या आंदोलनाच्या प्रसिद्धी आणि इतर खर्चासाठी स्कॉलरशिप मिळविणाऱ्यांनी आपली स्कॉलरशिप तर इतरांनी वर्गणी गोळा केली आहे.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पुणे, धुळे, कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे.

गेल्या सप्टेंबरमध्ये सेवकसंघाने केलेले आंदोलन प्रशासनाच्या 'फोडा व झोडा' या नीतीमुळे अयशस्वी झाले होते. तेव्हापासून भ्रष्ट कारभाराविषयी धुमसणाऱ्या असंतोषाच्या आज झालेल्या उद्रेकाला सेवक संघाचीही सहानुभूती आहे.

आंदोलनात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना दहशत बसावी म्हणून विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या पालकांना संभाव्य परिणामाची जाणीव दिली आहे.

आंदोलन दडपण्यासाठी पोलीसबळाचा विनाकारण वापर करण्यात येत असून आवश्यकता नसताना, आपली जबाबदारी न ओळखता राहुरीचे पोलीसअधिकारी 'जास्त कर्तव्य' करीत आहेत असा विद्यार्थ्यांचा आरोप आहे.

विद्यापीठ प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणांमुळे तडजोडीचे प्रयत्न करणाऱ्या कुमार सप्तर्षी यांचे मध्यस्थीचे प्रयत्न फसले आहेत. होस्टेल सोडण्याच्या आदेशानंतर कुलगुरुगटाच्या विद्यार्थ्यांची सोय 'मुळा डॅम'च्या रेस्ट हाउसवर करण्यात आली होती.

आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना आपली भूमिका समजावून सांगण्यासाठी दि. ३१।१।८३ पासून विद्यार्थ्यांनी 'जनजागरण' मोहीम हाती घेतली आहे.

शेतीव्यवसायाची अत्याधुनिक प्रयोगशाळा निर्माण होऊन या

प्रयोगशाळेतील संशोधनाचा लाभ महाराष्ट्रातील शेतकऱ्याना व्हावा, महाराष्ट्रातील शेतीचा शास्त्रशुद्ध विकास आणि शेतीसंबंधीच्या शास्त्रीय ज्ञानाचे पाठ शेतकऱ्याना मिळावेत यासाठी स्थापन केलेल्या ह्या विद्यापीठाला कंपूशाहीचं आणि गटबाजीचं ग्रहण लागलं आहे. कुलगुरू दत्ताजीराव साळुंखे हे जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ असतीलही पण ते कार्यक्षम प्रशासक मात्र नाहीत. आठ कोटी. रु. अंदाजपत्रकाचं आणि साडेआठ हजार एकराचा भूभाग असलेलं हे संस्थान चालविणं ही कुलगुरूंच्या आवाक्यातली बाब नाही.

विद्यापीठ हे खरं तर संस्कारकेन्द्र. न्याय–नीतीचे धडे शिकायचे तिथं विद्यार्थ्यांना 'गुरुजनांच्या भ्रष्ट आचरणाविरुद्ध सामना द्यावा लागतोय. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्याकडे दुर्लक्ष करून प्रश्न रेंगाळत ठेवले तर परिस्थिती आणखी चिघळणार आहे. तेव्हा त्यांच्या मागण्यांचा गंभीरपणे विचार करणं आणि प्रशासनाच्या भ्रष्टाचाराची समोर आणलेली प्रकरणं नि.पक्षपातीपणे तपासणं हेच यावरचं उत्तर असू शकतं. त्याशिवाय इथं कोणाचीच राजवट स्थिर होणार नाही आणि कुलगुरू यासाठी अडथळा बनणार असतील तर त्यांना हटवणं ही आजची आवश्यकता आहे.

शांततामय मार्गानं आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सहनशक्तीचा अंत बघण्यात तरी काय हशील आहे ?

— विनय गुणे

# आमचा या आंदोलनाला विरोध आहे !

पुण्याच्या उत्तरेला १६० कि. मी. अंतरावर राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात घडलेले नाटय.

जानेवारी १९८३ — नवीन सत्र नुकतेच सुरू झालेले.

संपाचा नारा पुकारला गेलेला असतो (कृषी विद्यापीठामध्ये यात नवीन काय ?)

संप हीच ज्यांची मनोवृत्ती असे विद्यार्थी कॉलेजला जात नव्हते. दिवसभरात अनेकदा घोषणा देत होते. ' कुलगुरू मुर्दाबाद ! '

पण ...

या संपाचा नारा झुगारून कॉलेजातील तासांना, न घाबरता, ताठ मानेने जाणारे बहुसंख्य विद्यार्थी.

तास संपल्यानंतर एकत्र येऊन घोषणा देत होते — 'कुलगुरु झिंदाबाद ! '

गेले १०–१२ दिवस कृषी विद्यापीठात असे आगळे आंदोलन लढवले जात आहे. खरे तर सप व आदोलन यामुळेच अनेक जण या विद्यापीठाला ओळखतात; पण या वेळच्या आदोलनाचे स्वरूप संपूर्णपणे वेगळे ठरले.

१९६८ मध्ये विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्रातील एकूण ९ जिल्हे येतात. (धुळे, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा व कोल्हापूर) पुणे, धुळे व कोल्हापूर येथे बी. एस्. सी. (अॅग्रि.) पर्यंत म्हणजे पदवीपूर्व शिक्षण घेण्याची सोय आहे. विद्यापीठाचा मध्यवर्ती परिसर राहुरी, जि. नगर येथे आहे. जवळजवळ ८००० एकर क्षेत्र मध्यवर्ती परिसरात आहे. या ठिकाणी B. Tech (Agri.) हा पदवीपूर्व अभ्यासक्रम व M. Sc. (Agri.) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविणारी महाविद्यालये आहेत. विद्यापीठाची अनेक ठिकाणी संशोधनकेंद्रे (उदा. पाडेगाव, जळगाव, माजरी इ. ) आहेत.

१९६८ साली विद्यापीठ स्थापन झाल्यापासून आजपर्यंतचे डॉ. दत्ताजीराव साळुंखे हे चौथे कुलगुरु. यापूर्वीच्या तीनपैकी दोन कुलगुरू ' हटाव ' मोहिमेमुळे आपल्या पदावरून निवृत्त झाले. केवळ डॉ. नानासाहेब पवार (दुसरे कुलगुरु) यांनी आपली कारकीर्द पूर्ण केली. जिल्हावाद हे या अस्थिरतेचे एक कारण आहे.

खरं तर कृषी विद्यापीठे महाराष्ट्रात चार ठिकाणी आहेत — दापोली, राहुरी, परभणी व अकोला; पण या प्रत्येक ठिकाणी जिल्हावादाचे खूळ जाऊन पोहोचले आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर प्राध्यापक व कर्मचारीवर्गात तीन गट निर्माण झाले. खानदेश, पुणे–नगर व पश्चिम महाराष्ट्र. येणारा नवीन कुलगुरु या तीन भागांपैकी कोणत्या भागात जन्माला आला हे फार महत्त्वाचे. कुलगुरू वरीलपैकी कोणत्या भागात जन्मला यावरून उरलेल्या कोणत्या दोन भागांतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी कुलगुरूंशी असहकार्य करायचे हे ठरणार !

विद्यार्थ्यांचे संप हे या विद्यापीठाला लागलेले ग्रहण आहे. प्रत्येक शैक्षणिक सत्रात एक संप होणारच ! दर सत्रात विद्यार्थ्यांवर नव्याने कोणता अन्याय झालेला असतो ? खरं तर संप कारणासाठीच होतो असे नाही. या संपाला कारणे शोधली जातात !

विद्यार्थ्यांच्या स्टुडंट कौन्सिलच्या चेअरमनला, त्याच्या वर्षभराच्या कारकीर्दीत, त्याने संप घडवून आणला नाही तर अस्वस्थ वाटते. आपली वर्षभराची कारकीर्द वृथा ठरली असे वाटते.

मी स्वत: या विद्यापीठात एम्. एस्. सी. च्या दुसऱ्या सत्राला आहे. बी. एस्. सी. ची सहा सत्रे व एम्. एस्. सी. ची ही दोन अशी मिळून मी एकूण ८ सत्रात ८ सप अनुभवले !

जिल्हावादाचे खूळ, जिल्ह्यानुसार गट ही येथील विद्यार्थ्यांमधील एक विचित्र परंपरा ! अनेकदा हा जिल्हावाद गंभीर थराला जाऊन पोहोचला. विद्यार्थ्यांमध्ये त्यावरून हाणामाऱ्या झाल्या. विद्यापीठ राहुरीत म्हणजे नगर जिल्ह्यात आणि त्यामुळे नगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी दूर-दूरच्या जिल्ह्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांवर दादागिरी करण्याचे प्रकार काही वर्षांपूर्वी येथे घडले !

राहुरीला, एम्. एस्-सी. साठी मी जुलै १९८२ मध्ये प्रवेश घेतला. अर्थातच पहिल्या सत्रात एक संप झालाच ! ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या, शैक्षणिक सहलीसाठी मिळणाऱ्या अनुदानात वाढ, पंखे–गीझर्स याची वसतिगृहात सोय, क्रीडास्पर्धांसाठी मिळणाऱ्या

भत्यात वाढ इ. मागण्या या संपासाठी होत्या.

याच संपाच्या काळात कृषी विद्यापीठ सेवक संघातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे आंदोलन चालू होते. चक्रीउपोषण, घोषणा, मोर्चा इ. स्वरूपात हे आदोलन चालू होते. कर्मचाऱ्यांच्या बदल्या, नियमानुसार गृहवाटप ( क्वार्टर्स ) इ. मागण्या त्याच्या होत्या.

विद्यार्थी-संपाबाबत कुलगुरूंनी सर्व विद्यार्थ्यांची असोसिएट-डीन व अन्य पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. योग्य मागण्या लगेच मान्य केल्या. कार्यावाहीस वेळ लागणाऱ्या मागण्यांबाबत आश्वासने दिली. विद्यार्थ्यांनी त्यांचा संप मागे घेतला.

सेवक सघाचे आदोलन मात्र चालूच होते. मुंबई हायकोर्टाने विद्यापीठ प्रशासनाला बदल्यासाठी अनुमती दिली. दि. ७ डिसेंबर-नंतर सेवक संघाने आपले आंदोलन मागे घेतले.

विद्यार्थ्यांचा संप सपल्यावर विद्यार्थी परिषदेची (स्टुडट कौन्सिल) या ८२–८३ वर्षासाठी अविरोध निवड झाली. **लक्षात घेण्याचा मुद्दा असा की, संपात नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना, विद्यार्थ्यांनी स्टुडंट कौन्सिलमध्ये येऊ दिले नाही !**

प्रथम सत्र संपले व दि. १३ डिसेंबरला विद्यार्थ्यांचे दुसरे सत्र सुरू झाले. नवीन सत्रात संप हवाच ! विद्यार्थी परिषद निवडणुकीत असंतुष्ट राहिलेले नेते व काही प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी व्यापक आदोलन करायचे ठरवले.

या वेळचे आंदोलन केवळ पदव्युत्तर महाविद्यालयासाठी राहणार नव्हते, ते सर्व कृषी महाविद्यालयांत जायला हवे होते. सर्व विद्यार्थ्यांना, जिव्हाळयाचा वाटेल असा एक मुद्दा शोधण्यात आला 'कोड ऑफ कंडक्ट' चा. या 'कोड ऑफ कडक्टनुसार' प्रशासनाविरुद्ध आदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड करणे, त्याचे सत्र रद्द करणे, त्यांना निलंबित करणे इ. गोष्टींचा अंतर्भाव होता. प्रत्यक्षात विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक कौन्सिलने हा कोड २३/२/१९८२ ( २३ फेब्रुवारी, ८२ ) च्या बैठकीत केवळ प्रस्ताव म्हणून मंजूर केला आहे, अद्याप त्याला कायद्याचे स्वरूप आलेले नाही. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर, यापूर्वी म्हटल्याप्रमाणे सप्टेंबर महिन्यात विद्यार्थ्यांचा संप झाला. त्या संपावेळेच्या मागण्यात हा कोड रद्द करण्याची मागणी नव्हती. ही मागणी याच वेळेस करण्यात आली. कारण या वेळेस हे आंदोलन कृषी विद्यापीठांतर्गत सर्वच महाविद्यालयांत पोचवायचे होते. पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या मागण्या पुण्यातील विद्यार्थ्यांना जिव्हाळयाच्या कशा वाटणार ? आणि त्यामुळेच सर्व विद्यार्थ्यांना जिव्हाळयाचा वाटेल असा मुद्दा या वेळेस शोधला गेला– 'कोड ऑफ कंडक्ट.' 'तुमच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आला आहे म्हणून उठा, जागे व्हा !' असे म्हणत सर्वत्र वातावरण चिघळवायचे, त्यातून पुढे भ्रष्टाचाराचे कोलीत पुढे करायचे व या सर्वांचे खापर कुलगुरूंवर फोडून 'कुलगुरु हटाव' मोहीम पुढे सरकवायची असा हा सर्व 'मास्टर प्लॅन' होता !

'कोड ऑफ कंडक्ट' तयार झाल्याची बातमी असंतुष्ट विद्यार्थ्यांनाच का लागावी ? याचे कारणच मुळी या असंतुष्ट विद्यार्थीमित्राना, कोणी तरी असंतुष्ट प्राध्यापक व कर्मचाऱ्यानी हाताशी धरले असे आहे. त्यांनी ही बातमी या विद्यार्थ्यांना पुरविली !

या विद्यापीठात विद्यार्थीहितासाठी होणाऱ्या काही गोष्टींचा उल्लेख करतो.

विद्यापीठातील सर्वच इमारती प्रशस्त व देखण्या आहेत. विद्यार्थ्यांचे वसतिगृह सोयींनी नटलेले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतत्र खोली, गॅलरी, रु. १.२० लिटर दराने मिळणारे दूध (दूध आदोलकांनी क्षमा करावी !), स्वस्त दरात अंडी, स्वच्छ स्वच्छतागृहे (!), याचबरोबर विविध क्रीडास्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुविधा–उदा. सामन्यांपूर्वी ५–६ दिवस पोटभर रिफ्रेशमेंट, प्रत्यक्ष सामन्याच्या वेळेस रु. १५।– दिन डी. ए, टी. ए., खेळाचा गणवेश विद्यापीठातर्फे, विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्याला रु. २०।– दिन डी. ए. व टी. ए. व ब्लेझर...एक ना दोन...अनेक सोयी ! विद्यार्थीप्रश्नाबाबत जिव्हाळयाने लक्ष घालणारे कुलगुरू ! हे कुलगुरू वसतिगृहात अनेकदा येतात. क्लब मेस चालू नव्हती, विद्यार्थ्यांना स्वतः स्वयंपाक करावा लागे. मेस बंद पडण्याचे कारण मेससाठी भांडी नव्हती. कुलगुरूंनी on the spot पैसे उपलब्ध केले ! वसतिगृहाचे रेक्टर व मॉनिटर जवळजवळ रोज वसतिगृहात येतात.

हे सर्व वाचल्यावर, या सुविधा बघितल्यावर 'आम्हाला गैरसोयी प्रचंड आहेत' असे म्हणणाऱ्यांना 'सुख टोचते' असेच म्हणावे लागेल !

ही सर्व पार्श्वभूमी सांगितल्यावर या वेळेस झालेल्या आंदोलनाचे आगळेवेगळे स्वरूप ध्यानात येईल. १७–१८ जानेवारीच्या सुमारास अनेकांना नव्याने येऊ घातलेल्या संपाची कुणकुण लागली. 'ही संपपरंपरा किती दिवस सहन करायची ?' असा विचार अनेकांच्या डोक्यात घोळू लागला. विनाकारण होणाऱ्या संपांचा उबग त्याना आला होता. 'या विद्यापीठात चाललंय तरी काय ? येथे शिक्षणाला पोषक वातावरण कधीच निर्माण होणार नाही का ?' हे प्रश्न अनेकाना पडले.

आणि मग ठरले की, कोणाच्याही दडपणाला भीक घालायची नाही, गुंडगिरीला कचरायचे नाही, छातीठोकपणे या संपाला विरोध करायचा ! भले मारहाण होईल; पण ही परंपरा, अनिष्ट रूढी मोडून काढायची असा अनेकांचा निश्चय होऊ लागला.

२० जानेवारी १९८२ ला सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची, कुलगुरू, डीन, असोसिएट डीन व अन्य अधिकाऱ्यासमवेत बैठक झाली. आदोलन, संप करणारे सुरुवातीपासूनच अर्वाच्य बोलत होते...... विभागप्रमुख आम्हाला या बैठकीच नकोत.' असे त्यांनी सागितले. बिचारे विभागप्रमुख ! खाली मान घालून गेले. 'कोड ऑफ कंडक्टमुळे आमच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला येतो, तो रद्द करा, मागे घ्या!' इ. विधाने त्यांनी केली. शिस्तीची आवश्यकता, त्यासाठी या कोडची आवश्यकता वाटणाऱ्या आमच्या गटाने 'आम्हाला हा कोड ऑफ कंडक्ट मान्य आहे' हे सागितले. गोंधळ, गडबडीला सुरुवात झाली. संपवाले हॉलबाहेर गेले व लगेचच घोषणा सुरू केली, 'हटाव हटाव, व्ही. सी. (Vice Chancellor) हटाव !' आत राहिलेल्या आमच्या गटाने प्रथम कुलगुरू व अन्य अधिकाऱ्यांना हॉलबाहेर जाऊ दिले व 'V. C. झिंदाबाद' ही घोषणा सुरू केली. (कोड ऑफ कंडक्टचे निमित्त करून 'कुलगुरू हटाव' मोहीम कशी पुढे सरकणार होती हे आता ध्यानात येईल.)

'कुलगुरु हटाव' मोहिमेला आम्ही प्रखर विरोध केला. भ्रष्टा-

चाराचा प्रश्न कुलगुरू हटवून संपणारा नव्हता. कुलगुरू स्वत: भ्रष्टाचार करत नाहीत. विद्यापीठात भ्रष्टाचार करणारे असंख्य अधिकारी आहेत. यांपैकी केवळ काहीजणांचीच उदाहरणे, संपवाल्या गटाने दिली, हा एक लक्षात घेण्याजोगा मुद्दा ! भ्रष्टाचाराची ही उदाहरणे या विद्यार्थ्यांना कोणी पुरविली ? काही प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी. साहजिकच त्यांनी वैयक्तिक हेवेदावे ज्यांच्याशी होते अशांचीच उदाहरणे पुरविली आणि हा भ्रष्टाचार दूर व्हावा म्हणून विद्यार्थ्यांनी शिक्षण सोडून संप करावयाचे !

भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी संपवाल्यांचा एककलमी कार्यक्रम 'कुलगुरू हटवा !' खरं तर मी उलटे लिहिले. कुलगुरू हटविण्यासाठी भ्रष्टाचार हे एक निमित्त पुढे करण्यात आले. कुलगुरू ज्यांच्या सल्ल्याने काम करतात, त्यांच्याच भ्रष्टाचाराची उदाहरणे आंदोलकांनी पुढे केली. या मागणीचे मूळ कुलगुरूंचा जन्म सातारा जिल्ह्यात झाला या सत्यात आहे ! कुलगुरू ज्यांचा सल्ला घेतात त्यांपैकी केवळ पश्चिम महाराष्ट्रात जन्माला आलेल्या अधिकाऱ्यांवरील भ्रष्टाचाराचे आरोप सादर करण्यात आले. म्हणजे भ्रष्टाचार दूर व्हावा यापेक्षा प. महाराष्ट्रातील कुलगुरू जावेत हे प्रधान उद्दिष्ट !

या जिल्हावादाच्या जोरावर पुणे व नगर येथील बहुतेक विद्यार्थ्यांना दडपणाने, आमिषाने खेचण्यात आले !

'भ्रष्टाचार हटवा' हेच जर उद्दिष्ट असते तर भ्रष्टाचार करणाऱ्या सर्वच अधिकाऱ्यांची (तथाकथित नगर, पुणे जिल्ह्यांतीलसुद्धा) उदाहरणे पुढे करण्यात आली असती; पण तसे होणारच नव्हते. याचे कारण, केवळ 'कुलगुरू हटवा' हेच या गटाचे उद्दिष्ट आहे.

अमेरिकेतून मुद्दाम बोलाविलेले, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. दत्ताजीराव साळुंखे यांना कुलगुरुपदावरून हटविण्याच्या मोठ्या योजनेचे हे सूत्र ! आम्हा विद्यार्थ्यांना हे का मान्य व्हावे ? 'कुलगुरू झिंदाबाद' ही घोषणा त्यामुळे सहजच पुढे आली. 'Right man in right chair – डॉ. दत्ताजीराव साळुंखे' ही घोषणा याचसाठी पुढे आली.

गुरुवार दि. २०–१–८३ या दिवशी मागे सांगितल्याप्रमाणे बैठक फिसकटली. शुक्रवारपासून आमच्या ७० जणांच्या गटातील विद्यार्थी निर्भयपणे, लेक्चर्स व प्रॅक्टिकल्सला जाऊ लागले. दडपणाला भीक घातली नाही.

आंदोलकांनी वैयक्तिक दमबाजी केली. 'कॉलेजला जाऊ नका ! जे जात नाहीत त्यांचा अभ्यास बुडतो.' आमचे सदस्य विचारत – 'गेलो तर काय होईल ?' 'बघून घेऊ !' आमच्या गटातील विद्यार्थ्यांनी न घाबरता उत्तरे दिली – 'घ्या बघून !'

आमच्यातील अनेक जण गरीब घरातून आलेले ! कोणाच्या तरी फायद्यासाठी शिक्षण सोडून हे उद्योग त्यांना कसे पटतील ? अशा रीतीने ८–१० दिवस आमचे आंदोलन प्रखरपणे चालू होते.


विद्यापीठाचे ब्रीदवाक्य आहे – 'अन्नम् बहु कुर्वीत । तत्व्रतम्' म्हणजेच हा देश 'सुजलाम् सुफलाम् करू' हे आमचे व्रत आहे – या उद्दिष्टपूर्तीसाठी आम्ही झगडायला नको का ?

–श्रीकांत करमरकर

---


गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

**राजहंसचे आगामी प्रकाशन**



# महात्मा आणि माणूस

**लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे**

**लवकरच प्रसिद्ध होत आहे !**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प आठवे : रविवार २४ ऑक्टोबर १९८२

## डॉ. म. वि. गोखले

**विनोद-व्याख्यानमालेतलं आठवं पुष्प वि. आ. बुवांवर होतं. बुवांनी आत्तापर्यंत अक्षरशः उदंड लिहिलं आहे. त्यांची प्रकाशित पुस्तकंच शंभराच्यावर आहेत आणि बुवांचं वैशिष्टय म्हणजे ही सगळी पुस्तकं विनोदी लिखाणाची आहेत.**

**बुवांच्या लिखाणातलं वेगळेपण, त्यांच्या विनोदाची खास लकब आणि सामाजिक विसंगतीवर उपरोधानं बोट ठेवण्याची त्यांची पद्धत सांगताना डॉ. म. वि. गोखले म्हणाले–**

¤

'मराठी विनोद या व्याख्यानमालेतील आजचे हे आठवे व्याख्यान आहे; म्हणजे यापूर्वी आपली सात बुवांशी गाठ पडली आहे. आजचे बुवा आठवे ! कशी गंमत आहे बघा. विनोदातला वि; आठव्यातला आ आणि बुवा असे लक्षात घेतले की, 'वि. आ. बुवा' हे नाव होते. ह्या योगायोगाचे पाठबळ या माझ्या व्याख्यानाच्या मागे आहे, असे मी समजतो.

'विनोद' या विषयावरील भाषणाची सुरुवात केवळ एखाद्या विनोदी कोटीने करावी अशा हेतूने मी ही कोटी केलेली नसून असा विषय मांडण्याची ही स्वतः बुवाचीच पद्धत आहे. आपल्या विनोदी लेखनात त्यांनी अनेक विषय घेतले आहेत. त्यात आजची शिक्षण-पद्धती, विशेषतः अगदी लहान वयाच्या मुलाना शिकवण्याची पद्धती यावर त्याचा एक मजेशीर लेख आहे.

शिक्षणक्षेत्रात नेहमीच नवनवीन शोध लागत असतात, नवनवीन उपक्रम राबवले जात असतात. लहान मुलाना कसे शिकवावे हा विषय तर आता बेवारशीच झाला आहे आणि असे जेव्हा होते तेव्हा तो विषय तज्ज्ञांच्या मालकीचा न राहता तमाम पब्लिकच्या मालकीचा होतो. एक शिक्षणसज्ज्ञ त्यांनी स्वतः आपल्याच मुलाच्या बाबतीत केलेल्या प्रयोगाबद्दल सांगत होते. ते म्हणतात–'मी माझ्या मुलाला त्याच्या आवडीच्या वस्तूंपासून सुरू होणारी अक्षरे प्रथम शिकवली. तो मुलगाही ती लवकर शिकला. उदाहरणार्थ; तो रोज दूध पितो म्हणून 'द', त्या दुधात साखर घालतो म्हणून 'स' आणि ते दूध चमच्याने पितो म्हणून 'च' ! याप्रमाणे माझा मुलगा द, स, च ही अक्षरे लवकर शिकला. यावरून ही नवीन पद्धती सर्वांनी उपयोगात आणावी असे मला वाटते.' झाले ! मग ते खूळ सामान्यांच्याही डोक्यात शिरले. काही जणानी तर आपले हे घरगुती प्रयोग वाचकांच्या पत्रव्यवहारातून सर्वांना सांगितले–

'आमचा मिलिंद राणीच्या बागेत गेला की, त्याला हत्ती खूप आवडतो म्हणून त्यातला 'ह', लाडू हा त्याचा अत्यंत आवडीचा पदार्थ म्हणून त्यातला 'ल', याचप्रमाणे कलिंगडातला 'क' आणि टरबुजातला 'ट' अशी अक्षरे आम्ही त्याच्या आवडी लक्षात घेऊन त्याला शिकवली. आता आमचा मिलिंद किनई 'ह–ल–क–ट' हा शब्द सहज नी चांगला लिहितो !

बुवा कोणत्याही विषयाच्या आधीन न होता तटस्थपणे लिखाण करतात, त्याच्यात त्यामुळेच कोणत्याही विषयातली विसंगती शोधण्याचे अचाट सामर्थ्य आले आहे. यामुळे त्यांच्या लिखाणात विविधता आली आहे. अर्थात् कृत्रिमता भासू नये म्हणून ते स्वतःला त्यात झोकून देतात. यासाठीच निरनिराळया व्यक्तिरेखा निर्माण न करता ते स्वतःला त्यात गोवून घेतात. अगदीच ते अशक्य असेल तर स्वतःची साक्ष काढतात. या आत्मपरतेमुळे कृत्रिमता नाहीशी होऊन, विषयात अगदी खोलवर जाणे शक्य होते. या हव्यासापायी बुवा सामान्य विषयाचेही अवडंबर माजवून त्यातून हास्यनिर्मिती करू शकतात; पण केवळ हसवणे एवढेच बुवांच्या लिखाणाचे उद्दिष्ट आहे असे म्हणणे त्यांच्या लिखाणाला उणेपणा आणणारे ठरेल. त्याच्या लिखाणातील पुढील विषय पाहा–

बुवाच्या आत्मपर लिखाणात–'व्याख्याता या नात्याने मी', 'मला भेटलेली पहिली परस्त्री', 'माझी मेहुणी वयात येते', 'एका जाहिरातीला २२० मुली', 'माझ्या मेहुणीचं लग्न करायचंय', 'मला भेटलेली ग्रेट माणसं', 'माझे चरित्र : एक जमवाजमव', 'गिरगावचा माझा प्रवास' असे लेख आले आहेत. त्यांनी प्रचलित सामाजिक पद्धतीवर टीका करण्यासाठी–'तंगडीत तंगडी शिक्षण-पद्धती', 'समित्या नेमण्याची वेळकाढू कला', 'असे नवरे–अशा बायका', 'बायकांचा संप', 'ये रे ये रे पावसा' यांसारखे भेदक; पण विनोदप्रचुर लेख लिहिले. त्याचबरोबर 'पाचशे शब्दांत आयुष्यभर बोला', 'क्रियापदाची चार थोर घराणी', 'प्रेमाचं व्याकरण' यांसारखे लेख लिहून सामान्यांच्या व्यथा विनोदी शैलीत प्रकट केल्या. विनोदाच्या माध्यमातूनच त्यानी काही नव्या कल्पना माडून आपली निरीक्षणातली उद्योजकताही प्रकट केली. त्यामध्ये 'आत्महत्या मार्गदर्शन केन्द्र', 'नवरे सुधारण्याचे केन्द्र', 'काहीही विचारा केन्द्र', 'येथे ब्रह्मचारी मिळतात', 'सुखी जीवनाच्या किल्ल्याचा जुडगा' हे लेख आहेत. अशी त्याच्या विविध लेखाची यादी किती तरी लाबवर नेता येईल.

## विनोदाची ' खास ' लकब !

बुवांनी उदंड लिहिलं आहे. त्यांची केवळ प्रकाशित पुस्तकेच १०० च्या आसपास आहेत. इतरही लिखाण विपुल आहे. ४०० च्या वर तर रेडिओवरची वगैरे भाषणेच आहेत. सगळंच अफाट आहे ! शेकड्यातच मोजदाद करावी लागते म्हणूनच मी त्यांचं लेखन ' उदंड ' आहे असं म्हटलं; पण विशेषत्वाने सांगायची गोष्ट ही की, त्यानी केवळ विनोदी लिखाणच केले आहे. गेली ३० वर्षे ते सतत लिहीत आहेत. लेखाप्रमाणेच त्यांनी कथा, कादंबरी, लघुकथा, लघुनिबंध, तमाशा, कीर्तन, पटकथा, एकांकिका असे साहित्यातील अनेक साहित्यप्रकार हाताळले आहेत, हे त्यांनी स्वत.च लिहून ठेवलं आहे; पण तरीसुद्धा हे सर्व लिखाण केवळ विनोदी-शैलीतच केलं आहे हे लक्षात घ्यायला हवे.

बुवांच्या आरंभीच्या जीवनात विनोदाला अवसर नव्हता आणि जे पूर्वीच्या जीवनात नव्हते ते निर्माण करायचे याच एका हेतूने त्यांनी नंतरच्या जीवनात केवळ विनोदी लेखनच केले. अन्यथा आपण सर्व प्रकारचे लेखन करू शकतो याची त्यांना खात्री होती. १९५२ पासून त्यानी लिखाण करायला सुरवात केली. १९५३ मध्ये त्याचे ' अकलेचे तारे ' हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. इतका प्रचंड वेग त्यांच्या लेखनाला आला होता आणि विशेष म्हणजे हा सुरुवातीच्या काळातला वेग पुढेही तसाच कायम राहिला. १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या दिवशीच त्यांचे ' द्या टाळी ' हे दहावे पुस्तक प्रकाशित झाले. हे सर्व लिखाण विनोदी शैलीतलेच आहे. या घटनेबद्दल बुवा स्वतः म्हणतात, ' आज मी खऱ्या अर्थाने दशग्रंथी ब्राह्मण झालो. ' यात त्याची तृप्ततेची भावना प्रकटली आहे; पण ' दश–ग्रंथी ब्राह्मण ' ही कल्पना त्यांना सुचली हे लक्षात घ्या. याऐवजी अमक्या चेंडूत अमुक रन्स किंवा इतक्या ओव्हर्समध्ये इतके बळी या थाटाची भाषा त्यांनी का वापरली नाही, तर त्यांच्या मनाचा पिंड फार वेगळा आहे म्हणून ही ' दशग्रंथी ब्राह्मणा ' ची कल्पना त्यांना सुचण्याचे कारण शोधताना त्यांच्या चारित्र्याची बैठक लक्षात घेणे आवश्यक आहे. या उद्गारामागे एक मोठी जीवनानुभूती उभी आहे. यासाठी त्यांच्या चारित्र्याची थोडी ओळख करून घेतली पाहिजे.

बुवा मूळचे पंढरपूरच्या एका कर्मठ सनातनी ब्राह्मणघराण्यात जन्मले. या आपल्या थोर घराण्याविषयी स्वतः ते म्हणतात, ' ब्रेकफास्टला अध्यात्म, लंचला नाममहात्म्य, डिनरला वेदान्त आणि सपरला भजन— अशा आमच्या घरात विनोदाचा वारासुद्धा लागणे कठीण ! ' अशा घरात आपली कशी कुचंबणा होत असे ते सांगताना ' ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ या संताचे आणि संध्या, पूजा, वैश्वदेव याचे मिश्रण असलेल्या त्या घरात अध्यात्म आणि वेदान्त यानी जागा व्यापल्यावर जी जागा उरत असे, त्यात आम्ही कुटुंबीय जगत होतो. सर्व घराण्यावर धार्मिक वातावरणाचा जबरस्त पगडा असे' या पद्धतीचे उद्गार काढले आहेत.

बुवांच्या घरचे संस्कार इतके कर्मठ, शिस्त एवढी कडक की बाहेरून मुलगा घरी आल्यावर — रस्त्यात काहीबाही पडलेले असते नी हा मुलगा नक्कीच त्यावर पाय देऊन वगैरे आला असणार हे गृहीतच धरलेले असायचे आणि शुद्धीसाठी आंघोळ करणे आवश्यक ठरायचे. बुवा म्हणतात, 'त्या काळात मी एवढ्या अॅडिशनल आंघोळी केल्या आहेत, की, त्या साठवल्या असत्या तर आंघोळ न करता इस्त्रीचे कपडे घालून, सेंट शिंपडून हिंडणाऱ्या मुंबईतल्या सर्व माणसाना मी आंघोळी घालू शकलो असतो ! ' आपल्या स्वतःच्या घरातल्या कर्मठ, सनातनी संस्कारांबद्दल त्यांना सांगायचे आहे; पण ते सांगताना बुवा या सर्वांची सांगड कुठे तरी आढळणाऱ्या सामाजिक परिस्थितीशी घालतात त्यामुळे, त्यातून विनोद निर्माण होतो, ही त्याची खास लकब आहे.

## विनोदी लेखक का झालो

आता स्वतःच्या जीवनाकडे जो एवढ्या डोळसपणे नी तेही विनोदी दृष्टीने पाहू शकतो तो लेखक भोवतालच्या जीवनाकडे किती सूक्ष्म आणि विनोदी दृष्टीने पाहील हे काय सांगावं ! त्यांच्या या दृष्टीचा एक नमुना खास पाहण्यासारखा आहे. ते म्हणतात की, एकदा अशी अवस्था त्याच्या वाट्याला आली की, त्यांना कोणत्याही गोष्टीचं विस्मरण म्हणून होईच ना. सगळं सारखं आठवतच राहिलं. डोकं म्हणजे नुसत स्मरणशक्तीचं गोडाउन झालं. यावरून त्याना गीतेतील श्रीकृष्ण आठवतो. श्रीकृष्ण अर्जुनाला सांगत असतो की, आपले दोघांचेही असंख्य जन्म झाले आहेत, तुला ते आठवत नाहीत, मला आठवतात. हा प्रसंग आठवण्याचे कारण देताना बुवा म्हणतात की, लहानपणी त्यांच्याकडून मारून-मुटकून गीता पाठ करून घेतली होती हे आहे; परंतु यातला खरा विनोद तर पुढेच आहे. गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला हे सांगताना म्हणतो ' बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन । ' पण याचा अर्थ बुवा सांगतात तो पहा— ' मी पुष्कळ मे महिने घालवलेत, तू मात्र चार जूनचा ! ' अशा प्रकारे आपल्याला जे विनोदी पद्धतीने मांडावयाचे असेल त्याचा आणि पूर्वायुष्यातील संस्कारांचा मिलाप त्यांनी अनेक ठिकाणी साधलेला दिसतो.

असे हे पंढरपुरी बुवा सध्या कल्याणवासी आहेत. ते मुंबईला V. J. T. I मध्ये नोकरी करतात. त्यामुळे मुंबईच्या बहुढंगी जीवनाचे अनेक पैलू त्यांच्या विनोदी लेखनाला विषय पुरवत आहेत. इथेच त्यांच्या लेखनाला आरंभ झाला तोही काहीशा चमत्कारजन्य परिस्थितीतच. अर्थात् बुवा म्हटले की, चमत्कार आलाच. बुवांचं हस्ताक्षर उत्तम आहे. त्याना चित्रकलेचीही आवड होती. ही त्यांची गुणवत्ता कल्याणच्या आसपास असलेल्या भगिनीमंडळाला माहिती झाली. मग या महिलांकडून बुवाना विनंती करण्यात आली की, त्यानी या महिलांच्या काही कथा उत्तम हस्ताक्षरात लिहून द्याव्या. बुवानी ही विनती मान्य केली. अशा कथा लिहिता लिहिता त्याना

# बुवांच्या विनोदाचं सामर्थ्य आत्मप्रत्ययात आहे !

कल्पना सुचली की, आपणच स्वतः काही का लिहू नये. यातूनच त्यांनी 'इंदुकला' नावाचे एक हस्तलिखित वार्षिक काढण्याचा उपक्रम सुरू केला. हे हस्तलिखित म्हणजे 'सबकुछ बुवा' असे. अनेक नामवंत लेखककवींचे साहित्य यात बुवा लिहीत. मग एखाद्या नामवंताकडे बुवा ते हस्तलिखित अभिप्रायार्थ घेऊन जात. एकदा असेच ते नवशक्तीत श्री. प्रभाकर पाध्ये यांच्याकडे गेले. पाध्ये यांना त्यामधील लिखाण आवडले. त्यात एक व्यावहारिक शब्दकोश होता. नित्याच्या जीवनातील शब्दांची विडंबनात्मक यादी असे त्याचे स्वरूप होते. या लेखनाचे वेगळेपण आवडल्यामुळं पाध्ये यांनी बुवाना वृत्तपत्रातून दर रविवारी स्तंभसदर अशा स्वरूपाचे लेखन करण्यास प्रवृत्त केले. बुवा लिहू लागले. त्यांचे विनोदगर्भ लेखन लोकांसमोर आले आणि लोकांना ते आवडलेही. आता हेच सारं स्वतः बुवा कसं सांगतात ते पहा–

'मी विनोदी लेखन उत्तम करीन असं गॅरंटीड भविष्य पाध्यांनी केलं. मी प्रभाकर पाध्यांचं फाइंड आहे. त्यामुळं मला कोणी विचारलं की, मी विनोदी लेखक का झालो तर त्याचं सरळ उत्तर मी देतो की–पाध्यांना सापडलो म्हणून!'

बुवा समजून चुकले होते की, आपल्याजवळ विनोदी लेखन करण्यासाठी आवश्यक ते सर्व आहे. त्यांना हस्तलिखित लिहायला देऊन भगिनीवर्गानं लेखनाकडं वळवलं याविषयी कृतज्ञता व्यक्त करतानाही त्यांनी विनोदाचाच आश्रय घेतला आहे. ते म्हणतात, 'बुवाला नेमकं महिलांचं साहाय्य व्हावं ही परंपरा की योगायोग?'

## खुसखुशीत उपरोध

बुवा सतत विनोदीच लिहीत असल्यामुळं त्यांना शब्दांबरोबर प्रसंग, स्वभाव, परिस्थिती या सर्वांत विनोद शोधण्याची आवश्यकता असते. तेथे त्यांना त्यांच्या स्वयंभू आणि अभिजात निरीक्षणशक्तीचा चांगला उपयोग होतो. आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या माणसांत, शेजारच्या घरात, स्वत:च्या व्यक्तिगत जीवनात, समाजात जी विसंगती आढळते, ती लोकांसमोर आणायची अशी लिखाणाची दृष्टी त्यांनी ठेवली. या दिशेने लेखन करीतच त्यांनी गेली ३० वर्षे आपले लेखन केले आहे. यामुळंच बुवांच्या विनोदाला कोणत्याही एखाद्या विशिष्ट क्षेत्रात बंदिस्त होणं आवडलेलं नाही. त्यांनी स्वत:च म्हटलंय त्याप्रमाणं त्यांनी कोणत्याही गुरूचा गंडा बांधलेला नाही. त्यांच्या विपुल लेखनकामाठीत कोणाला अन्य एखाद्या लेखकाशी बुवांची पद्धती जवळची आहे असं वाटलं तरी तसा शिक्का बुवांच्या सर्वच लेखनावर मारणं अन्यायकारक ठरेल. विनोदी लेखन करताना ते एखादी काल्पनिक व्यक्तिरेखा निर्माण न करता स्वतः आत्मप्रचीतीच्या स्वरूपात लिहितात. अशा स्वरूपात लिहिताना कधी अगदी अडचणच आली तर ते तिथे आपल्या एखाद्या मित्राचे नाव घालतात; पण स्वतःची हजेरी कायम ठेवतात. इथेच ते इतर विनोदी लेखकांपेक्षा वेगळे भासतात. हा आत्मप्रत्यय हेच त्यांच्या लिखाणाचे सामर्थ्य आहे. असेच बुवांच्या विनोदाला एखाद्या विशिष्ट क्षेत्रात बंदिस्त होणे आवडलेले नाही, हेही त्यांचे लेखन वाचताना सतत जाणवत राहते.

बुवांनी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांप्रमाणे समाजातल्या अशुद्धावर लिहिलंय; पण ते अस्वस्थ करणाऱ्या पद्धतीनं नव्हे तर रोचक, रंजक पद्धतीनं! बुवांच्या लेखनातही बुद्धीची चमक आहे; पण विनोद साधताना ते कोल्हटकरांपेक्षा अधिक मोकळे झालेले दिसतात. त्यांच्या लेखनात आत्मप्रत्ययाची खूण असते, तिऱ्हाइताची तटस्थ भूमिका नसते. एकदा त्यांनी परमेश्वराचीच मुलाखत घेतली आहे. त्यात त्यांनी परमेश्वराला जे प्रश्न विचारले आहेत ते बघण्यासारखे आहेत–

बुवा विचारतात, 'काय रे परमेश्वरा, तुझी उत्पत्ती कशी झाली?'

यावर पमेश्वर खट्टू चेहऱ्याने म्हणतो, 'या प्रश्नाने मारली का तुम्ही ग्यानबाची मेख! मी स्वतःच अनेक वर्षे या गोष्टीचा विचार करतोय. मी माणूस असतो तर 'मी कसा झालो?' हे पुस्तक लिहून पटकन् तुम्हाला उत्तर दिलं असतं; परंतु मी पडलो अनादि परमेश्वर! मला आई–बाप होते की नाही आठवत नाही; पण आई–बाप नसतील तर मी कसा झालो?'

परमेश्वरालासुद्धा कोड्यात टाकणारा प्रश्न बुवा विचारतात. त्याचं उत्तरही तितक्याच मार्मिकपणे परमेश्वराकडून वदवितात. अनादि, मी कसा झालो (पुस्तक) हे सर्व त्यांच्या भोवतालचं सतत त्यांच्या डोक्यात घोळणारं आहे आणि कोणत्या वेळी नेमकं काय वापरायचं हे कौशल्य त्यांना बरोबर जमलंय! यामुळं बुवांना विषयांची आणि त्यांच्या मांडणीची कधीच अडचण पडत नाही. यानंतर परमेश्वराला बुवांनी त्याच्या अमरत्वाविषयी प्रश्न विचारलाय आणि परमेश्वरानंही तितक्याच मार्मिकपणे त्याचं उत्तर दिलंय– परमेश्वर सांगतो,–

'प्रत्येकाला सर्वसाधारणपणे मी शंभर वर्षांचं आयुष्य देतो; पण माणसं एवढं आयुष्य जगू शकत नाहीत. साधारणपणे ४० ते ६० वर्षे माणूस जगतो. त्याची उरलेली वर्षे दरवेळी माझ्या खात्यात जमा होत राहतात आणि तीच मला पुढे जगायला उपयोगी पडतात!'

अशा पद्धतीने परमेश्वराच्या अमरत्वाचा आणि माणसांच्या आयुर्मर्यादेचा हिशेब बुवा या प्रकारे मिटवतात. याच मुलाखतीत आपल्याला असलेली विनोदबुद्धी बुवांनी परमेश्वराला दिली आहे. पाहा–

प्रश्न: 'देवा, तू स्वतःला नेहमी गरिबांचा पाठिराखा म्हणवतोस; पण सर्वत्र या गरिबांची नेहमी उपासमार चाललेली दिसते. हे कसे काय?'

उत्तर: 'माझ्यावर त्यांची पाठ राखायची जबाबदारी आहे–पोट राखण्याची नाही!'

प्रश्न: 'बरं भाषावार प्रांतरचनेसंबंधी तुझं काय मत आहे?'

उत्तर: 'खरं सांगू! माझा त्याला कसून विरोध आहे. कारण प्रत्येक माणूस माझी प्रार्थना करतो. त्यांच्या अनंत भाषा आहेत. त्या सर्वांचं निरनिराळ्या भाषातलं एकाच वेळी ऐकणं मला कसं शक्य आहे? मी परमेश्वर असलो तरीसुद्धा या सर्व प्रार्थना ऐकताना माझी फार त्रेधा-तिरपिट होते. अगदी सकाळी मुंबई आकाशवाणीवर 'घनःश्याम सुंदरा' सुरू झालं की मी लगेच महाराष्ट्राकडे वळतो. तेवढ्यात तिकडे गुजरातीत 'वैष्णव जन तो' हे सुरू होतं आणि मग असं होत होत मला गुजराथपासून तामिळनाडूपर्यंत

*जावे लागते. मी अगदी परमेश्वर असलो तरी माझी फार तारांबळ होते !'*

बुवानी परमेश्वराला मुलाखतीला आणून मोठीच मजा उडवून दिली आहे. त्यांची शब्दांवरची कसरत आणि ते पकडून ठेवण्याची त्यांची शक्ती वाखाणण्यासारखी आहे यात शंकाच नाही. शब्दप्रभू म्हणून राम गणेश गडकरी हे श्रेष्ठ आहेत; परतु विनोदी लेखनाच्या बाबतीत बोलायचं तर असं म्हणावं लागतं की, गडकरी विनोदी लेखनात सर्वसाधारणतः उच्चभ्रू समाज आणि त्याचा दांभिकपणा याविषयी चीड व्यक्त होते. त्याचा विनोद मनाला कापत जातो. कित्येकदा त्यात क्रूरतेचं दर्शन घडतं; पण बुवांचा याच प्रकारचा म्हणजे दंभाची चीरफाड करणारा विनोद मात्र प्रसन्न आणि खुसखुशीत उपरोधाचे समाधान देतो. यासाठी एक उदाहरण पाहू.

बुवांनी 'साधू सदाचारानंद याचे सेवेसी' हा लेख लिहून सामाजिक दंभावर कठोर प्रहार केले आहेत. यातील साधुमहाराजाकडे आलेली निरनिराळ्या व्यवसायातली मंडळी काय सागतात नि कसं सांगतात हे पाहण्यासारखं आहे.

**एक व्यापारी :** 'महाराज, अखेर पोलिसांना ५०० रुपये दिल्यावर त्यांचा विश्वास बसला. सज्जनांच्या शब्दावर विश्वास बसायला हल्ली ५०० रु. ते १००० रु. पडू लागलेत !'

**एक त्रस्त पत्नी :** 'माझ्या नवऱ्याला जंटलमन करा. त्यासाठी मी माझ्या बहिणीला तुमच्या सेवेसाठी पाठवते. साधूंकडे तरुण मुलगी सेवेला पाठवली तर ते लवकर प्रसन्न होऊन कृपा करतात म्हणून ही योजना ! आपली इच्छा माझ्याकडूनच सेवा घेण्याची असेल तर मीही तयार आहे.'

**एक नटी :** प्रोडयूसरला फसवून त्याच्याजवळचा काळा पैसा काढून घेतल्यानं सरकारला साहाय्य होईल म्हणून मी त्याच्याकडून ५ लाख घेतले; पण ५० हजाराचीच पावती दिली. कशी त्याला अद्दल घडवली ? आता मी 'एक रात्र मेथडने' आणखीही काळा पैसा काढणार आहे. महाराज, आपणच सांगा, मी आता एकाचीच राहिलेय का ? विशाल क्षेत्रात वावरणारी माणसं सर्वांचीच असतात. शिवाय माझा नवरा भ्रष्टाचारी आहे. तो परस्त्रियांशी सबंध ठेवतो !'

विविध व्यवसायातल्या विसंगतीवर असे प्रहार करताना बुवा शब्द असे योजतात की त्यातून विनोदनिर्मिती तर व्हावी पण त्याच वेळी तो विनोद क्रूर नसावा. त्यातली प्रसन्नता हरवू नये. इथेच त्यांच्या विनोदाची जात वेगळी ठरते. चिंतामणराव जोशी यांनी चिमणची व्यक्तिरेखा निर्माण करून जे जे केलं ते ते बुवानी स्वतः-भोवतीच्या जगात स्वत.ला आलेल्या अनुभवातून व्यक्त केलं, यातून वाचकाशी आणि विनोदाशीही जवळीक साधता आली आहे काल्पनिक व्यक्तीच्या आड दडण्याचं त्याना कारणच उरलेलं नाही. ते सर्वांच्या परिचयाचे आणि आपल्या अनुभवाचे विषय मांडतात. असे अनेक नमुने ते गोळा करतात. हे करतानाच जीवनाच्या विविध स्तरात ते जातात. तिथली विसंगती अचूक हेरतात आणि ती विनोदी शैलीत व्यक्त करतात. उदाहरणार्थ मुबईतल्या लोकलमधली गर्दी आणि त्या गर्दीतला प्रवास मुबईला गेलेल्याना नवीन नाही; पण या परिचित विषयावर लिहिताना बुवांनी काय केलंय ते पाहा—

## 'ॲप्रेंटिस' चोर

गर्दी जरा कमी असेल अशा कल्पनेने त्यांनी फर्स्ट क्लासचं तिकीट काढलं. तरीही बसायला जागा मिळाली नाहीच. अखेर त्या गर्दीत *त्यांचा उभे राहून प्रवास सुरू होतो— हे सांगितल्यावर त्यावर* म्हणतात,

'रेल्वेचा फर्स्टक्लास आणि सेकंडक्लास यामधील सारखी गर्दी पाहून मला आपल्या देशात समाजवाद आल्यासारखं वाटलं !'

'गर्दीत उभा असताना शेजारचा माणूस माझीच मांडी खाजवत होता.' माणसांना स्वतःच्या अवयवांचे भान राहू नये अगर नेमकी जागा सापडू नये एवढी बेसुमार गर्दी आहे हे दाखविणारे ते वर्णन आहे याच गर्दीत एक चोर उभा आहे हा चोर बुवाच्याच खास कल्पनेतला आहे. हा 'ॲप्रेंटिस' चोर आहे. त्याचा हा कोर्स अजून पूर्ण व्हायचा आहे. त्यातली पदवी अजून त्याला मिळायची आहे. हा चोर त्याने चोरलेली पाकिटे बुवाच्या खिशात आणि बॅगेत टाकतो. हे गर्दीमुळे घडले असेल अशी कल्पना करणाऱ्या वाचकाला पुढे मात्र सुखद धक्का बसतो. हे त्याने चुकून केलेले नसून स्वतः पकडले जाऊ नये म्हणून मुद्दाम त्याने तसे केलेले असते. अर्थात स्टेशनवर उतरल्यावर तो चोर आपली मालमत्ता ताब्यात घेतो. बुवाचे आभार मानतो. सुरक्षितपणे सांभाळल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि बुवांना हॉटेलात चहासाठी नेतो. चहा घेता घेता त्यांच्या ज्या गप्पा होतात त्यात चोराच्या गतायुष्याची माहिती येते—

'मी मूळचा साहित्यिक पण नंतर चोर झालो. वाल्मीकी आधी चोर होता आणि नंतर साहित्यिक झाला; पण तो साहित्यिक न होता चोरच राहिला असता तर बरं झालं असतं. कारण साहित्यिक होऊन चोऱ्या करण्यापेक्षा चोर राहिलेलच काय वाईट ?'

यापुढील संभाषणात बुवानी चोराच्या तोंडून लेखक, प्रकाशक, मुद्रक अगदी पारितोषिकाच्या वाटपातीलसुद्धा लाड्यालबाड्या वदवून घेतल्या आहेत. त्यातील काही भाग विशेष लक्षणीय आहे—

*'या साहित्यक्षेत्रात प्रसिद्धी मिळविण्याचं 'टेकनिक' मला इतकी* वर्षं लिखाण करूनही अजूनसुद्धा साधलेलं नाही. मी विनोदी लेखन करतो आहे तेव्हा लोक मला विचारतात, 'काय हो तुम्ही मार्क ट्वेन वाचला होता का ? इंग्रजी वाचल्याखेरीज आपल्याकडच्या लेखकांना लिहिताच येत नाही, अशी एक समजूत आहे,' यावर बुवा प्रश्न विचारतात, 'मार्क ट्वेनने कोणता ट्वेन किंवा त्या शेक्सपियरने कोणता शेक्सपियर वाचला होता ?' या प्रसगाच्या अनुरोधाने मग बुवानी साहित्यक्षेत्रातील विसंगतींवर जबर प्रहार केले आहेत.

'इंग्रजी साहित्यावर डल्ला मारून स्वतःच्या नावावर मी ते कधीच खपवत नाही. हे मी केलं नाही म्हणून, नाही तर मी एव्हाना प्रतिभावंत, महान, अभिजात, प्रथम श्रेणीचा साहित्यिक बनलो असतो !'

यापुढे बुवांनी भाषातराच्या वृत्तीबद्दल तिरस्कारपूर्वक म्हटलंय की, 'अनुवादाच्या आणि भाषांतराच्या उष्ट्या पत्रावळीतील रुचकर पक्वान्नापेक्षा, स्वतः निर्मिलेलं भिकार साहित्य अधिक चागलं अशी माझी विचारसरणी आहे.' हा त्यांचा दृष्टिकोण निश्चितच स्तुत्य आहे.

बुवांच्या विनोदी लेखनाला विषयांची वाण कधीच पडली नाही.

परमेश्वरापासून भातुकलीपर्यंत कोणताही विषय घेऊन तो रोचक बनविण्याचं सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. परमेश्वराची मुलाखत आपण पाहिली. आता भातुकलीच्या खेळातली मौज नमुन्यापुरती पाहू–

त्यांच्या भातुकलीच्या खेळातली मुले वेगवेगळे पार्ट घेतात, आई, बाबा, मास्तर, टांगेवाला वगैरे. आता मुलांनी या भूमिका घेतल्या की, बुवांची करामत सुरू होते. त्या खेळातल्या आईजवळ कोणी काही मागितले तर ती म्हणते, 'थाब रे, मी जरा बाळंत होऊन येते.' आता लहान मुलाच्या तोंडी ही भाषा असावी की नसावी हा भाग वेगळा; पण त्याचे हे निरीक्षण आहे. तसेच त्यांचा टांगेवाला स्टेशन वर जायला शंभर रुपये मागतो. कारण त्याने म्हणे रामाच्या अश्वमेधयज्ञातला घोडा त्याच्या टांग्याला जोडलेला आहे. हे ऐकून त्यातलीच एक ठमाकाकू सल्ला देते–

'नका बसू मग त्या टांग्यात. कारण, वाटेत लवकुशानी घोडा धरला तर स्टेशनवर जायचा गुळाबा (खोळंबा) होईल.' असा तो भातुकलीचा खेळ रंगवत नेतात. या खेळाचा शेवटही त्यांनी नेहमीच्या खऱ्या भातुकलीच्या खेळाप्रमाणे खाऊच्या वाटपावरून होणाऱ्या भाडणानेच केला आहे. त्या भांडणात मग कोणी झाशीची राणी, तर कोणी शिवाजी होतो. तो बालशिवाजी 'हमारे मॉसाहेबको थोडासा आमटी देंगा क्या ?' असे विचारतो. तर 'इश्श, न देनेको काय झालं ?' असे म्हणत त्यातल्या रमाकाकू किंवा कोणी तरी दोन बादल्या आमटी देतात. अशा प्रकारे अनेक बारकाव्यांसह बुवानी ही भातुकली रंगवली आहे.

## अंतर्मुख करणारा विनोद

एखाद्या कुटुंबातली मुले भातुकलीचा खेळ खेळताना जेवढ्या आत्मीयतेने बुवा दाखवितात, तेवढीच कुटुंबातील विदारक परिस्थितीही तेवढ्याच ताकदीने मांडतात. आई, वडील, मुले कुटुंबात एकत्र राहात असतात. या सर्वांच्या परस्परांशी असलेल्या संबंधात काही शल्य सतत प्रत्येकाच्या मनात सलत असते. कुठे तरी दुसऱ्याचे वागणे आपल्याला पटत नसते. मनात नाराजी असते; पण इलाज नसतो. आपण तसेच सर्व चालवून घेत असतो. म्हणून बुवांनी सर्व नातेवाईक मंडळीची एक काल्पनिक कंपनीच काढलीय. आई, बाबा, मेहुणी, बायको, मुले या सर्वांतील आद्याक्षरे घेऊन कंपनीचे 'आबमूबामेबाआदा' असे नाव ठेवले आहे. इथे कोणतीही नातेवाईक व्यक्ती भाड्याने मिळू शकते. काही छानदार नातेवाईक शोकेसमध्ये वगैरे लावून ठेवले आहेत. या कंपनीत एकदा एक लहान मुलगा येतो आणि विचारतो–

'इथे चागले प्रेमळ आई आणि बाबा मिळतील का ?'

बघा हं इथे कशी कारुण्याची झालर लागली आहे; पण या सर्व प्रसंगामागे एक सूक्ष्म निरीक्षण आहे. तिथले व्यवस्थापक त्या मुलाला विचारतात, 'तुला खरे आईबाबा आहेत का ?' तो मुलगा सांगतो; 'आहेत'; पण त्या मुलाच्या त्यांच्यासबधी तक्रारी आहेत. त्यासाठी तो हेकेखोर, तऱ्हेवाईक, भंकस असे शब्दही वापरतो आणि म्हणूनच त्याला चांगले आईबाबा हवे आहेत !

त्या मुलाला कंपनीने १ रुपया महिना भाड्याने आईबाबा देऊ केले तर, मुलगा एकदम १२ रुपये काढून वर्षाचा अॅडव्हान्स भरतो.– खरंच मुलाच्या लेखी आईवडिलांची किंमत एवढीच आहे का ? हे जे व्यंग बुवांनी रंगवले आहे ते विदारक पण विनोदावर आधारलेले आहे. अशाच प्रकारे त्या कंपनीत ६ मुलाचे आईबापही येतात. या मुलांच्या बदल्यात दुसरी मुले नेण्यासाठी आलेले ते आईबाप किती वैतागलेले असतील ? या साऱ्यातील गंमत अनुभवता–अनुभवताच आपण अंतर्मुख होऊन सूक्ष्म विचार करू लागतो. ही अशी बुवांची लेखनपद्धती आहे.

बादेकरांच्या लेखनातला विनोद हाही सामान्य माणसाच्या सुखदु:खावर आधारित आहे. त्यांच्याही विनोदाला कारुण्याची झालर असते. बुवांनी तोही मासला आपल्या शैलीत दाखवला आहे. त्याचप्रमाणे बादेकराप्रमाणेच राजकारण, समाजकारण, पुढारीपण यावरही बुवानी फार छान लेखन केले आहे. या लेखनात त्यांनी केलेली करामत 'समित्या नेमण्याची वेळकाढू कला' या लेखात झकास जमून गेली आहे. बुवानी या लेखात अनेक विषयांना स्पर्श केला आहे.

'पूर्वी कसलीच समिती न नेमता कारभार चाले. उदाहरणार्थ कैकयीच्या वरांची वासलात लावण्यासाठी किंवा धर्मराजाच्या राजसूययज्ञाचा खर्च ठरवण्यासाठी किंवा तानाजीच्या मृत्यूनंतर लढाई पुढे चालू ठेवायची की नाही, हे ठरवण्यासाठी समित्या नव्हत्या; परंतु आपल्याला स्वातंत्र्योत्तर काळात 'समिती' नामक एक 'दिव्यौषधी' प्राप्त झाली आहे. ही चीज फार चिकट नि चेंगट आहे. अलीकडे 'समितीच्या अहवालाची वाट पाहा' ही तर कारभाराची गुरुकिल्ली बनली आहे. ज्या सरकारच्या जास्तीत जास्त समित्या ते सरकार जास्तीत जास्त सुखी ! समिती, उपसमिती, त्याची आणखी एक उपमिती असा हा प्रकार असतो.' हे सारं सांगून झाल्यावर बुवानी 'योगक्षेमं वहाम्यहम्।' ( L. I. C. ) किंवा 'सुविनियोगात् अभिवृद्धिः।' (Unit trust) यासारखंच समितीसाठी योग्य ब्रीदवाक्यही बनवून टाकलय– 'अशुभस्य कालहरणम्।'

## तोच तोपणा

बुवांनी खूप लिहिलंय, त्यामुळे काही ठिकाणी पुनरावृत्ती दिसेल, त्याच त्याच कल्पना दिसतील. अर्थात याचे कारण वाचनाचा किंवा व्यासंगाचा अभाव आहे असा गैरसमज मात्र करून घेण्याचे कारण नाही. आपण आचार्य अत्रे किंवा पु ल. देशपांडे याच्याविषयी ऐकलं असेल की, ते पद्य आणि गद्य याचे श्रेष्ठ विडंबनकार आहेत. बुवाच्या गद्य विडंबनाचे नमुने पाहिले म्हणजे असाच उल्लेख करायला आपण सिद्ध होतो. बुवानी अनेक लेखकाच्या शैलीसह त्याच्या लेखनपद्धतीची सुरेख विडंबने केली आहेत. उदाहरणार्थ, सानेगुरुजी म्हटले की, सात्त्विकता आठवते आणि बुवा या सात्त्विकतेच्या कल्पनेलाच कलाटणी देतात. त्यांच्या मुलाचे आवडते लेखक सानेगुरुजीच आहेत. हा मुलगा जेव्हा 'खंडाळ्याच्या खडकातील खून' ही रहस्यकथा लिहितो तेव्हा तो ती सानेगुरुजीच्या शैलीत लिहितो. यातून बुवांनी गुरुजींच्या शैलीचे उत्तम विडंबन निर्माण केले आहे.–

'दुर्जन लोक दुसऱ्याच्या घरांची कवाडे रात्री उघडतात. दुर्जनानी

रे असं का वागावं ? तीही ना माणसंच आहेत ? त्यांनी रे का चांगलं वागू नये ? चांगलं वागण्याचा मक्ता सज्जनांनाच का ? देव चोरांना चांगली बुद्धी देवो ! देव त्यांचे मंगल करो ! चोरसुद्धा देवाचीच मुले ! तो त्यांना सुधारील. तो त्यांचे कल्याण करील इत्यादी.'

याचप्रमाणे मर्ढेकरांच्या समीक्षा–लेखनाचेही उत्तम विडंबन बुवांनी करून दाखविले आहे. त्यांची ग्रामीण भाषेवरील पकड 'रामजन्माची वेस्ट स्टोरी' या लेखात प्रगट झाली आहे. याच लेखात कथाकथनपद्धतीवर त्यांनी विनोदाच्या माध्यमातून टीका केली आहे. सानेगुरुजी, मर्ढेकर, मिरासदार अशांच्या भाषेचे, शैलीचे, शब्दयोजनेचे एवढे सुंदर विडंबन करून बुवांनी वाचकाला कोडेच घातले आहे– बुवा एवढे सारे वाचतात तरी केव्हा ? त्यावर एवढा सूक्ष्म विचार करतात केव्हा आणि असे उदंड लिखाण करतात केव्हा ?

बुवांच्या लेखनात शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ विनोदाप्रमाणेच स्वभावनिष्ठ विनोदाचेही नमुने असंख्य आहेत. त्यांना काही नमुनेदार स्त्रिया भेटल्या आहेत. त्यांच्या स्वभावांचे मर्म त्यांनी अचूक हेरले आहे. त्यांचा 'स्त्रियांची पंचविशी' हा लेख या दृष्टीने उल्लेखनीय आहे. प्रत्येक लेख लिहिताना बुवा आरंभी त्यात वापरलेल्या नवीन कल्पना स्पष्ट करतात. बुवा म्हणतात, 'स्त्रियांचं वय हे एक बांडुंग आहे.' त्यांच्या मते स्त्री फार वर्षे सतरावे वर्ष सांगू शकत नाही म्हणून नाइलाजाने ती २५ वर्षांपर्यंत पोचते. या वय चोरण्याच्या सवयीने ही स्त्रीजात जगातल्या फार मोठ्या बहुमानाला मुकली आहे. कोणत्याही देशात स्त्री ही राष्ट्रपती नाही. कारण त्यासाठी ३५ वर्षे वयाची अट आहे. अनेकांनी स्त्रीच्या वयासंबंधी विनोदाने लिहिले आहे; पण बुवांची मल्लिनाथी निःसंशय वेगळी नी विलोभनीय आहे. हेच त्यांचे वेगळेपण ! अशा अनेक विषयांना त्यांनी वेगळ्याच पद्धतीने स्पर्श केला आहे.

एका मुलीच्या घशात पेन्सिलीचा तुकडा अडकला तर तिच्या आईची मैत्रिण फोनवरून दिलासा देते, 'थांब हं. मी तुला आमच्या गड्यावरोबर दुसरी पेन्सिल पाठवून देते !' अशाच एका कुटुंबातील नवरा बिस्किटाचा पुडा आणायला जातो नि एक वर्ष झालं तरी घरी परत येत नाही. त्याची पत्नी काळजीत पडलेली असते. तिला तिची मैत्रिण सल्ला देते, 'आता तू आणखी वाट न बघता सरळ दुसरा बिस्किटाचा पुडा आण बरं !' अशा प्रसंगांमधून त्यांनी माणसाच्या स्वभावाची जाण प्रकट केली आहे. अर्थात स्त्रियांविषयी लिहिताना अलीकडे बुवा थोडे भडक वा अश्लील लिहितात हे खरं आहे; परंतु त्यावर असाही विचार झाला पाहिजे की, 'बेतून कपडे करण्याच्या काळात लेखकही बेताबेताने लिहीत; पण आता अंगाकरून मापे देण्याचा काळ आल्यावर लेखकांनी अशी मापे काढली तर तक्रार का करावी ?'

बुवा स्वतःबद्दल असा दावा कधीच करताना आढळत नाहीत की ; आपण खूप मोठे विनोदकार आहोत; पण बुवांची विनोदातील कामगिरी एवढी मोठी आहे की, त्यांच्या साहित्यातून विनोद बाजूला काढला तर ते साहित्य नगण्य ठरेल. गंगाधर गाडगिळांसंबंधी कोणी म्हणतील की, त्यांच्या साहित्यातून विनोद काढून टाकला तरी त्यांचे मोठेपण कमी होणार नाही. गाडगिळांच्या बाबतीत हे अगदी बरोबर आहे; पण बुवांचे कर्तृत्व फक्त विनोदाच्याच क्षेत्रातले असल्यामुळे आणि ते त्याच्याशीच एकनिष्ठ असल्यामुळे बुवांना विनोदाच्या क्षेत्रातून बाजूला काढणे शक्य होणार नाही. मी तर असे म्हणेन की, मराठीतला विनोद जर लक्षात घ्यायचा असेल तर बुवांच्याशिवाय त्याला पूर्तता येणार नाही, एवढी विविधांगी भरीव कामगिरी बुवांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात केलेली आहे ! □

(शब्दांकन : सौ. शलाका सोमण)




# इतिहासाचा झरोका

## त्याच्या आत्मनिवेदनात जाणवतं ते एक मस्त मोकळेपण !

## सोळाव्या शतकातल्या युरोपच्या समाजाचं जवळून दर्शन घडवणारं आत्मकथन !

दोन ऐतिहासिक युगांच्या सापटीत सापडलेल्या एका शतकाबरोबर तो जन्माला आला. राजे–रजवाडे, कट–कारस्थानं, द्वंद्व–युद्ध यांनीच नावाजलेलं मध्ययुग नुकतच कुठं अस्तंगत होत होतं, तर आपल्या बौद्धिक पराक्रमानं निसर्गावर मात करत मानवानं निर्माण केलेलं आजचं आधुनिक विज्ञानयुग अजून अवतारायचं होतं. इंग्लंड-मध्ये महान सारस्वत शेक्सपिअर अजून जन्माला यायचा होता. फ्रान्सच्या भूमीवर सम्राट नेपोलियनचा सामर्थ्यसूर्य अद्याप उगवायचा होता. भारतीय इतिहासाच्या वाटचालीत शतकर्त्या शिवरायाचा जन्म अजूनही शे–दीडशे वर्षांच्या अंतरावर होता.

अवघ्या युरोपालाच एका अनाम अस्वस्थतेनं ग्रासलं होतं. छोटे–मोठे राजे–राण्या, उमराम–सरदार, चोर–दरोडेखोर यांचंच अनिर्बंध अधिराज्य होतं. आजचा सामर्थ्यशाली पोपदेखील भुरट्या सरदारांचे हल्ले परतवत आपलं अस्तित्व केविलवाणेपणे टिकवून होता. एकूण युरोपच्या वैभवाला एक अवकळा आली होती. इतिहासाच्या ह्या वळचणीलाच तो इटलीतला फ्लॉरेन्स म्हणजे फुलांच्या शहरात जन्माला आला, तो दिवस होता तीन नोव्हेंबर इसवी सन १५०० आणि त्या श्रेष्ठ कलावंताचं नाव होतं बेन्व्हेनूतो सेलिनी.

सेलिनीच्या काळात इटली हा एक एकसंघ देश म्हणून उभा नव्हता, तो केवळ डळमळत्या पायावर उभ्या असलेल्या काही किर-कोळ राजवटीचा समूह होता. फ्लॉरेन्स काय, रोम काय, व्हेनिस काय प्रत्येकाचा सत्ताधारी वेगळा होता. प्रत्येकाच्याच अस्तित्वात आणि अस्मितेत एक अलगपणा होता. ह्याच राजवटीतल्या अंतर्गत बेदिलीनं दुबळ्या होऊन गेलेल्या इटालियन भूमीवर वर्चस्व मिळ-वण्यासाठी युरोपातल्या त्या वेळच्या सर्वसमर्थ फ्रेंच आणि स्पॅनिश महासत्तात एकच चुरस होती आणि त्यातूनच साऱ्या युरोपभर लहान–मोठी युद्धं खेळली जात होती. सेलिनीच्या जन्माच्या वेळी अस्तित्वात असलेली ही अनोखी राजकीय अस्थिरता, त्याच्या मृत्यू-पर्यंत जवळपास तशीच टिकून होती. फ्रान्समधली धर्मयुद्धं आणि स्पेन-मधलं परंपरावाद्यांचं प्राबल्य यानी युरोपातली सारीच समाजसुधा-रणा निकालात निघाली होती.

एकाहत्तर वर्षांचं दीर्घ आयुष्य सेलिनीच्या वाट्याला आलं. भन्नाट ह्या एका शब्दात ते नक्कीच मावणार नाही. वयाच्या अठ्ठा-वन्नाव्या वर्षी चित्रविचित्र अनुभवांतून आकारत गेलेल्या आपल्या ह्या आयुष्याचा जमाखर्च त्यानं लिहायला सुरुवात केली आणि त्या-पुढची आठ वर्षं सलग केवळ ह्याच कामासाठी खर्च केली. सेलिनीच्या ह्या आत्मकथेचं नाव आहे 'जीवन' ( द लाइफ ).

इतिहासाच्या ह्या अस्थिर कालखंडात युरोपातल्या कलाविश्वाला मात्र एक नवसामर्थ्य प्राप्त झालं होतं. विविध कलांच्या विकासात अस्वस्थ इटली स्वाभाविकच अग्रभागी होता. त्यातही अनेक थोर कलावंतांना जन्माला घालण्यात फ्लॉरेन्स शहराचा वाटा मोठा होता. आपल्या मोनालिसानं अजरामर झालेला लिओनार्दो द विन्सी ह्या कलाक्षेत्राचा अग्रणी होता आणि त्याच परपरेला जागून पुढील दोन शतकं युरोपीय कलाक्षेत्रावर आपल्या अनोख्या शैलीत अधिराज्य गाजवणारा थोरला मायकेल अँजेलो, रोमच्या पुरातन चर्चेची छतं आपल्या अविस्मरणीय कुंचल्यानं चितारून काढत होता. राफेल कलाकाराच्या नव्या पिढ्या नेकीनं घडवत होता. सेलिनी हा ह्याच थोर इटालियन कलापरंपरेचा पुत्र होता. सेलिनी हा काही साधा सोनार नव्हता. हिरे–मोती, सोनं–चांदी ह्यातून अजोड कलाकृती आविष्कारणारा एक कलावंत होता. माती–मेणातून, संगमरवरातून, ब्रॉंझमधून ग्रीक पुराणातल्या देवदेवतांच्या भव्य प्रतिकृती घडवणारा शिल्पकार होता !

### ठकाला महाठक

सेलिनीचं हे आत्मवृत्त विलक्षण वाचनीय आहे. सोळाव्या शतका-तले राज्यकर्ते, त्यांचे आचार–विचार ह्यांचं ते ठळक चित्रण करतं. त्याहून अधिक म्हणजे सेलिनीची ही आत्मकथा केवळ त्याच्या कला-जीवनाचीच कहाणी सांगत नाही, तर ती जीवनाच्या विविध स्तरां-तून संचार करते. त्यात सैनिक–संगीतकार, वेश्या–व्यापारी, लेखक–चित्रकार, खानावळवाले–धर्मगुरू, राजे–सरदार अशी जीवनातल्या विविध स्तरांतली माणसं पानोपानी भेटत जातात. सेलिनी जणू ह्या सर्वांचा एक समर्थ प्रतिनिधी म्हणूनच वावरत असतो. सोळाव्या शतकाशी परिचित नसलेला आजचा आधुनिक वाचक त्याचं रागडं रंगीन व्यक्तिमत्त्व आणि आडमुठी अचाट साहसं यांना वाचता वाचता सहज दाद देऊन जातो.

सेलिनीचा बाप एक उत्कृष्ट फ्ल्यूटवादक असतो, कलाकार असतो. आपल्या मुलानंही एक श्रेष्ठ संगीतकार व्हावं हीच स्वाभाविकच त्याची आयुष्यभराची आकांक्षा असते; पण सेलिनीच्या स्वभावात वेगळंच काही दडलेलं असतं. बापाची स्वप्नं लाथाडून, वयाच्या १५ व्या वर्षी, मार्कोनो नावाच्या फ्लॉरेन्सच्या ख्यातनाम जवाहिऱ्याकडे तो उमेदवारीला सुरुवात करतो. ह्यापुढचं सेलिनीचं आयुष्य म्हणजे एक संघर्ष आहे. हा संघर्ष त्यानं सुवर्णकलेत–शिल्पकलेत प्राविण्य प्राप्त करण्यासाठी जसा केलाय तसाच तो त्याच्या दांडगट, घस-

मुसळघा अरेस–का रे वृत्तीतून निर्माण झालाय. सेलिनीचं सर्वंच आयुष्य बऱ्याचदा फ्लॉरेन्स–रोम–पॅरिस ह्याच शहरांशी निगडित राहिलंय. कधी सेलिनी फाशीच्या भयानं फ्लॉरेन्सहून रोमकडे पळालाय, कधी पोपच्या पॉलच्या तुरुंगातून सुटका करून घेऊन पॅरिसच्या आश्रयाला गेलाय, कधी फ्रान्सच्या फ्रान्सिस राजाचा रोष टाळण्यासाठी पॅरिसहून त्यानं फ्लॉरेन्सला पळ काढलाय !

रोमचा त्या वेळचा पोप क्लेमण्ट हा एके काळचा त्याच्याच गावातला कार्डिनल, त्याच्या वडलाचा मित्र. स्वाभाविक पोप क्लेमण्ट त्याच्याशी अगदी सहृदयतेनं वागतो. सेलिनीनंही ह्या पोपसाठी कधी सोन्याची पदकं बनवली, कधी कलाकुसरीची बटणं बनवली, कधी सोन्या-हिऱ्यांचे मुकुट करून दिले आणि आपली कला त्याच्या दरबारी रुजू केली. इतकंच नव्हे तर रोमवरच्या हल्ल्याच्या वेळी तो शर्थीनं लढलाही ! तोफखान्याचा प्रमुख म्हणून त्यानं शत्रूवर भडिमार केला. पोपचा सान्त अँजलिका किल्ला आणि रोम शहराचा त्यानं कल्पकतेनं बचाव केला. इतकंच नव्हे तर पोपचा शत्रू असणाऱ्या ऑरेंजच्या राजपुत्राला आणि कॉन्स्टेबल बर्बानलाही त्यानं त्या हातघाईत ठार मारलं. पोपनं मग त्याला १५३० मध्ये आपल्या टाकसाळीत नाण्यांचा डिझायनर म्हणून नेमलं. सेलिनी स्वभावतःच धाडसी होता. एका भांडणात त्याच्या शूर भावाला दगड-धोंड्यांनी जखमी करून बेशुद्ध पाडणाऱ्या बेभान सशस्त्र जमावावर तो एकटा तलवार उपसून चालून गेला आणि त्यानं भावाचा जीव वाचवला; पण पुढं दंडाधिकाऱ्यानं मात्र त्याला आणि त्याच्या निर्दोष भावालाच ह्या प्रकरणात गुन्हेगार ठरवून सहा महिने फ्लॉरेन्सच्या वेशीबाहेर तडीपार केलं. सेलिनी ठकास महाठक होता. अन्यायाचा बदला अन्यायानं. तलवारीना तलवारीनं हाच त्याचा धर्म होता. त्याच्या ह्या भाडखोर वृत्तीतून नेहमी तो झगडतच राहिला.

### साहसी आयुष्य

फ्लॉरेन्समधले सारे सोनार लफंगे, चोर आहेत असं म्हणत त्यांना शिव्या देत तो फिरत असे. तेव्हा त्यातून घेरादो गॅसकॉन्ती नावाच्या सोनाराशी त्याचं भांडण जुंपलं. घेरादोनं त्याचा अपमान केला. सेलिनीनं चाकू दाखवून त्याच्या दुकानातल्या साऱ्यानाच खतम करायची धमकी दिली. पुढं प्रकरण न्यायालयात गेलं. त्यातला एक मॅजिस्ट्रेट रिपब्लिकन पक्षाचा म्हणून सेलिनीच्या शत्रूच्या बाजूनं होता. तेव्हा सेलिनी नाममात्र शिक्षेवर सुटला; पण निरपराध असताना आपल्याला शिक्षा, ह्या कल्पनेमुळे त्याचा अहंकार दुखावला. तो न्यायालयातून पळाला आणि कट्यार घेऊन आपल्या शत्रूच्या घरावर चालून गेला. अचानक चालून आलेल्या सेलिनीला पाहून शत्रू शरण आले; पण परत येताना त्यांच्या नोकराचाकरांनी सेलिनीवर हल्ला केला. सेलिनीनं पिसाळून प्रतिहल्ला चढवला आणि चार-पाच जणाना कट्यारीनं भोसकून काढलं. मग तो एका सहृदय धर्मगुरूच्या घरात लपला. त्या रिपब्लिकन दंडाधिकाऱ्यानं सेलिनीच्या बापाला दम दिला. 'तुझ्या पोराला फासावर लटकवला नाही तर बघ !' बाप म्हणाला, 'परमेश्वराची इच्छा असेल तेच तुम्ही अखेर कराल !' तेव्हा दंडाधिकारी उद्दामपणे उत्तरला, 'मी म्हणतो तीच ईश्वराची इच्छा असेल असंही समज !' पोरगा वाचत नाही हे पाहून बापानं त्याला निरोप दिला. 'आता जगायचं किंवा मरायचं ह्यासाठीच बाहेर पड ! परमेश्वर तुला सहाय्य करो !' मग सेलिनी घोड्यावर बसून रोमकडे, दंडाधिकाऱ्याच्या क्षेत्राबाहेर पळाला !

सेलिनीचं आयुष्य अशाच लहान-मोठ्या साहसांनी भरलेलं आहे; पण आपली साहसांची वर्णनं करताना, त्याच्या आत्मकथेला अहंकाराचाही दर्प येतो. त्याशिवाय त्याच्या निवेदनात तटस्थतेचाही अभाव आढळतो. सेलिनी राजे-रजवाडे, सरदार उमराव, पोपबद्दल बोलतो. त्यांचे गुण-दोष, त्यांचा मोठेपणा, क्षुद्रपणा, त्यांच्या लहरी लबाड्या, त्यांच्या राण्या-रखेल्या ह्या साऱ्यावर तो प्रकाश टाकत असतो. त्यातून स्वतःवर झालेल्या शारिक-आर्थिक अन्यायांविरुद्ध तो आपल्या वाचकांपुढे बाजू मांडत असतो; पण ह्या साऱ्या राज्यकर्त्यांच्या क्षुद्र राजकारणात तो चुकूनही डोकावताना दिसत नाही. कारण राजकारण हा आपला प्रांतच नसल्याचं तो मानतो. त्याचं आत्मनिवेदन हा त्या काळातील सामाजिक घडामोडींचा आढावा नसून त्याच्या दृष्टीनं आपल्या स्वतःच्याच आयुष्याचा एक सच्चा आलेख असतो आणि हीच भूमिका तो अखेरच्या शब्दापर्यंत नेटानं निभावून नेत असतो.

रोममध्ये सेलिनीच्या भावाचं गस्त घालणाऱ्या पोलीस-पथकाशी भांडण होतं. त्याचा भाऊही त्याच्याइतकाच साहसी असतो. तो तलवारउपसून एका पोलिसाला भोसकतो. माघार घेताना त्या पथकातला एक पोलिस सेलिनीच्या भावाच्या पायात गोळी घालतो. अति रक्तस्त्रावानं त्याच्या भावाला नंतर मरण येतं; पण शूर योद्धयाला साजेशा धैर्याने तो मृत्यूला सामोरा जातो. सेलिनी भावासाठी संगमरवरी थडगं बांधतो आणि भावाला गोळी घालणाऱ्याचा जीव घ्यायची प्रतिज्ञा करतो. एका संध्याकाळी अनपेक्षितपणे जाऊन त्याच्या भावाच्या मारेकऱ्याचा गळा चिरतो आणि त्याला ठार करतो. सेलिनी ह्या साऱ्याच सूड-नाट्याचं तपशीलवार चित्रण करतो तो थंडपणे त्यात आपल्या क्रूरपणाचे तपशील भरत जातो. आपल्या भावाच्या आत्म्याला शांती मिळवून देणं हेच त्याचं तेव्हा ध्येय असतं. खुनाचा बदला खुनानं हाच कदाचित त्या काळचा न्याय

**ऑटोबायोग्राफी ऑफ बेन्व्हेनूतो सेलिनी**

मूळ इटालियन भाषेतील आत्मवृत्ताचे इंग्रजी भाषांतर : जॉर्ज बुल

**मराठी परिचय : अशोक प्रभाकर डांगे**

असावा. कारण भावाच्या खुनाचा सेलिनी बदला घेतोय हे समजल्यावर कोणीच त्याच्या वाटेला जात नाही. त्या काळात तो पोप क्लेमेंटसाठी हिऱ्याचा मुकुट करत असतो. ह्या घटनेनंतर पोप त्याला अगदी सहज म्हणतो,

' बेन्देनूतो, आता तरी तुझ्या मनाचं समाधान झालं ना ! आपल्या कामाकडे आता जरा लक्ष दे !'

पोपनंही त्यानं केलेल्या खुनाचं सूड म्हणून समर्थन करावं हे आपल्यासारख्या आजच्या वाचकाला धक्कादायक वाटतं. नैतिकतेवर उभारलेली आजच्या पोपची प्रभावी प्रतिमा आणि एक राज्यकर्ता म्हणूनची पाच शतकांपूर्वीच्या ह्या पोपची भूमिका ह्यातला विरोधाभास आपण शोधत रहातो.

## वेळप्रसंगी रांगडेपणा !...

सेलिनीच्या आत्मवृत्ताची मूळ प्रत आजही उपलब्ध आहे. त्यान आधी स्वतःच लिहायला सुरुवात केली; पण मग त्याचा कंटाळा आल्यावर त्यानं चौदा वर्षांच्या मुलाला लेखनिक म्हणून नेमलंय. काही भागानंतर त्यानं पुन्हा स्वतःच्याच हस्तक्षरात उरलेला मजकूर लिहून काढला. १५५९ मध्ये त्यानं ते चोपडं बेनेदीत्तो वार्ची ह्या मित्राकडे अभिप्रायार्थ पाठवलं. वार्चीनं त्याचं संस्करण करून पुनर्लेखन करायची सेलिनीला सूचना केली. मुळातच अहंकारानं झपाटलेल्या सेलिनीला ती सूचना मानवली नाही. त्यानं मूळ हस्तलिखितात काही किरकोळ फेरफार केले आणि काही टीपा जोडल्या येवढंच. त्यामुळंच की काय त्याचं लिखाण कित्येकदा दोषपूर्ण वाटतं. त्यात सातत्य नसतं. वाक्यावाक्यांत सुसंगतता नसते. 'मला आयुष्यातल्या आणखी पुष्कळ गोष्टी सांगायच्या आहेत. म्हणून हा प्रसग इथेच आटोपता घेतो.' असं वरचेवर म्हणत म्हणत त्याची आत्मकथा पुढं सरकत असते आणि ह्या पद्धतीतच तो महत्त्वाचे तपशील कित्येकदा मागे सारतो, तर त्याहून कमी महत्त्वाचे प्रसंग रंगवत राहतो. त्याशिवाय प्रसंगी ते असंबद्ध होतं. त्याची भाषा कलाकाराची काव्यात्मकता दर्शवण्यापेक्षा बरेचदा रागडेपणाच धारण करते. कधीकधी तो आपल्या आसपासच्या व्यक्तींना मनमोकळेपणे शिवीगाळही करतो हे सारं जरी असलं तरी कुठे तरी सेलिनी आपल्या कथानकातील पात्रांबद्दल काहीसा जागरूकही असतो. एखाद्या दुखद प्रसंगानंतर तो आपल्या निवेदनाचं तारू अचूकपणे सुखद घटनाच्या किनाऱ्याकडे वळवतो. सुख–दुखाच्या ऊन–पावसात आयुष्याचा माळ एकाकी तुडवत जाणाऱ्या सेलिनीच्या लेखणीबद्दल म्हणूनच की काय वाचकाला एक आपलेपण वाटत रहातं.

सेलिनीच्या ह्या आत्मनिवेदनातन जाणवत राहतं ते एक मस्त मोकळेपण. हे मोकळेपण. स्वत.बद्दल असतं तसंच दुसऱ्यांबद्दलही. स्त्रियाबद्दल तेवढंच पुरुषांबद्दलही वयाच्या २९ व्या वर्षी. आपण एक तरुण स्त्री रोममधल्या आपल्या झवेऱ्याच्या दुकानात कामावर ठेवली आणि आपल्या शारीरिक इच्छा भागवण्यासाठीच तिचा उपयोग कसा केला हे तो मोकळेपणी सांगतो. एका सिसीलियन पोरीच्या प्रेमापायी पागल होऊन आपण कसा दूरच्या गावी जाऊन तिचा शोध घेतला आणि तिच्याच सहवासात कसे दिवस काढले ह्याचंही तो वर्णन करतो. पॅरिसमध्ये मॉडेल म्हणून वापरलेल्या पंधरा वर्षीय तरुणीपासनं आपल्याला मुलगी झाली आणि तिचा बाहिस्मा फ्रान्सच्या राजाच्या डॉक्टरनं कसा पार पाडला हेही तो आवर्जून सागतो. सेलिनीच्या ह्या साऱ्या संबंधात भावनात्मकता अभावानंच आढळते. प्रेम वगैरे शब्द त्याच्या व्यक्तिमत्त्वाला स्पर्शही करताना दिसत नाही. उपभोगातून तो आपली शारीरिक सोय पहातो तसाच सूडातून किंवा अपमानातून साहसाकडे झेपावताना दिसतो.

सेलिनी वृत्तीनं धार्मिक होता. त्याची ही धार्मिकता त्याच्या आत्मकथेच्या पानापानातून डोकावत असते. जीवन–मरणाच्या प्रत्येक प्रसंगी तो परमेश्वराची करुणा भाकतो. म्हणूनच की काय हे आत्मनिवेदनही तो परमेश्वराचे आभार मानण्यासाठीच लिहितो. सेलिनीच्या आयुष्यातल्या सर्वांत कठीण प्रसंगीही त्याच्या धार्मिकतेची आणि साहसाचीही चागलीज कसोटी पाहतो.

आता आधीचा पोप क्लेमंट मरण पावलेला असतो. त्याच्या जागी पॉल फार्नेज आणि विशेषतः त्याचा मुलगा सिग्नोर पिएर लुईगी ह्यांचा सेलिनीवर रोष असतो. त्याच वेळी सेलिनीकडे एके काळी नोकर म्हणून काम करणारा एक जण पोप पॉलकडे तक्रार करतो, 'सेलिनीच्या धंद्याची इगितं मला माहीत आहेत. त्याची सारी संपत्ती मूल्यवान हिरे आहेत हे हिरे त्यानं रोमवरच्या हल्ल्याच्या वेळी, (पोप क्लेमंटच्या कारकीर्दीत) पोपच्या सान्त ॲंजेलो किल्ल्यातनं चोरले आहेत. ही सारी चर्चचीच मालमत्ता आहे. पोपनं सेलिनीला ताबडतोब अटक करावी !' पोप पॉल आधीच धनलोभी, त्यातनं त्याचा आणि त्याच्या हलकट मुलाच। सेलिनीवर राग ! ते दोघही निमित्तालाच टेकलेले असतात. एका पहाटे पोलीस सेलिनीला रस्त्यातच अडवतात आणि गुरकावतात.

' तू आता पोपचा कैदी आहेस !'

## त्याची दुर्दशा

वयाच्या सदतिसाव्या वर्षी सेलिनी सान्त ॲंजेलोच्या किल्ल्यात कैदी होऊन पडतो. त्याच्या चौकशीसाठी मंडळ नेमण्यात येतं. आपल्यावरचे आरोप ऐकून सेलिनी त्यानाच बजावतो–

'तुम्ही बाष्फळ बडबड करत आहात ! पोपच्या राजवटीची एवढी मोठी सेवा केल्याबद्दल हे फळ मला मिळालं आहे काय ? हे ख्रिस्ताचं तख्त आहे हे मी जाणतो. मला पकडण्यापूर्वी तुम्ही जवाहिरांचा तपशील तरी तपासला आहे का ?' ह्या ऐंशी हजार ड्यूकॉट किंमतीच्या हिऱ्याचं मी काय केलं ते तरी पाहिलंत का ?' चौकशी करणाऱ्या एका गव्हर्नरनं त्याला बजावलं, ' पण काही खून तुझ्या खाती जमा आहेत त्याचं काय ?'

सेलिनी त्यानही बधला नाही. म्हणाला–

' तसं तुम्ही म्हणता ! मी नव्हे !'

ह्या वादातही सेलिनी अखेर बाजी मारतो. पोप पॉल त्याच्या सरबत्तीनं हादरून जाऊन आपल्या जवाहिरखान्याचं रेकॉर्ड तपासायचा आदेश देतो. त्यातही सेलिनीच खरा ठरतो. सेलिनीचा निर्दोषपणा सिद्ध होतो; पण पोप पॉल आणि त्याचा मुलगा त्याला असा तसा सोडणार नसतात. काही करून सेलिनीला फासावर लटकवण्याच्या ते तयारीला लागतात.

सेलिनीची ही दुर्दशा फ्रान्सच्या राजाच्या कानावर जाते. तो सेलिनीला सोडायचा पोपला सल्ला देतो. त्यानं तर प्रकरण आणखीनच चिघळतं, एकदा आपण सुटत नाहीसं पाहिल्यावर सेलिनी काही करून पळायच्या तयारीला लागतो. सतरंज्या–चादरी फाडून दोर तयार करतो. आणि कोठडीचे गज कापून एका अमावास्येच्या रात्री पळ काढतो. त्याचं हे सारं पलायन–प्रकरण मुळातच अत्यंत वाचनीय आहे. ते वाचताना वाचकच थरारून जातो. सेलिनी प्रसाधनगृहाची कौलं फोडून छतावर चढतो. चादरीच्या दोरावरून पोपच्या बालेकिल्ल्याचा प्रचंड उंच तट उतरतो. मग अचानक आडव्या आलेल्या रक्षकाचं तोंड कट्यारीचा धाक दाखवून बंद करतो. किल्ल्याची दुसरी तटबंदी चढून उतरताना मात्र तो रक्तबंबाळ होतो आणि शेवटी अंधारात जमिनीचा अंदाज न येऊन कित्येक फूट खाली कोसळतो आणि त्याचा पाय जायबंदी होतो. तो रक्तबंबाळ अवस्थेत रांगत असतानाच कार्डिनल कॉनरो त्याला आश्रय देतो आणि त्याच्यावर उपचार करतो. सेलिनीच्या सुटकेचा हा प्रसंग आजच्या एखाद्या शौर्यकथेतल्या नायकाला साजेसा असतो.

सेलिनी सुटकेचा निश्वास टाकतो. पण त्याचा तो आनंद अगदी अल्पजीवी ठरतो. कारण आधी सेलिनीला अभय देण्यासाठी पोपकडे रदबदली करणारा रोमचा हा प्रतिष्ठित कार्डिनल वेळ येताच स्वतःच्या क्षुद्र स्वार्थासाठी निर्दय होऊन सेलिनीला सरळ पुन्हा पोपच्या हवाली करतो. सेलिनीच्या तसं न करण्याच्या विनवण्या वायफळ ठरतात ! सेलिनी पुन्हा पोपच्या आणि त्याच्या क्रूरकर्मा पोराच्या पुन्हा एकदा तावडीत सापडतो. पोप आताही दयामाया दाखवत नाही. त्याला काळोख्या कोठडीत एकांतवासात डांबण्यात येतं. त्याला अन्नातून हिरकणी देऊन मारण्याचा प्रयत्न केला जातो. हाडाचा जवाहिऱ्या असल्याने तो तोही डाव ओळखतो. एकदा तर एका पहाटे त्याला वधस्तंभापर्यंत नेलं जातं पण त्याच्यावर खूष असणाऱ्या एका दयाळू राजकन्येच्या रदबदलीनं सेलिनीचं मरण टळतं, साऱ्या छळवादात पोपच्या किल्लेदाराचा क्रूरपणा, सेलिनीवरचा पूर्व रोष तितकाच कारण असतो.

## एका प्रकरणाचा अस्त !

सेलिनी काळकोठडीत पिचत असतो. क्षणाक्षणानं येणाऱ्या मरणाची वाट पहात असतो. एकदा तर त्याच्यासाठी अखेरची प्रार्थना करायला धर्मगुरुही येतात पण त्या भयानक स्थितीतही तो हिम्मत हरणार नसतो. आधीच धार्मिक वृत्तीच्या सेलिनीच्या श्रद्धा त्या वेळी मनाच्या तळातून उफाळून वर येतात. कारण त्या साऱ्या निर्दय, क्षुद्र माणसापेक्षा तो परमेश्वरावरच अधिक श्रद्धा ठेवतो. आणि त्याच काळात त्याच्या आयुष्याला अधिक अर्थ देणारा चमत्कार अचानक घडून येतो, अंधारकोठडीत प्रकाशाची तिरीपही दृष्टीस न पडणारा सेलिनी उघडं आकाश, स्वच्छ प्रकाश पहाण्यासाठी अगदी आसुसलेला असतो आणि त्याच वेळी शुभ्र वेषातला एक देवदूत तिथे अवतरतो. तुरुंगाची कवाडं खुली होतात आणि देवदूत आपल्या हाताला धरून सेलिनीला किल्ल्याबाहेर नेतो. आणि चेतनाठायी सूर्यप्रकाशाचं दर्शन त्याच्या अधेरलेल्या दृष्टीस घडवतो. परमेश्वराच्या ह्या कृपाप्रसादानं सेलिनी संतुष्ट होतो. त्याच्या श्रद्धांचा पाया भरभक्कम होतो. अधिक करून या प्रेरणेच्या बळावरच सेलिनी मृत्युला चार पावलांवरून परत पाठवतो. डॉक्टरांनीही आशा सोडलेला सेलिनीचा जणू पुनर्जन्म होतो, ह्या विलक्षण चमत्काराबद्दल ऐकल्यावर देवावरच काय कशावरच श्रद्धा न ठेवणारा तो पोप सेलिनी ठार वेडा झाल्याचा किल्लेदाराला निर्वाळा देतो आणि त्यावर तसे काही उपचार करायचं सुचवतो !

सेलिनीचं नशीबच बलवत्तर असतं हेच खरं. फ्रान्सचा राजा रोममधल्या राजदुताकरवी काही खटपटी करून, दबाव आणून पोपच्या एक हलक्या-फुलक्या मनोवृत्तीच्या क्षणी, सेलिनीच्या सुटकेचा आदेश मिळवतो आणि पोपच्या दुष्ट मुलानं आणखी कट-कारस्थान करण्याच्या आत रातोरात सेलिनीला सान्त अँजेलोच्या किल्ल्याबाहेर काढतो ! फ्रान्सच्या राजाचे हे उपकार सेलिनी आयुष्यभर विसरू शकत नाही ! आपल्या त्या जीवनदात्याची विनंती मानून तो पुढची बरीच वर्षं पॅरिसमध्ये राजाच्या सेवेतच समाधान मानतो.

रोममधून बाहेर पडताना सेलिनीच्या आयुष्यातलं एक भयानक प्रकरण संपतं. 'एकदा माणूस दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडला की, त्याची ग्रहदशा किती वाईट रीतीनं पालटू शकते हे साऱ्या जगाला आणि मानवमात्राला कळावं म्हणूनच मी हा दुःखद प्रसंग वर्णन करतोय !' अशाच शब्दात सेलिनी वाचकांपुढे उभारणी करतो.

**पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी**


**NEW TITLES RECEIVED**

१. देवाची पाउले–( व्यक्तिचित्रणात्मक कादंबरी )–रवींद्र भट
२. करुणाष्टक–( कुटुंबकहाणी )–व्यंकटेश माडगूळकर
३. सत्तांतर–( रानगोष्टी )–व्यंकटेश माडगूळकर
४. घोडा–( औद्योगिक संस्कृतीतील मानवी पिळवणूक व मूल्यहीनता या विषयावरील कथा )–ह. मो. मराठे
५. मी आणि बालकवी–पार्वतीबाई ठोंबरे

1. The Almighty–(Bestseller Novel)–Irving Wallace
2. Umrao Jan Ada–Translated by Khushwant Singh M. A. Husaini
3 The United States of America–( Pictorial )– Bill Harris
4. Marco Polo If You Can–(Bestseller– Spy Story) Jr. William F Buckley
5. Mystery Stories–Octopus Books
6. Detective Stories ,, ,,
7. Escape Stories ,, ,,
8. Adventure Stories ,, ,,
9. Romance Stories ,, ,,

The Phoenix Library
727, opp. Sadashiv Post, Pune–30.

मुलुंड साहित्यसंमेलन

# वाईट कलावादी समीक्षेचा हुबेहूब नमुना

ललिता बर्वे

गेल्या महिन्याच्या २२ आणि २३ तारखांना मुलुंड येथे मुंबई महानगर मराठी साहित्यसंमेलनाचं चोविसावं अधिवेशन भरलं होतं. आतापर्यंत या समेलनाचे वृत्तान्त येऊन जुनेही झाले आहेत; तरी पण एका कार्यक्रमाकडे लक्ष वेधण्याची आवश्यकता आहे.

'मराठी साहित्याचा दर्जा खालावला आहे काय ?' हा या संमेलनातला एक परिसंवाद. गंगाधर गाडगीळ, पुष्पा भावे आणि वसंत दावतर या तीन वक्त्यांनी या परिसंवादात भाग घेतला. परिसंवादाला लक्षवेधी म्हणायचं कारण वक्त्यांनी ठासून आपले विचार मांडले. त्यामध्ये समतोलता होती आणि मराठी साहित्याचा दर्जा खालावला आहे किंवा काय याबद्दल त्यामधून नेमके आणि ठाम दिग्दर्शन झालं म्हणून नव्हे, अगदी स्पष्ट बोलायचं झालं, तर पुष्पा भावे वगळता अन्य दोन वक्त्यांनी विषयाला पुरेसं धरून मुळी विचार माडलेच नाहीत. त्यामुळं मराठी साहित्याचा दर्जा इत्यादी संदर्भातले थोडेसेच विचार आणि नव्या कल्पना ऐकायला मिळाल्या; पण आजचे काही प्रस्थापित साहित्यिक (हा शब्द वाईट अर्थानं वापरलेला नसून परिस्थितीचं वर्णन करण्यासाठी वापरलेला आहे.) सध्याच्या एकूण साहित्यसंसाराकडे काय दृष्टीनं बघत असावेत त्याची धक्कादायक कल्पना या परिसंवादातून आली, त्याचं दु:खही झालं आणि संतापही आला.

वसंत दावतरांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला दर्जा ठरवणारे निकष कोणते वगैरे मुद्द्यांपासून सुरुवात केली. दर्जा, निकष, तुलना इत्यादीसंबंधीचे काही तपशील, विचार त्यांनी मांडले. दर्जा घसरला आहे हे कोणत्या संदर्भात आणि कशाच्या तुलनेनं ठरवायचं ? आज दर्जा खालावला आहे, म्हणजे पूर्वी तो कधी होता असं ठामपणे गृहीत धरायचं का ? बरं, पूर्वी म्हणजे तरी किती पूर्वी ? स्वातंत्र्यपूर्व कालात साहित्याला दर्जा होता का ? आजच्या मराठी साहित्याच्या दर्जाची तुलना कालच्या मराठी साहित्याशी करायची की ती आणखीन कुणा भाषेतल्या साहित्यांशी करायची ? की साहित्यांतर्गत असणाऱ्या विविध प्रकारांची आणि त्यांच्या दर्जाची आपसात तुलना करायची ?

हा झाला एक प्रश्नसमूह. दुसरं म्हणजे साहित्याचे निकष, दर्जाचे निकष सार्वत्रिक असले पाहिजेत का, हा एक प्रश्न. हे निकष सार्वत्रिक, सर्वमान्य असलेच पाहिजेत, हे दावतरांनी ठासून सांगितलं. एक प्रश्न तरी सुटला; पण हे निकष तरी काय असावेत ? संख्या, खप म्हणजे दर्जेदार लेखन मानायचं का ? की, लोकप्रियता म्हणजे दर्जा असं म्हणता येईल ?

दावतरांनी प्रश्नच प्रश्न उभे केले; पण त्यांपैकी कोणाचीच समाधानकारक उत्तरं त्यांनी दिली नाहीत. खरं म्हणजे त्यांचं सगळं भाषणच इतकं तोलून, मापून जपत झालं की, त्यामध्ये त्यांना जे काही विचार माडायचे असावेत त्यांची पार गळचेपी होऊन गेली असणार. त्यांच्या लेखी दर्जाचे निकष कोणते, याचा स्पष्ट उल्लेख त्यांनी केला नाही. पुढे भाषणाच्या संदर्भात साहित्यानं पुन:प्रत्ययाचा आनंद द्यावा इत्यादी घासून गुळगुळीत झालेली आणि चर्वितचर्वण होऊन श्रेयमर्यादा स्पष्ट झालेली एक व्याख्या त्यांनी उपलब्ध केली.

साहित्याच्या या आणि असल्या व्याख्या म्हणजे तर्कशास्त्रातली विधानं असतात. ती सर्वच संपूर्ण, निखळ असतील असं नाही. साहित्य पुन:प्रत्ययाचा आनंद देतं हे खरं; पण पुन:प्रत्ययाचा आनंद देतं ते साहित्य असं नाही किंवा सर्वच साहित्य पुन:प्रत्ययाचा आनंद देतं असंही नाही. तेव्हा हा एक निकष म्हणून ठीक असला, तरी एवढ्या एकाच मापानं सर्व साहित्य मोजणं अन्यायाचं ठरेल. ज्यांच्या अनुभवांचा प्रत्यय आणि अर्थ त्यांना स्वत:लाच आजवर कळला नव्हता, अशा तळागाळातल्या माणसानं लिहिलं, तर त्यात तुम्हाला पुन:प्रत्ययाचा आनंद मिळतो आहे की नाही हे तुम्ही पहाणार आणि तसा तो मिळत नसेल तर दर्जाच्या परीक्षेत त्याला नापास करणार, हा काही न्याय नाही.

खरं म्हणजे साहित्याचा दर्जा इत्यादी गोष्टीवर बोलणं तसं धोक्याचंच असतं. कारण असले विषय हिमनगासारखे असतात. त्यांचं छोटंसं टोक बाहेर दिसतं; पण आत असणाऱ्या भल्या मोठ्या समस्याव्यूहाचा तो केवळ भाग असतो. शिखर म्हणा हवं तर आणि या शिखराशी किंवा प्रश्नाशी तुम्ही त्याला अलग करून सामना देऊ शकत नाही. या समस्याव्यूहाला तोंड द्यायला तुमच्याकडे एक कल्पनाव्यूह तयार असायला हवा. — जरी तो (गंगाधर गाडगीळछाप) 'भाकड खटाटोप' वाटला तरी. कारण विचार करणाराकडे अशी एखादी समग्र विचारसरणी, तिच्या यश-मर्यादांच्या जाणिवेसह असेल, तरच अशा साहित्यविषयक प्रश्नाची सोडवणूक करता येईल. नाही तर तो भोंगळपणा ठरेल.

गंगाधर गाडगीळानी आपल्या भाषणाची आणि चर्चेची सुरुवात तर मोठ्या आशादायक सुरावर केली. सध्या साहित्यात निरनिराळ्या प्रकारच्या साहित्यकृतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते आहे. उदाहरणार्थ नट-नट्या, डॉक्टर्स वगैरे आत्मचरित्रं लिहीत आहेत. दलित कथा-कविता-कादंबऱ्या येत आहेत. प्रादेशिक सूत्रांवरचं लेखन वाढीला लागतं आहे, गुन्हेगारीबद्दलही साहित्य लिहिलं जातं आहे. म्हणजे साहित्यात नवनव्या अंगांचे, क्षेत्रांतले अनुभव येत आहेत आणि त्यामुळं साहित्यात काही तरी वेगळं घडतं आहे.

पण या वेगळं घडण्याबद्दल गाडगीळाना खुषी आहे की नाखुषी ? या येणाऱ्या नवनव्या साहित्याला, अनुभवाला गाडगीळ

किल्ल्याचे दरवाजे उघडून आत घेणारेत की नाही ? की हे जरी 'फ्री एक्स्प्रेशन ऑफ पॉवरफुल फीलिंग्ज' असलं, तरी ते 'रिकलेक्टेड इन ट्रान्क्विलिटी' कुठेय ? असं म्हणून त्याला बाहेरच उभं करणार आहेत ? कारण सुरुवातीला जरी या साहित्याची दखल घेऊन झाली, तरी नंतरच्या गाडगीळांच्या उपरोधावरून हा एकूण प्रकार तितकासा दखलपात्र नसावा असा त्यांचा दावा स्पष्ट झाला.

## पुरोगामित्वाचे दडपण

एखाद्या साहित्यप्रकाराला सुरुंग लावण्याची गाडगीळांची पद्धत भयंकर मूलभूत आहे. ग्रामीण साहित्याचं उदाहरण घ्या. ग्रामीण प्रादेशिक पार्श्वभूमीवरचं साहित्य येतं आहे. ठीक; पण गाडगीळ विचारतात, इतकं काही अडलंच आहे का त्यावाचून ? खेडयातल्या माणसांना ग्रामीण जीवनाबद्दल वाचायचच असतं का ? खरं म्हणजे त्यांना तर शहरीकरणाची ओढ असली पाहिजे–म्हणजे असावी. खेडीसुद्धा आता सुधारताहेत तिथे शहरी सुखसोयी येताहेत. महाविद्यालयं आहेत, तिथला प्रशिक्षित शिक्षकवर्ग आहे आणि त्यांनी निर्माण केलेलं काही वातावरण आहे. यंत्रं आहेत इत्यादि इत्यादि. तेव्हा या साऱ्या पार्श्वभूमीवर साडेतीन टक्केवाल्या साहित्यातही या वाचकवृंदाचं समाधान होणं शक्य आहे !

म्हणजे मुळात ज्या प्रकारच्या साहित्याचं अस्तित्वच मुळी अनावश्यक आहे, त्याच्या दर्जाबद्दल कसली चर्चा करता ?– हे शेवटचं विधान गाडगीळांनी केलेलं नव्हतं, पण ते न करताही स्पष्टच होतं.

बऱ्याच साहित्यप्रकारांची अशा तऱ्हेनं विल्हेवाट लावल्यावर गाडगीळांचा मोर्चा दलित साहित्याकडे वळला. हा एक प्रकार मला अनाकलनीय वाटला. दलित साहित्याचा जोरदार प्रवाह सध्या मराठी साहित्यात आहे हे खरं; पण धरण बांधून त्यानं संपूर्ण मराठी साहित्य कबजात घेतलं आहे की काय ? मराठी साहित्याचा दर्जा या विषयाबाबत बोलताना प्रातिनिधिक म्हणून किंवा फक्त दलित साहित्याबद्दलच बोलण्याची आणि त्याच्या पार्श्वभूमी, दर्जा इत्यादींची चर्चा करण्याची वेळ गाडगीळांवर यावी ? एकूण साहित्यचित्रात ३॥ टक्के चर्चेइतकं स्थानदेखील दलितेतर साहित्याला मिळू नये ?

प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे दलित साहित्याचा आणि त्याला जन्म देणाऱ्या दलित चळवळीचा संदर्भ मनात धरत गाडगीळ म्हणतात, 'हल्ली जिकडे तिकडे चळवळी वाढताहेत आणि चळवळी मंडळीदेखील उदंड होताहेत. या चळवळी वगैरे दिसायला आकर्षक दिसतात; पण त्यामधला मोठा धोका मात्र दिसत नाही. तो असा की, या चळवळीमधून पुष्कळ बंधनं येतात. या चळवळींचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या साहित्याचा सूर सदैव कर्कश लागलेला असतो. दलित साहित्यिक जे जीवन टिपतो त्या जीवनातही वैविध्य असतं; पण तिकडे दुर्लक्ष करूनही या साहित्याचा सूर टिपेला लागलेला असतो.

गाडगीळांचा दुसरा मुद्दा असा की, ही चळवळवाली मंडळी शोषण वगैरे मोठेमोठे शब्द वापरतात, पण हे काही खरं नाही. त्यानं फक्त दडपण वाढतं. पुरोगामित्वाचं आणि पुरोगामी जातीयतेचं एक हुकुमशाही वातावरण निर्माण होतं. या तथाकथित पुरोगामित्वाचं दडपण वाढून माणसं धाबरतात आणि मुकाटयानं त्यांच्या सुरात सूर मिसळतात; पण चळवळीतून येणारा दुराग्रह बरा नाही.

भाषिक औदार्याचाही मुद्दा गाडगीळानी घेतला की कशी आपली देववाणी थोर. कशा सगळ्या भाषा संस्कृतमधूनच आल्या. कसं मला एकदा एक पंजाबी भाषण संस्कृतच्या ज्ञानामुळं कळलं, सबब दलित बाधवहो; भाषिक औदार्य बाळगा आणि तुमच्या काव्यातही संस्कृत शब्द असतात याचं भान ठेवा.

हे गाडगीळानी मांडलेले केवळ मुद्दे झाले; पण यांच्यात प्राण आणायचा असेल आणि भाषणाचं स्वरूप कळायचं असेल तर यात पुष्कळसा तिरकसपणा, उपरोध–सरळ आणि बोचरा (आणि वृत्तपत्रीय भाषेत 'मार्मिक') मिळवा, तरच त्याची कल्पना येईल. आपल्या बोलण्याचा सच्चेपणा ऑथेंटिसिटी पटावी म्हणून गाडगीळांनी असंही सांगितलं की, मी किती तरी गावं हिंडलोय ! ग्रंथालीहूनही अधिक गावात मी जाऊन आलो !! तेव्हा माझाही अनुभव किती वजनदार वगैरे आहे !!!

## संकुचित कलावाद

आता या मुद्द्यांवर चर्चा करायची झाली तर एकेक मुद्दा घेऊन, त्याची दुसरी बाजू दाखवून ती अगदी व्यवस्थित करता येईल यात शंकाच नाही; पण त्यामधला जो उपहास आहे, उपरोध आहे आणि विश्वासाचा जो अभाव आहे त्याला कोणता मुद्दा पुरा पडेल ? शेक्सपिअरवर समीक्षा करताना डॉ. जॉन्सननं म्हटलं होतं की, कुठलीही टीकाटिप्पणी वाचण्यापूर्वी वाचकाला स्वतः शेक्सपिअरच वाचू दे. सुजाण सहृदय रसिकतेनं त्याचा आस्वाद घेऊ दे, कारण ही सहृदय एंपथिक रसिकता नसेल, तर तिची जागा कोणतीही विद्वज्जड अभ्यासू टीका घेऊ शकत नाही.

दलित साहित्याच्या कर्कश सुराला गाडगीळांचा विरोध आहे. सर्वच दलित साहित्यनिदान चांगलं म्हणून नावाजलेलं दलित साहित्य–सतत कर्कश सुरातच आहे काय हा एक नीट अभ्यासाचा विषय आहे. कारण तीव्र असूनही कर्कश नसलेलं किती तरी सवेदनाशील दलित साहित्यही आपण सर्वांनी वाचलं आहे आणि दलित जीवनातलं वैविध्य वगैरे शोधायला गाडगीळांनी सांगावं ही तर एक गंमतच आहे. साहित्यात चित्रित होणाऱ्या जीवनाला, त्या जीवनपद्धतीच्या स्वतःच्या काही मर्यादा असतात आणि त्याच्या पलीकडे जाऊन होणारं चित्रण कमअस्सल ठरत असतं. मध्यमवर्गीय लघुकथा ही मध्यमवर्गीय चित्रणच करणार, त्याच्या श्रेय-मर्यादासह आणि त्यामुळे खरोखरच काही बिघडत नाही. कारण तो साहित्यप्रकारच तसा आहे. तेच या कर्कश सुराचं. कर्कश सूर हा ज्या जीवनाचा स्थायीभाव आहे, त्याच्या चित्रणात कोमल सुरांची उसनवारी का करायची आहे ? मग हातभट्टी, झोपडपट्टी वगैरे पार्श्वभूमीवर 'ताई भाऊ तुळसीवृंदावन' असलं काही तरी बटबटीत बघण्याची पाळी येईल ! तीच गोष्ट भाषिक औदार्याची. दलित मंडळी संस्कृतपासून लांब राहिली; पण दलितेतरही मराठमोळ्या, निराळ्या प्रकारचे अनुभव मांडणाऱ्या, निराळी शब्दसंपदा असणाऱ्या भाषेपासून दूरच राहिलेला आहे. तेव्हा भाषिक औदार्य ही उभयपक्षी अंगी बाणवण्याची गरज आहे. व्यासपीठावरून शिक-

वण्याचा नीतिनियम नव्हे.

गाडगीळांना असणारी चळवळीची भीती जवळजवळ चळवळफोबियाच म्हणा ना! आणि दुराग्रहावर त्यांनी चढवलेला हल्ला हीही अशीच तार्किकदृष्ट्या ढिसाळ अशी गोष्ट आहे. सौंदर्यशास्त्र, विनोद इत्यादी-बाबत आपली वॉशिंग्टनची कुऱ्हाड ठामपणे चालवणाऱ्या गाडगीळांनी दुसऱ्याच्या दुराग्रहावर हल्ले चढवावेत? हे हल्ले चढवण्यात सुद्धा कोण दुराग्रह! विचारांच्या साहित्याच्या क्षेत्रात लोकशाही हवी. तेव्हा दलित काय किंवा दलितेतर काय कोणीच आपल्या मतांचा दुराग्रह धरता कामा नये. पुरोगामी जातीयता, शोषण वगैरे नकली शब्द, पुरोगामित्वाच्या नावाखाली तयार होणारं हुकूमशाहीचं वातावरण आणि त्याचं येणारं दडपण या साऱ्याचा बाऊ वाटायचं कोणाही सुजाण माणसाला कारण नाही. कारण दुराग्रह आणि ढिसाळपणा याच्यामधली एक समतोलाची स्थिती असते आणि आतल्या न्यायबुद्धीनं, विवेकानं ती शोधायची असते. चांगल्याला चांगलं आणि वाइटाला वाईट ठामपणे म्हणणं आणि तरीही सतत नवे विचार, नवे प्रवाह, चळवळी आत्मसात करण्यासाठी जागरूक रहाणं हे महत्त्वाचं आहे आणि हा बौद्धिक लवचिकपणा असला म्हणजेच स्वतःचा दुराग्रह नसला—तर पुरोगामी आणि प्रतिगामी, शोषण आणि चळवळी असल्या साऱ्या शब्दजंजाळाच्यापलीकडे जाऊन त्यातलं तथ्य शोधण्याची कुवत, योग्य पर्स्पेक्टिवमध्ये त्याचा विचार करण्याची क्षमता कुठल्याही चांगल्या समीक्षकाकडे असते—असावी.

गाडगीळ कलावादी आहेत आणि कलावादाला काही मर्यादा आहेत हे खरं; पण ज्या विचारधारेनं एवढ्या बुद्धिमंताची मनं काबीज केली, जीवनवादाशी समर्थ टक्कर दिली आणि उत्तमोत्तम समीक्षा दिल्या, तो कलावाद या एवढ्याशा पायावर स्वत:ला दुमडून, अंग चोरून उभा असेल असं वाटत नाही. प्रख्यात कलावादी समीक्षक ए. सी. ब्रॅडले म्हणतो त्याप्रमाणे कलेचं अस्तित्व अ-लौकिक असतं; पण जीवन आणि कला या दोहोंमधून एकच अंत:प्रवाह वाहात असतो. एकमेकांना कधीही न मिळणाऱ्या या दोन समांतर रेषा आहेत आणि तरीही त्या त्यांच्यातला आशय समान आहे. कला-जीवनाशी फटकून नसते!

कलावादी साहित्यिकाचं सर्वच साहित्य अ-लौकिक असलं तरी सामाजिक आशय हरवलेलं नसतं. चागलं साहित्य हस्तिदंती मनोऱ्यातलं असूच शकत नाही. कारण त्याच्या आशयाचा अस्सलपणा त्याला या मातीतूनच मिळायचा असतो. चळवळी हे सामाजिक सत्य आहे आणि ते नाकारून समाज स्थिर—स्थावर ठेवू बघणाऱ्यांची अवस्था कूपमंडूकाहून वेगळी होणार नाही.

या साऱ्याबद्दल एवढ्या विस्तारानं लिहायचं कारण एवढंच आहे की, हा सारा वाईट कलावादी समीक्षेचा हुबेहुब नमुना होता. मोकळेपणाच्या नावाखाली चलाखीनं घुसवलेले हे उघड संकुचित विचार होते आणि त्याबद्दलचा निषेध नोंदवणं मला कर्तव्यच वाटलं. या साऱ्या गदारोळात पुष्पाबाईंनी लावलेला विवेकाचा सूर हरवून जाईल की काय याची मला रास्त भीती वाटते आहे. बाईंनी मांडलेल्या मुद्द्यापैकी काही महत्त्वाचे मुद्दे असे आहेत—

## बहुविध निकष

आजच्या मराठी साहित्याच्या दर्जाबद्दल बोलणं कठीण अशा कारणासाठी आहे की, साहित्य ही एक सलग परंपरा आहे आणि त्यात हे आजचं आणि हे कालचं असे भेद करणं कठीण आहे. अनेक प्रवाह असणाऱ्या या साहित्यपरंपरेबद्दल आजच्या संदर्भात बोलायचं झालं, तर या परंपरेत आज काही नवीन भर घालता आली आहे का, असा निकष लावावा लागेल आणि या संदर्भात आजचं साहित्य कालच्या साहित्यापेक्षा अधिक संपन्न, अनुभवसमृद्ध आहे असं ढोबळ मानानं म्हणता येईल. एकाच किंवा एकारलेल्या निकषावर दर्जा अवलंबून ठेवणं ही साहित्यिक परिपक्वता नाही. कारण सर्व साहित्य एका निकषाच्या साच्यातून काढलेलं नसतं आणि नसावंही. तेव्हा बहुविध निकष—मल्टी—क्रायटेरियावरून दर्जा ठरवला गेला पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे दर्जा ही केवळ लेखकानं पोकळीत साधायची गोष्ट नाही, तर वाचकानंही भर द्यायची गोष्ट आहे. तेव्हा आपापल्या लायकी / दर्जाप्रमाणे लेखक आणि वाचक एकमेकांना मिळत असतात. या ठिकाणी मल्टी—क्रायटेरियाचं महत्त्व स्पष्ट होईल. उदाहरणार्थ— ना. सी. फडके छाप लेखन. आता फडके ही लेखनाची प्रवृत्ती तर आहेच; पण आधिक्यानं ती वाचनाचीही प्रवृत्ती आहे; पण आपल्या काळात फडके हे साहित्यचित्राच्या केंद्रभागी होते. आज मात्र ही फडके—प्रवृत्ती म्हणजे उदाहरणार्थ— व. पु. काळेछाप इत्यादी लेखक साहित्य-चित्राच्या मध्यभागी मानाचं स्थान अडवून बसल्याचं चित्र सुदैवानं दिसत नाही आणि हे आशादायक चित्र आहे.

आपल्या मनातली मूल्यव्यवस्था ढासळणार नाही, अशा तऱ्हेचं सौम्य, गोड-गुलाबी वाचावं अशी अपेक्षा ठेवायची, तर दर्जा त्याच्याशी एकरूप मानता येणार नाही. अर्थात अशा प्रवृत्तीही सनातनच आहेत आणि म्हणून चागलं साहित्यही नेहमीच दुर्मिळ असत आलं आहे. कारण अखेर साहित्य, कला हा समग्र जीवनाचा, जीवनदृष्टीचा भाग आहे आणि सध्याच्या मराठी साहित्याचा दर्जा अशा मर्यादित विषयाबद्दल बोलायचं झालं, तरी या सामाजिक संदर्भाची दखल घ्यावीच लागेल.

आणि शेवटी हे एक निरीक्षण.

मागच्या वर्षीच्या पर्यायी संमेलनाच्या तुलनेनं या संमेलनाला कमी गर्दी होती—कथाकथनाचा अपवाद वगळता मागचं संमेलन अगोदरच हीट आणि हॉट म्हणून गाजलं होतं आणि या संमेलनाला तसं काही वलय नव्हतं, म्हणून तर रसिकांनी हा फरक केला नसावा ना?

रंगभूमी

# पुरुष

## भ्रष्ट समाजाच्या विरोधातले क्षीण स्पंदन !

'कलावैभव' निर्मित 'पुरुष' हे नाटक पाहिले आणि एक चांगले नाटक पाहिल्याचे समाधान मिळाले. श्री. जयवंत दळवीलिखित आणि विजया मेहता दिग्दर्शित असलेले हे नाटक अनेक प्रकारे प्रेक्षकांच्या चर्चेचा विषय झाले आहे.

एका खेडेगावातल्या शाळेत श्री. आपटे हे राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले, कट्टर गांधीवादी शिक्षक. त्यांची तरुण कन्या अंबिका लोहियावादी आहे आणि लोहिया विद्यालयात शिकवते. दलित चळवळीचे कार्य करणाऱ्या सिद्धार्थबरोबर तिने लग्न ठरविले आहे. राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या अण्णांच्या दर्शनार्थ गुलाबराव आपटयांच्या घरी येतो. पूर्वी अंबिकेची आणि त्याची एक चकमक झालेली असते; पण ती विसरून तुम्ही डाकबंगल्यावर या म्हणजे मीटिंगच्या वेळी साखरकारखानदारांकडून शाळेसाठी देणग्या मिळवून देतो असे आश्वासन देतो. अंबिका डाकबंगल्यावर जाते. तेथे गुलाबराव एकटाच असतो. तोही तिची लवकर दखल घेत नाही. अंबिका चिडून त्याचा अपमान करते. गुलाबरावांचा अहंकार दुखावून तो टोकाला जाऊन बलात्कार करतो. न्यायालयात अंबिकेला न्याय मिळत नाही. वृत्तपत्रे सत्य छापू शकत नाहीत. प्रियकराचे कचकाऊ धोरण पाहून अंबिका लग्न मोडून टाकते; पण ती उध्वस्त होत नाही, हतबल होत नाही. गुप्तक्रांतिकारक बंडाला हाताशी धरून गुलाबरावाला लिंग छाटण्याची सजा देते. स्वत:हून पोलिसांना फोन करते.

असे हे थोडक्यात कथानक. गुंड विरुद्ध सत्शील हा विषय तसा मराठीत किंवा कोणत्याच भाषेच्या साहित्यात नवीन नाही. अनेक कथा–कादंबऱ्या, चित्रपटातून अशा प्रकारची कथानके येऊन गेली आहेत; परंतु वास्तवतेच्या ज्या सुजाण भानाने या नाटकाची कथावस्तू उभी राहिली आहे, व्यक्तिचित्रे रंगविली आहेत, त्यामुळे हे नाटक वैशिष्टयपूर्ण ठरले आहे, अर्थपूर्ण झाले आहे. श्री. जयवंत दळवींचे यापूर्वीचे 'संध्याछाया' कौटुंबिक जिव्हाळयाचे आणि संघर्षाचे नाटक होते. 'बॅरिस्टर' अपवादात्मक मनोवृत्तीच्या एका माणसाभोवती उभे होते. 'महासागर' या नाटकात विवाहबाह्य प्रेमाची, मोहाची तडफड होती. भ्रष्ट राजकारण चितारण्याचा प्रयत्न 'सूर्यास्त'मध्ये होता. नोकरीमुळे उद्भवणारा परपुरुषाशी संबंध, त्यातली कुतरओढ हा 'सावित्री' या नाटकाचा विषय होता. या सर्व नाटकांशी तुलना करता दळवींच्या 'पुरुष' या नाटकाचा पट व्यापक आहे.

'पुरुष' हे नाटक कोण्या एका व्यक्तीच्या कथेचे नाही. हे दोन मनोवृत्तींचे नाटक आहे. दोन भिन्न मनोवृत्तींच्या संघर्षाचे नाटक आहे. सत्तेच्या पायऱ्या चढू इच्छिणारा गुलाबराव! त्याच्या विरोधात उभी ठाकली आहे सर्व समानता मानणारी, काही ध्येयवादाने शाळेचे काम करणारी अंबिका. ही दोन्ही माणसे जिद्दी आहेत, अहंकारी आहेत. आपापल्या परीने कर्तृत्ववान आहेत. मात्र गुलाबराव स्वार्थी आहे. त्याला पापपुण्याचा विधिनिषेध फारसा नाही. तो बेरकी आहे. भोवतालच्या प्रत्येक माणसाला जोखून आहे. प्रत्येकाला कसे वापरायचे ते जाणून आहे. अंबिकेला व्यक्तिगत पातळीवर काही मिळवायचे नाही. जे काही मिळवायचे आहे ते समाजासाठी मिळवायचे आहे. भोवतालच्या जगाचे अंबिकेचे ज्ञान गुलाबरावाइतके मुरब्बी नाही. किंबहुना गुलाबरावापुढे ती भाबडीच आहे. गुलाबरावाचा प्रत्येक शब्द दुसऱ्याला जिंकण्यासाठी किंवा हरविण्यासाठी अतिशय धूर्तपणे उच्चारला जातो. अंबिकेच्या प्रत्येक शब्दात तारुण्याचा आवेश आहे. ध्येयाचे प्रेम आहे. गुलाबरावाचे सामर्थ्य त्याच्या सत्तेच्या खुर्चीत आणि मुरब्बीपणात आहे. अंबिकेचे सामर्थ्य ध्येयनिष्ठेमुळे निर्माण झालेल्या आत्मबलात आहे. या दोन व्यक्तींच्या संघर्षाला आणखी एक स्तर आहे. गुलाबराव पुरुष आहे. अंबिका स्त्री आहे.

या मूळ संघर्षाला इतर अनेक पदर आहेत. प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या विचाराने, मार्गाने जात असताना मूळ संघर्षाला छेदीत जाते. यात जातीय अन्यायाविरुद्ध चळवळ करणारा, स्वत:ला मोठा बंडखोर समजणारा दलित सिद्धार्थ आहे. अहिंसेचे तत्त्वज्ञान मन:पूर्वक पाळू इच्छिणारे भाबडे अण्णा आहेत. सरळ चारचौघांसारखे जगू इच्छिणारी अंबिकेची आई आहे. स्वत: धाडसी नसली तरी अंबिकेला सर्व मदत करणारी विश्वासू मैत्रीण मथू आहे. हुकुमाचा ताबेदार पांडू आहे. हातात कोयता घेऊन न्याय मिळवणारा बंडा आहे. या सर्व व्यक्तींच्या विचारांचे, कृतींचे आणि जीवनाचे धागे एकमेकांत गुंतून नाटक पुढे पुढे जाते–प्रेक्षकांच्या कौटुंबिक, सामाजिक, राजकीय जाणिवेला चालना देत पुढे जाते. प्रेक्षक नाटकाबरोबरच पुढे वाहात जातात.

### जिवंत व्यक्तिरेखा

दळवींच्या प्रतिभेचे वैशिष्टय हे की, या नाटकातील प्रत्येक पात्राला स्वत:ची विचारसरणी असूनही ही पात्रे म्हणजे त्या विचारसरणीचे वाहन करणारे ठोकळे वाटत नाहीत. कारण त्या त्या व्यक्तीच्या अंतरंगाचा सूर लेखकाला अचूक सापडला आहे. सिद्धार्थ आणि अण्णा ताराबाईइतके चाकोरीतून जाणारे नाहीत; पण गुलाबराव आणि अंबिकेच्या ताकदीचे नाहीत. ते सामान्य कुवतीचे आहेत त्यांच्या सामान्य कुवतीच्या व्यक्तिमत्त्वातही फरक आहे. अनेक लहानमोठया प्रसंगांतून राष्ट्रपतींनी केलेल्या गौरवपूर्ण भाषणात अण्णा रंगतात. सत्कारसोहळयात रमतात. 'निसर्गाच्या कुशीत एखाद्या शाळेत शिक्षक व्हावं ही माझी इच्छा' या गुलाबरावाच्या बोलण्याला ते फसतात. गुलाबरावाच्या घरी येण्यानेच ते भारावून जातात.

अण्णाचा भाबडेपणा यातून प्रकट होत जातो. मात्र ते बुळे वाटत नाहीत. बलात्कारानंतर घरी आलेल्या गुलाबरावावर ते उसळतात आणि काय बोलतात ? 'अन्यायाविरुद्ध मी उपोषण करीन !' गुलाबराव उत्तर देतो, 'उपोषणाला घाबरणारी माणसं सत्तेचाळीस सालीच इंग्लंडला निघून गेली !' अण्णाच्या डोक्यात भिनलेले अहिंसेचे तत्त्वज्ञान व गुलाबरावाचा सत्तेचा कैफ–आपले सामाजिक व्यंग या लहानशा संवादात दिसते. असे संवाद या नाटकात जागोजागी विखुरले आहेत. ते निरनिराळ्या पात्रांना जिवंत करीत जातात. 'आमचा फुफाटा आमची जलन तुम्हाला कशी कळणार तूप लोणी–खाणाऱ्यांना ?' हे सिद्धार्थाचे वाक्य त्याच्या व्यक्तिमत्त्वातल्या मर्यादा, पोकळपणाही दाखवून जाते. बलात्कार झाल्याबरोबर सिद्धार्थ एकदम अंबिकेला सोडत नाही. तसा तो एक मोर्चा काढतो. आपण शांतपणे विचार करायला पाहिजे असे म्हणतो. तो जरी तिला टाळू लागला तरी भेटतो तेव्हा मी तुझ्यामागे खंबीरपणाने उभा आहे अशीच भाषा वापरतो. यामुळे तो एक माणूस वाटतो, खलपुरुष वाटत नाही किंवा अतिभेकड वाटत नाही. त्याचे वागणे माणसाच्या स्वभावाला धरून वाटते.

समाजकार्य करणाऱ्या घरातले, कुटुंबातले वातावरणही अगदी योग्य वाटते. ही सगळी माणसे मोकळी बोलतात. 'सहज फेरफटका मारायला मी काय घाऱ्या डोळ्यांचा ब्राह्मण आहे? ' हे अण्णाकडे पहात सिद्धार्थ सहजपणे बोलू शकतो. त्यावर अण्णाही चिडून म्हणतात, 'आता जानवं तोडून देऊ का ? ब्राह्मणांना नावं ठेवून तुम्ही ब्राह्मणाच्या मुली गटवता ' असे अण्णा बोलतात. ताराबाई आपल्या कृतीने सिद्धार्थाला त्याच्या खालच्या जातीची जाणीव देतात; पण त्यांच्यात कोठे कटुपणा येत नाही. हे दाखविणे फार कठीण आहे; पण या नाटकात ते जमून गेले आहे.

आणखी एक कठीण प्रसंग दाखविणे असेच जमले आहे. गुलाबराव अंबिकेला डाकबंगल्यावर बोलावतो, तेव्हा त्याचा हेतू बलात्काराचा वाटत नाही. केवळ अंबिकेला कोणत्या ना कोणत्या कारणाने उपकृत करण्याचा वाटतो. गुलाबरावासारखा हुशार, सुशिक्षित, पुष्कळसा सुसंस्कृतही असलेला माणूस अंबिकेसारख्या सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीवर बलात्कार करील हे संभवनीय वाटत नाही; परंतु ज्या प्रकारे प्रसंग चढत जातो त्यात हे पटते. अंबिकेकडून गुलाबराव आधी अपमानित होतो, मग त्याचा अहंकार दुखावला जातो. त्या दुखावण्यातून बेभान होऊन त्याच्यातला सैतान जागा होतो. म्हणून हा बलात्कार पटू शकतो. एरवी ती एक भडक फिल्मी घटना वाटली असती.

नाटकाचा प्रयोग अतिशय नेटका होतो. विजया मेहताच्या दिग्दर्शनात ते अपेक्षित आहेच. लेखकाने जे लिहिले आहे ते दिग्दर्शक कलाकार यांनी उचित भानाने प्रेक्षकांपर्यंत पोचविले आहे. सर्वच पात्रांचे चेहरे, शरीरयष्टी आपापल्याला भूमिकेला अतिशय योग्य आहे. अंबिकेची तेजस्विता रिमा लागूंच्या चेहऱ्यात, नजरेत, लावण्यात, चालण्यात क्षणाक्षणाला दिसते. बलात्कारानंतर अंबिका उध्वस्त किंवा हतबल झालेली नाही हे रिमा लागूंच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर त्या काही बोलण्यापूर्वीच कळते. गुलाबरावाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध छटा नाना पाटेकरांनी फार सहज दाखविल्या आहेत. अनेक मिश्किल संवाद त्याच्या वाट्याला आलेले असूनही त्यांनी प्रेक्षकांना हसविण्यासाठी ते मुद्दाम फेकले नाहीत. प्रत्येक शब्दाचे वजन ओळखून ते बोलले गेले आहे. कुमार फोंडकर यानी सिद्धार्थ समंजसपणे उभा केला आहे. चंद्रकांत गोखले (अण्णा) उषा नाडकर्णी (ताराबाई) सोनाली जोशी (मधू) यांनी आपापल्या भूमिका व्यवस्थित सांभाळल्या आहेत. रघुवीर तळाशीकर यांच्या नेमथ्याने शिक्षकाचे घर, डाकबंगला यातील सजावट योग्य केली आहे. दिलीप कोल्हापूरकर यांचे पार्श्वसंगीत प्रसंगानुरूप आहे.

सुजाण लेखन, नेटका प्रयोग यामुळे हे नाटक प्रेक्षकांची पकड घेते. ◻

## त्याच्याकडे सत्ता आहे, मुख्य म्हणजे तो पुरुष आहे !
## –जयवंत दळवी

नाटक पाहिले आणि मनात अनेक विचार आले. हजरबाबी, बेरकी, धीम्या अशा सत्ताधारी पक्षाच्या माणसाची व्यक्तिरेखा कशी निर्माण झाली असेल ? त्यासाठी श्री. दळवींनी कसा अभ्यास केला असेल ? या नाटकातील संघर्ष स्त्री विरुद्ध पुरुष असा कितपत आहे ? सत्ताधारी विरुद्ध ध्येयवादी असेच त्याचे मूळ स्वरूप दिसते. मात्र स्त्रीमुक्ती हा विषय लेखकाच्या मनात निश्चित दिसतो. मूळ नाट्यसंहितेत आणि प्रयोगात काही लहान-मोठे बदल आढळले. या बदलांची कारणे कोणती असावीत ?

असे अनेक प्रश्न डोक्यात ठेवून मी श्री. जयवंत दळवी यांची त्यांच्या घरी भेट घेतली. श्री. दळवी यांच्याशी अगदी अनौपचारिक गप्पा झाल्या. त्यांनी बहुतेक सर्व प्रश्नांची उत्तरे समाधानकारक दिली. पूर्वी पत्रकारितेत घालविलेली काही वर्षे, वर्तमानपत्राचे वाचन आणि संपादक मित्रांशी गप्पागोष्टी यातून गुलाबराव जाधव यांची व्यक्तिरेखा उभी राहिली आहे. या 'व्यक्तिरेखेसाठी मुद्दाम खास वेगळा अभ्यास त्यांना करावा लागला नाही. या वाचनातून, निरीक्षणातून, ऐकण्यातून नाटक लिहिले गेले. मूळ नाटकाची संहिता आणि प्रयोग यात काही बदल आहेत. नाट्यसंहितेत पोलीसस्टेशनवरील दृश्ये होती. पण प्रयोगात ती घेणे गैरसोयीचे होते म्हणून ती गाळून टाकली. आणखीही एक महत्त्वाचा बदल प्रयोगात केला आहे. बलात्कारानंतर गुलाबराव जेव्हा अंबिकेच्या घरी येतो तेव्हाच बंडाही तेथे येतो असा प्रसंग मूळ नाट्यसंहितेत होता; पण यामुळे पुढे काय घडणार याची प्रेक्षकाना आधीच कल्पना आली असती आणि त्या प्रसंगाचा ताण कमी झाला असता. उच्चतमबिंदु (Climax) बरोबर गाठला गेला नसता. या दृष्टीने बंडाचे हे आधीचे आगमन प्रयोगात गाळले गेले. श्री. दळवी आणि विजया मेहता यानी चर्चा करून हे बदल केले. नाटकाच्या प्रयोगात हे गाळणे कोठे जाणवतही नाही.

श्री. दळवींच्या मते सत्ताधारी विरुद्ध ध्येयवादी आणि स्त्री विरुद्ध पुरुष हे दोन्ही संघर्ष या नाटकात एकजीव झाले आहेत.

तो सत्ताधारी आहे आणि पुरुष आहे म्हणून तो तिला उध्वस्त करू शकतो. उध्वस्त करण्याचा हुकमी उपाय अवलंबू शकतो.स्त्रियावर होणारे अन्याय, बलात्कार ही दळवीच्या अंत:करणातली सततची वेदना आहे. यामुळे ती त्याच्या नाटकातून व्यक्त होत रहाते. म्हणूनच मनात नसताना मथूला स्लीव्हलेस ब्लाऊज घालून सेक्सी दिसायला लागतं. ताराबाईंना नऊवारीऐवजी पाचवारी नेसायला लागतं. अंबिकेवर बलात्कार होतो. बलात्काराला फटक्यांची शिक्षा श्री. दळवीच्या मते बरोबर नाही. म्हणूनच त्यांची तडफदार अंबिका ज्या जोरावर पुरुष बलात्कार करतो ते लिंगच छाटण्याची सजा देते!

### विसंगती टाळली

मी दळवीना मध्येच म्हटले, 'गुलाबराव बलात्कार करतो याचे कारण तो पुरुष आहे यापेक्षा, त्याला सत्तेचा कैफ आहे, हे आहे. माझे कोणी वाकडे करू शकणार नाही अशी त्याला धुंदी आहे. आपल्या भोवतालच्या ज्या सत्ताधारी पक्षातील माणसाचे गुलाबराव प्रतिनिधित्व करतो त्या सत्ताधाऱ्याची गगोत्री कोण, स्त्री की पुरुष? म्हणजे बलात्कार सत्तेने केला आहे.' श्री. दळवी म्हणाले, 'सत्ता तर कारण आहेच; पण त्याबरोबर तो पुरुष आहे आणि ती स्त्री आहे हेही अत्यंत महत्त्वाचे कारण आहे.' माझ्या मनात असलेला आणखी एक प्रश्न मी विचारला. बलात्कारानंतर गुलाबरावाला सजा देण्याचे मनात योजून अंबिका डाकबंगल्यावर येते. गुलाबरावाशी बोलते. गुलाबराव बडबडत असतो. 'स्त्रियांचं काम गरोदर रहाणं, पुरुषांना सुख देणं...तुम्ही मास्तरणी उगीच.' त्या वेळी अंबिकेच्या डोक्यावर इंदिरा गांधीचा मोठा फोटो लटकावलेला होता. अंबिकेने एकदा त्या फोटोकडे नुसते पहायला हवे होते. गुलाबरावाची बडबड क्षणभर तरी थांबली असती. दळवी अगदी जोरात हसून म्हणाले, 'खरंच! असं करायला काही हरकत नव्हती.' मग आमच्या गप्पा नाटकाच्या शेवटाकडे वळल्या. मी म्हटले, अंबिका बंडाशी संपर्क साधते ही गोष्ट गुलाबरावाला कळत नाही हे खेडेगावाच्या पार्श्वभूमीवर विसंगत वाटते. दळवीच्या मते बंडाचा आधी गुप्तपणे क्रांतिकार्य करणारा म्हणून उल्लेख आहे. त्यामुळे त्याच्या बाबतीत हे गुलाबरावाला न कळणे बरोबर आहे. कारण सत्ताधारी पुंडाचे हातपाय तोडणारा माणूस ठकास ठक असणारच. शेवटी अंबिका स्वत:हून पोलिसांच्या स्वाधीन होते या घटनेभोवती हौतात्म्याचे वलय आहे. सर्वसामान्य माणसाला हौतात्म्याचे आकर्षण असते. स्वत:ची तयारी नसली तरी नाटकात, सिनेमात ते पहाणे त्याला आवडते. म्हणून अंबिका शेवटी हे बलिदान करते का? तिच्यासारख्या तडफदार मुलीला दुसरा मार्ग नव्हता का?' श्री. दळवी म्हणाले, मला हाच शेवट स्वाभाविक वाटला. अंबिका लोहियावादी आहे. गांधीवाद आणि लोहियावाद दोघांच्याही विचारसरणीप्रमाणे कायदे तोडा; पण त्याची शिक्षा भोगा! त्यामुळे अंबिका इतर कोणता पर्याय शोधण्याची शक्यताच नाही. शेवटी तिने पण निघून जाऊन बंडाच्या कार्यात सामील व्हायचे असे सांगणारी पत्रे मला आली; पण मला ते पटले नाही. असे करणे अंबिकेच्या तत्त्वज्ञानाशी विसंगत वाटले असते. ◻

---

## मला बुवा / बाई असं वाटतं!

---

नाटक पाहिले. लेखकाचे मत ऐकले आणि मग आम्ही स्नेहीमंडळीनी जमून या नाटकावर चर्चा केली. मी काही प्रश्न पुढे मांडले. त्यावर सगळ्यांनी मिळून भरपूर गप्पा मारल्या.

**प्रश्न**– नाटक आवडले का? आवडले असले किंवा नसले तर कारणे कोणती? विषय कसा वाटतो?

**प्रतिक्रिया**– भोवतालची जी परिस्थिती आपण पहातो तिचे अगदी बरोबर चित्र नाटकामध्ये आहे म्हणून नाटक आवडलं; पण नाटक फार गंभीर आहे. मधेमधे रिलीफ पाहिजे, तो नाहीए. म्हणून करमणूक होत नाही. या नाटकात करमणुकीची अपेक्षाच नाही. याच्यातून जे विचार सुरू होतात तोच आनंद! गुलाबराव जाधवाच्या काही संवादांना हसू येतं. तो आहेच की रिलीफ! छे. त्याच्या संवादांनी हसू आलं तरी आपला अगदी भयंकर उद्रेक होतो. त्यात रिलीफ वाटत नाही. तसा बलात्कार हा विषय भडकच आहे. आक्रोश सिनेमात तो येऊनही गेला आहे; पण इथे एका बुद्धिजीवी स्त्रीवरचा बलात्कार आहे म्हणून विषय वेगळा वाटतो.

**प्रश्न**– दलित सिद्धार्थचे चित्र पटलं का? सिद्धार्थ आणि अंबिका एकमेकावर प्रेम का करतात ते समजू शकते का?

**प्रतिक्रिया**– आजच्या शिक्षित दलितांचं अगदी बरोबर चित्र सिद्धार्थमध्ये आहे. तो अगदी फुसका आहे. त्याचं बोलणं, चालणं, वागणं सगळं अगदी टिपिकल दलित आहे. स्त्री स्वत:पेक्षा श्रेष्ठ पुरुषाकडे आकर्षित होते. इथे तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा कस सगळ्या दृष्टीनी तिच्यापेक्षा कमीच आहे; पण ध्येयाच्या प्रेमाने ती त्याच्यावर प्रेम करायला लागली असावी. श्रेष्ठ पुरुषावर प्रेम करते मुळातच चुकीचं. आपल्यापेक्षा कमीच बरा म्हणजे आपला होल्ड राहील असाही विचार असेल! मी म्हणतो हे केवळ सहवासाचं प्रेम आहे. राष्ट्रसेवादलात असे किती तरी प्रेमविवाह होऊन गेले आहेत. ते दळवीच्या समोर आहेत. त्यातून हे चित्र आलं आहे; पण नुसत्या सहवासाचं प्रेम तकलादू असतं हेच यातून दिसतं. तो तिला वापरून घेतो. तिच्याकडून नेहमी पैसे घेतो. तिच्यावर बलात्कार झाल्यावर मात्र तिच्या मागे खंबीरपणे उभा रहात नाही. तो पळपुटा आहे. ती स्वत:हून त्याला लग्न नको म्हणते, ते तिच्या तडफदारीला शोभूनच दिसत; पण मी एक समजू शकते प्रत्येक माणसाची वैवाहिक जीवनाची, बायकोबद्दलची काही स्वप्नं असतात. त्यात बलात्कार झालेली स्त्री नसेल बसत. या दृष्टीने सिद्धार्थकडे बघायला पाहिजे. एकदम त्याला वाईट म्हणून चालणार नाही! ही तर जुनीच दृष्टी– 'स्त्री'चा दोष नसतानासुद्धा तिला शिक्षा. शरीर भ्रष्ट झालं की संपलं! शिवाय इतरांचं सोडा; पण सिद्धार्थ म्हणजे बंडखोर. दलितांच्या चळवळीसाठी गावोगाव

फिरणारा. याला प्रेयसीच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविता येत नाही? सिद्धार्थ आहेच पळपुटा; पण तीसुद्धा अघोचर आहे. डाक-बंगल्यावर एकटी गेलीच कशाला? तिची आई सांगत होती कोणाला तरी बरोबर घेऊन जा. तसं हिनं ऐकलं असतं तर काय बिघडलं असतं? पण अंबिका थोडी वेगळीच आहे. तुम्ही बोलताय ते सर्वसामान्य स्त्रीचं! जिला काही सामाजिक कार्य करायचं आहे, तिला एकटं जाण्याचा धोका पत्करलाच पाहिजे! बरोबर आहे अंबिकेचं एकटं जाणं; पण दळवी हे असं काही तरी दाखवून ठेवतात. म्हणजे लोकांना शेवटी काय वाटतं बाई एकटी घराबाहेर गेली की, हे अस्सं होणार! अंबिकेचं एक मात्र पटत नाही. ज्यांच्याशी भाडणार त्यांच्याकडून देणग्या बरी घेणार!

प्रश्न– या नाटकातला संघर्ष सत्ताधारी विरुद्ध बडखोर (किंवा ध्येयवादी) असा आहे, स्त्री विरुद्ध पुरुष असा नाही, याबद्दल काय म्हणाल? नाटकाचं 'पुरुष' हे नाव पटतं का?

प्रतिक्रिया– पुरुष विरुद्ध स्त्री असाच संघर्ष आहे. कारण गुलाबराव तिच्यावर बलात्कार करतो.

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

बलात्कार तो चिडून जाऊन करतो. ती एक अपघात म्हणून घडलेली घटना आहे. नाटकाचा खरा विषय सत्ताधाऱ्यांविरुद्ध माडलेले युद्ध हाच आहे. युद्ध माडणारी व्यक्ती स्त्री की पुरुष याला महत्त्व नाही. नाटकाला 'सिंहासन'सारख काही तरी नाव हवं होतं. महत्त्व कसं नाही? अंबिकेच्या जागी एखादा तरुण मुलगा असता, तर काही बलात्कार नसता झाला. मग सगळं बदललंच असतं! हे दोन्ही संघर्ष मला वाटतं एकजीव झाले आहेत. एकजीव झालेले नाहीत. स्त्री-मुक्ती हा हल्लीचा आवडता विषय आहे. तो चलनी नाण्यासारखा वापरून घेतला आहे. 'पुरुष' हे नाव दिशाभूल करतं; पण शेवटी ती अपमानित, भ्रष्ट केली जाते ती स्त्री म्हणून– ती सूड उगवते तोही स्त्री म्हणून–म्हणजे स्त्री विरुद्ध पुरुष असंच नाटक आहे! गुलाबरावाचं व्यक्तिमत्त्व सबंध नाटकाला व्यापून राहिलं आहे. गुलाबरावाला सत्तेची गुर्मी आहे. म्हणजे सत्ता विरुद्ध ध्येयवादी असंच हे नाटक आहे! गुलाबरावांनी नाटक व्यापून टाकलं. कारण नाना पाटेकरचा मस्त अभिनय! नाना पाटेकरनी सगळं नाटक खाऊन टाकलं आहे; पण रिमा लागूसुद्धा अभिनयात कमी नाही. तीच मुख्य आहे. तिच्यावरच नाटक आहे. स्त्रीच्या दुःखाचंच हे नाटक आहे. त्याचं कारण पुरुष आहे. म्हणून 'पुरुष' हे नाव बरोबर आहे! 'पुरुष' हे नाव अगदी योग्य आहे. कारण यातला प्रत्येक पुरुष स्त्रीवर अन्याय करतो. मी म्हणून नवऱ्यांनी टाकलेल्या बाईशी लग्न केलं असं बोलून किंवा दुर्लक्षून अंबिकेचे वडील तिच्या आईवर अन्याय करतात. अंबिकेचे पैसेबिसे व्यवस्थित वापरून सिद्धार्थ अंबिकेवर अन्याय करतो. गुलाबरावही अंबिकेची खोडकी जिरवण्यासाठी तिच्या स्त्रीत्वावर आघात करतो. अंबिकेच्या मैत्रिणींच्याही अशाच कथा ऐकू येतात; पण 'पुरुष' नावावरून नाटक गलिच्छ असेल असं वाटतं. कारण अशी नाटकं हल्ली असतात; पण जयवंत दळवी, विजया मेहता ही नावं आल्यावर असं वाटूच शकत नाही.

प्रश्न– नाटकाचा शेवट पटतो का?

प्रतिक्रिया– शेवट पॉझिटिव आहे, म्हणून मला आवडला! मुख्य म्हणजे निश्चित असा शेवट आहे. नाही तर हल्ली नाटक आपलं मध्येच कुठे तरी संपवतात आणि प्रेक्षकावर सोडून देतात–तिला न्याय मिळत नाही, इथेच आपलं नाटक संपवून टाकायचं असं केलं नाही! शिवाय शेवट तिच्या सगळ्या तडफेला साजेसा आहे. न्यायालयात जो न्याय मिळत नाही, तो ती समर्थपणे मिळवते! ती बंडाशी संपर्क साधते. ही गोष्ट बेरकी गुलाबरावाला कळत नाही. विशेषत: खेडेगावातल्या वातावरणात हे मात्र खटकतं; पण नाटक म्हणून आपण काही कन्सेशन द्यायला पाहिजे की नाही? तसं म्हणाल तर असा शेवट नाटकातच होऊ शकतो. प्रत्यक्षात काही होणार नाही, असंच काही नाही. एखादी तेजस्वी बाई दाखवेलच अशी कृती करून. दाखवील; पण मला अंबिकेचं एक नाही आवडलं. तिनं शेवटी गुलाबरावाचा काटा काढायला एका पुरुषाचं सहाय्य घेतलं! घेतलं तर घेतलं–तिचं वैर गुलाबरावाशी होतं, बंडाशी नव्हतं! आपण असं म्हणू शकतो; तिनं बंडा या नावाचा रिव्हॉल्व्हर वापरला, चाप ओढणारी तीच होती; पण मला वाटतं तिनं पुरुषाची अगदी जाम मदत घ्यायला नको होती. स्वत: पिस्तुलानं त्याच्यावर गोळी झाडायची– किंवा चहातून त्याला विष द्यायचं; पण पुरुषाची मदत घ्यायला नको होती. म्हणजे ती खरी शूर ठरली असती! स्त्रीने स्वत: अशी कृती करण्यापेक्षा बंडासारख्या गुप्त क्रांतिकारकाची मदत घेणं हेच वास्तव आहे! शेवटी ती स्वत: पोलिसांना फोन कशाला करते? बंडाबरोबर पळून जाऊ शकली असती! छे: असं केलं असतं, तर मात्र ती भेकड वाटली असती. तिच्या प्रामाणिकपणाला, ध्येयवादाला पोलीसच्या ताब्यात जाणंच शोभून दिसतं.

¤

भ्रष्ट शासन, भ्रष्ट न्यायसंस्था यांनी अशिक्षित–सुशिक्षित, ग्रामीण–नागर सगळ्याच माणसांच्या जीवनावर आघात होत आहेत. त्याविरुद्ध उठणारे आवाज क्षीण आहेत; पण आहेत. त्याचे एक स्पंदन 'पुरुष' या नाटकात सुजाणपणे उमटले आहे. म्हणूनच ते प्रेक्षकांची विलक्षण पकड घेते. प्रेक्षकाच्या सामाजिक, राजकीय जाणिवांना चालना देण्याचे काम करते.

–विनया खडपेकर

## देवा, हिंदुस्थानात कम्युनिझम येऊ दे : पृष्ठ ४ वरून

आता मात्र श्यामचा नाइलाज झाला. बसमधले प्रवासीही कुरकुरू लागले होते. श्याम खाली उतरला. बस निघून गेली.

'येईल दुसरी बस १०–१२ मिनिटात' श्याम मनाशी म्हणाला; पण कुठली १० मिनिटे नी कुठली १२ मिनिटे. बस चांगली अर्ध्या तासाने आली. आता श्यामने बाया–बापड्यांचा विचार सोडून दिला व तो अगदी रानवटासारखा आत घुसला व जागा पकडली. लोक आत आले ते आले. बाकीच्यांना कंडक्टरने खाली उतरवले. काही लोकानी श्यामसारखाच वाद घालावयाचा प्रयत्न केला; पण श्यामसारखा तोही असफल झाला.

बस सुरू झाली पण ती काही नेहमीच्या मुंबईच्या चाकांनी धावत नव्हती तर मुंगीच्या पावलाने चालत होती. बसमधली सगळी जणं त्रासून गेली. अशा वेळी आपसात कधीही न बोलणारी मुंबईची मंडळी बोलू लागतात. त्या बोलण्यावरून बसचे कर्मचारी *'नियमा'प्रमाणे काम करण्याच्या* पद्धतीच्या संपावर आहेत म्हणून कळले.

थांब्यावर प्रवासी उतरो वा न उतरो, चढो वा न चढो बस आपली प्रत्येक थांब्यावर थांबत असे.

'अरे, कोणी चढत नाहीत, कोणी उतरत नाही आहेत तर बस थांबवतात तरी कशाला?' श्यामने आपला एक जनरल प्रश्न केला.

'हे सगळे नियमाप्रमाणे चालले आहे.' एका प्रवास बंधूने खुलासा केला.

काय झाले होते की, बसमध्ये जागा असली तरी थांब्यावर बस थांबवत नाहीत, थांबवली तरी पुढे–मागे कुठेही थांबवतात वगैरे गोष्टी walky-talky च्या सहाय्याने अधिकारीवर्गाच्या लक्षात आल्या होत्या म्हणे व त्यांनीच कंडक्टरसना व ड्रायव्हर्सना योग्य जागी बस थांबण्याबद्दल वगैरे आदेश दिले होते.

हे ऐकून श्यामला खूप हसू आले. बस-कर्मचाऱ्याचे हे गैर वागणे वर्षान वर्ष होत आले आहे. ते कळवून घ्यायला एक वेळचा प्रवास सुद्धा पुरे होता. ते कळवून घेण्याकरता बेस्ट अधिकाऱ्यानी वॉकी–टॉकी वापरावी म्हणजे पूर्वी हाताच्या काकणाला व हल्लीच्या काळी नखांना रंग लावण्याकरता आरसा वापरण्यासारखे होते. कदाचित ह्या आरशाचे म्हणजे वॉकी–टॉकीचे पैसे जनता-फंडातून आले होते म्हणून अधिकारीवर्ग कौतुकाने आरशाचा उपयोग करत असावी.

स्वत. ह्या अधिकाऱ्यांनी थोडा walk केला असता वा प्रवाश्याशी थोडा talk केला असता तर? पण मग कोणा लंडनला वा न्यूयॉर्कला जाऊन आलेल्या कमेटीने काय सूचना केल्या होत्या व त्यातल्या कोणत्या अमलात आणल्या गेल्या? असे लोकसभेत विचारले गेले असते तर? त्याला उत्तर नको का तयार?

त्यानंतर हे दररोजचेच झाले. वर्तमानपत्रात गरीब बिचाऱ्या प्रवाश्याचे फार हाल होताहेत ह्याबद्दल छापून येत असे, नाही असे नाही; पण कोणाही कामगार पुढाऱ्याने वा कामगारांच्या युनियनने ह्याबाबत काही खुलासा केला नव्हता. walky-talky वापरून का होईना पण कंडक्टर्स वा ड्रायव्हर्सच्या वागण्यातल्या चुका दाखवून, त्या सुधारण्याचा प्रयत्न केल्यास, कामगारांचा व त्यांच्या पुढाऱ्याचा रोष का व्हावा हे श्यामला कळले नाही. जसा पगार–वाढ मागणे हा जन्म-सिद्ध हक्क आहे तसीच जनतेची गैरसोय न होऊ देणे हे जन्म–सिद्ध कर्तव्य नाही आहे का? पण हे सागायचे कोणी व कोणाला?

येथे तर साधा खुलासाही नव्हता तर गैर-सोयीबद्दल दिलगिरी कोण व्यक्त करणार होते?

पूर्वी श्याम कोणाला ११ वाजता भेटायला जायचे असले तर साधारण १० वाजता निघत असे; पण बेस्ट कर्मचारी 'नियमा'-प्रमाणे वागू लागताच त्याला ९ वाजताच निघावे लागू लागले होते. आता तो नेहमीच्या थांब्यावर न थांबता तीन थांबे आधी–जेथून बस निघत असे तेथे रखडत–रखडत जाऊ लागला होता.

आज त्या मोठ्या थांब्यावर श्याम पोहोचताच त्याला निळ्या साडीतल्या एक ओळखीच्या बाई दिसल्या. ह्या बाई गर्ल-गाईडच्या कार्यकर्त्या होत्या म्हणून ही विशिष्ट निळी साडी. तश्या बाई बऱ्या होत्या, मोकळ्या–चाकळ्या होत्या; पण फार गोष्टी-वेल्हाळ होत्या. गोष्टी–वेल्हाळ हा शब्द त्या बाईंकरता फारच सौम्य होता; पण आज–कालच्या स्त्री–मुक्ती लढाईच्या काळात असलेच शब्द वापरणे योग्य असे श्यामचे मत झाले होते.

तेव्हा त्या गोष्टी–वेल्हाळीला श्यामने चुकवण्याचा खूप प्रयत्न केला; पण बायकोच्या इच्छेविरुद्ध काही चुकवण्याचा पुरुषाचा प्रयत्न कधी यशस्वी झाला आहे काय?

त्या बाईंनी श्यामला पाहाताच श्यामकडे झेप घेतली. आधीच ती बाई गोष्टी-वेल्हाळ व त्यातून ती नुकतीच Girl Guide च्या कोणा आंतर–राष्ट्रीय संमेलनाकरता चक्क रशियाला जाऊन आली होती, मग तिच्या गोष्टी–वेल्हाळपणाला काय बंधन? बस चालकाच्या 'नियमा'नुसार काम करण्याच्या संपामुळे बस मिळायला खूप वेळ लागणार होता वगैरेची त्या बाईला काही पर्वा नव्हती. श्यामसारखा श्रोता आपल्याला मिळाला आहे ह्याच आनंदात ती होती!

'तुम्ही कसे आहात? राधा–मुलं कशी आहेत?' वगैरे काही जुजबी चौकशीसुद्धा न करता तिने आपले रशिया–प्रवास–पुराण सुरू केले. पास–पोर्टचा कसा त्रास झाला, कपडे-खरेदीची कशी मजा आली, विमान सुटायला उशीर म्हणूनच पोहोचायला कसा उशीर झाला वगैरे गोष्टी श्यामने शेकडो लोकाकडून ऐकलेल्या व तेव्हढ्याच शेकडो प्रवास–वर्णनात वाचलेल्या असल्यामुळे श्यामची त्यातली 'अपूर्वाई' अगदी निघून गेली होती; पण आता ही मोकळी-चाकळी बाई जर प्रेमाने सगळे सागत होती, तर श्यामला ते ऐकणे व चेहऱ्यावर 'अपूर्व' रस आणणे भागच होते.

अशी रशिया–प्रवासवर्णनात २५–३० मिनिटे गेली. आता श्यामचे उभे राहून पाय व ऐकून-ऐकून कान दुखू लागले होते. त्या गर्ल–गाईड असल्यामुळे त्यांचे पाय दुखणे शक्यच नव्हते व बाई असल्यामुळे तोंड दुख-

ण्याचा सुतराम संभव नव्हता !

सुदैवाने बस आली, सुदैवाने त्या दोघाना त्यात जागा मिळाली; पण दुर्दैवाने बाईंनाही कोर्टातच कामाला जावयाचे होते. त्यामुळे श्यामला आणखी २५–३० मिनिटांचा भुर्दंड पडणार होता.

बाईंना खिडकीची जागा देऊन श्याम त्यांचे शेजारी बसला. कॅसेट बदलण्याकरता जेव्हढा वेळ लागतो व त्या वेळात जसे शांत असते तसे बसमध्ये चढून बसेपर्यंत शांत होते; पण आसनावर बसल्यावर लगेच कॅसेटचा Part II सुरू झाला ! बसमध्ये एक फायदा होता. कॅसेट ऐकणे तर भागच होते; पण निदान बाईंच्याजवळ तरी बसायला मिळाले होते !

रॅं, रॅं करीत बस चालू होती. नेहमी २०–२५ मिनिटाच्या प्रवासाला आज चांगली ४०–५० मिनिटे लागणार ह्याबद्दल श्यामची खात्री झाली. रशिया–कौतुक ऐकता-ऐकता श्यामला काय सुचले कोणास ठाऊक. त्याने एकदम विचारले,

' पण काय ग सुधा, रशियात असे थांब्या-वर बस न थांबवणे, जागा असली तरी प्रवाशांना न घेणे व अधिकाऱ्यानी दडपण आणताच ' नियमा ' प्रमाणे काम करणे वगैरे चालते का ?' सुधा पुढारलेली असल्यामुळे स्वतःला नावाने व अग–तुग म्हणवून, घेणे तिला आवडत असे. त्या पद्धतीने श्याम ' काय ग सुधा ' म्हणाला होता.

सुधाचा चेहरा भयंकर आश्चर्यचकित झाला! एखाद्या खेडेगावच्या माणसाने मुंबई-तल्या माणसाला, ' का हो ' मुंबईत जर विजेवर गाड्या चालतात, तर त्यात चढता-उतरताना विजेचा झटका बसत नाही का?' विचारले तर त्या मुंबईच्या माणसाचा चेहरा कसा भयंकर आश्चर्यचकित होईल ? सुधाचा चेहरा अगदी डिट्टो तसाच झाला !

' काय बोलतोस श्याम ?' सुधा सढळपणे दुसऱ्यांना पण नावाने हाक मारायची. काही म्हणा पण, श्यामला राधाच्या अहो-जाहोपेक्षा हे ' श्याम ' प्रकरण जास्त गोड वाटावयाचे.

' काय बोलतोस श्याम ?' सुधाने ते वाक्य जोर येण्याकरता परत म्हटले, ' रशियात असले काही चालत नाही हो ! विमाने, आगगाड्या, बसेस अगदी मिनिट–टू–मिनिट चालतात!' मग सुधाने रशियात सगळे अगदी मिनिट–टू–मिनिट कसे चालते ह्याची उदाहरणे दिली.

' पण मग तेथले बसकंडक्टर्स, ड्रायव्हर्स संपावर जात नाहीत ? किंवा निदान 'नियमा'-प्रमाणे काम करून जनतेला काचतं नाहीत ?'

सुधाच्या चेहऱ्यावर परत ' विजेच्या आग-गाडी 'चा भाव आला. तिने रशियात काही येथल्यासारखी लोकशाही नाही, तेथे कम्यु-निझम आहे. तेथे असले काही चालत नाही म्हणून सांगितले.

ते सर्व ऐकताच श्यामने प्रार्थना केली, ' देवा, हिंदुस्थानात कम्युनिझम येऊ दे.'

रशियन क्रांतीमध्ये लाखो लोक मारले गेल्याचे श्यामने वाचले होते. तेथे कलावतांना, लेखकांना काही स्वातंत्र्य नाही हेही त्याला वाचून व ऐकून माहीत होते; पण त्याच्या मनात आले की, जसे बाकी कोणाला काही स्वातंत्र्य नाही तसे बस–वाल्याना संपावर जाण्याचे स्वातंत्र्य नसेल, त्याना अगदी ' नियमा 'प्रमाणे काम करण्याचेही स्वातंत्र्य नसेल तर मग रशियन कम्युनिझम परवडला. येथे भारतात कम्युनिझम आला तर निदान बस–सेवा तरी सुधारेल! बाकीच्या गोष्टीशी आपल्याला काय करावयाचे आहे ? म्हणून ' देवा, हिंदुस्थानात कम्युनिझम येऊ दे ' ही अगतिक प्रार्थना !

आणि त्याचे त्यालाच हसू आले.

देवाचा मुख्य शत्रु तर कम्युनिस्ट–लोक. त्याचे आपसात विळ्या–हातोड्या–म्हणजे विळ्या–भोपळ्याएवढे सख्य ! आणि आपण चक्क देवालाच प्रार्थना करतो आहोत ना ?

पण ह्यात श्यामचा एकट्याचा दोष नव्हता. लहानपणी आई त्याला देवाला घेऊन गेली की, म्हणत असे, ' श्याम, देवाची प्रार्थना कर की, मला शहाणं कर, वर्गात पहिला नंबर येऊ दे, ' वगैरे. बिचारा श्याम त्याप्रमाणे करत असे. लग्नानंतर राधा तर त्याला वेळीअवेळी सुचवू लागली होती की, ' देवाची कृपा म्हणून तुम्हाला माझ्यासारखी सरळ व साधी बायको मिळाली आहे.' तेव्हा-पासून आपल्या येथे होते ते सर्व देवाच्या कृपेने ह्यावर श्यामची श्रद्धा बसली होती. म्हणून वरपागी विरोधी व थोडी विनोदी का होईना, त्याच्या तोंडून प्रार्थना झाली होती, ' देवा, हिंदुस्थानात कम्युनिझम आण रे बाबा !' □

---

**संपादक ' माणूस '**

□ ' माणूस 'च्या झेलम विशेषांकातील माझ्या ' वितस्ता ते झेलम ' या लेखावरील डॉ. शरद अभ्यंकर, वाई यांची प्रतिक्रिया आपण आपल्या दि. ५ फेब्रु. ८३ अंकात ' सप्रेम नमस्कार ' या सदरामध्ये प्रसिद्ध केली ती वाचली. काश्मिरचा पुराणकालापासूनचा इतिहास त्याना वाचनीय वाटला. धन्यवाद. ' नाग ' या शब्दाचा डॉ. शरद अभ्यंकर यांना अभिप्रेत असलेला ' नागाप्रमाणे वळणे घेत जाणारा निर्झर ' हा अर्थ मी माझ्या काश्मिर विषयक ' सी यू अगेन' या प्रवास-वर्णनात्मक पुस्तकात पृष्ठ १४५ वर दिलेला आहे. ' सी यू अगेन ' या पुस्तकात काश्मिर विषयी आणखी खूपच काही आहे, वाचकांनी अवश्य वाचावे.

शांतिलाल भंडारी
वैभव प्रकाशन, पुणे